म. ग्रं. सं. ठाणे
चरित्र
नं. २२३.

...७ तील बिहार-विद्रोह

व तदंगभूत

# ...िंह यांचें चरित्र

य. गो. जोशी
प्रकाशन
२० वें

REFBK-0005451

— गणेश सिताराम जोशी

सन १८५७ तील बिहार-विद्रोह

व तदंगभूत

# बाबू कुँवरसिंह यांचें चरित्र

प्र. गो. जोशी प्रकाशन

REFBK-0005451

ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. ५४५१

विक्रमार्जित सत्त्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता।

— सुभाषित

लेखक

**गणेश सिताराम जोशी**, बी. ए.,

शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

किंमत १२ आणे

# प्रस्तावनेचे दोन शब्द

सन सत्तावनची हिंदी शिपायांची आपल्या स्वत्वसंरक्षणाची खटपट हिंदुस्तानच्या इतिहासांत अपूर्व आहे. हिंदभूमींत प्रचलित असलेल्या ज्या दोनहि प्रमुख संस्कृति त्या दोघांवरहि आक्रमण होत आहे अशी कल्पना, देशांतील हिंदु व मुसलमान या दोनहि समाजांची झाली. डलहौसीच्या 'दत्तकवारस नामंजुरी'च्या तत्त्वानें संतप्त होऊन कांहीं जमिनदारहि या संग्रामांत अग्रभागीं होते. सर्व प्रकारच्या ऐहिक सुखांना लाथ मारून जिवाचीहि पर्वा न करतां आपल्या प्राणांची आहुति देण्यास जीं कांहीं नररत्नें सिद्ध झालीं त्यांत बिहारी वीर कुँवरसिंह यांची योग्यता पहिल्या प्रतीची आहे. नानासाहेबांसारख्या प्रमुख नेत्यांचें नांव बंडाच्या इतिहासांतून सांपडतें पण इंग्रज ग्रंथकार त्यांच्यावर शिव्यांची लाखोली घालतात. राणी लक्ष्मीबाईवरहि कांहीं ठिकाणीं स्तुतिसुमनांचा वर्षाव: झालेला आपणांस आढळेल. परंतु त्यास इंग्रज जातीचें स्त्रीदाक्षिण्य कारणीभूत असूं शकेल. कुँवरसिंहांचें नांव त्यांनीं केलेल्या समरविजयानंतर देखील इंग्रज ग्रंथकारांकडून ज्या अर्थीं घेण्यांत येतें त्या अर्थीं त्यांच्या धवल यशाला कोठल्याहि प्रसंगीं मालिन्याचा थोडासा देखील डाग लागलेला नसावा असें छातीठोक विधान कोणींहि करावें.

कुँवरसिंहाचें नांव टॉम्सन्कृत 'हिस्टरी ऑफ् इंडिया' नांवाच्या 'बेन्स् सिक्स् पेनी सीरीज़्'मध्यें प्रथम वाचावयास मिळालें. 'हिंदुस्तानांतील कोणाहि व्यक्तीनें मोठ्या गर्वानें हें नांव घ्यावें' अशी स्तुति जेव्हां टॉम्सन्सारखे ग्रंथकार या वीराची करतात तेव्हां या महनीय व्यक्तीचें संशोधन अवश्य झालेंच पाहिजे अशा इच्छेनें कामास लागलों. मध्यंतरीं घशाचा कांहीं रोग होऊन रजा घ्यावी लागली. त्या अवकाशांत बोलणें बंद ठेवण्याची सूचना मिळाली. तेव्हां अंतःकरणांतील शब्द तोंडावाटे बाहेर न काढतां लेखणीनें कागदावर उतरविले. या गोष्टीला तीन वर्षें झालीं. हस्तलिखित मजकूर इतिहासाचें परिशीलन केलेल्या सहृदय अशा मित्रांनीं वाचून आपला संतोष प्रगट केला व माझे मावसबंधु रा. य. गो. जोशी यांनीं प्रकाशनाचें

प्रकाशक —
**यशवंत गोपाळ जोशी,**
७२३ सदाशिव पेठ, पुणें २.

तारीख २३ नोव्हेंबर १९३६

मुद्रक —
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु,**
राजगुरु प्रेस, ५१३ शनवार पेठ, पुणें २.

८४८
सं ८२६

# प्रस्तावनेचे दोन शब्द

सन सत्तावनची हिंदी शिपायांची आपल्या स्वत्वसंरक्षणाची खटपट हिंदुस्तानच्या इतिहासांत अपूर्व आहे. हिंदभूमींत प्रचलित असलेल्या ज्या दोनहि प्रमुख संस्कृति त्या दोघांवरहि आक्रमण होत आहे अशी कल्पना, देशांतील हिंदु व मुसलमान या दोनहि समाजांची झाली. डलहौसीच्या 'दत्तकवारस नामंजुरी'च्या तत्त्वानें संतप्त होऊन कांहीं जमिनदारहि या संग्रामांत अग्रभागीं होते. सर्व प्रकारच्या ऐहिक सुखांना लाथ मारून जिवाचीहि पर्वा न करतां आपल्या प्राणांची आहुति देण्यास जीं कांहीं नररत्नें सिद्ध झालीं त्यांत बिहारी वीर कुँवरसिंह यांची योग्यता पहिल्या प्रतीची आहे. नानासाहेबांसारख्या प्रमुख नेत्यांचें नांव बंडाच्या इतिहासांतून सांपडतें पण इंग्रज ग्रंथकार त्यांच्यावर शिव्यांची लाखोली घालतात. राणी लक्ष्मीबाईवरहि कांहीं ठिकाणीं स्तुतिसुमनांचा वर्षाव: झालेला आपणांस आढळेल. परंतु त्यास इंग्रज जातीचें स्त्रीदाक्षिण्य कारणीभूत असूं शकेल. कुँवरसिंहांचें नांव त्यांनीं केलेल्या समरविजयानंतर देखील इंग्रज ग्रंथकारांकडून ज्या अर्थीं घेण्यांत येतें त्या अर्थीं त्यांच्या धवल यशाला कोठल्याहि प्रसंगीं मालिन्याचा थोडासा देखील डाग लागलेला नसावा असें छातीठोक विधान कोणींहि करावें.

कुँवरसिंहाचें नांव टॉम्सन्‌कृत 'हिस्टरी ऑफ् इंडिया' नांवाच्या 'बेन्स् सिक्स् पेनी सीरीज़्'मध्यें प्रथम वाचावयास मिळालें. 'हिंदुस्तानांतील कोणाहि व्यक्तीनें मोठ्या गर्वानें हें नांव घ्यावें' अशी स्तुति जेव्हां टॉम्सन्‌सारखे ग्रंथकार या वीराची करतात तेव्हां या महनीय व्यक्तीचें संशोधन अवश्य झालेंच पाहिजे अशा इच्छेनें कामास लागलों. मध्यंतरीं घशाचा कांहीं रोग होऊन रजा घ्यावी लागली. त्या अवकाशांत बोलणें बंद ठेवण्याची सूचना मिळाली. तेव्हां अंतःकरणांतील शब्द तोंडावाटे बाहेर न काढतां लेखणीनें कागदावर उतरविले. या गोष्टीला तीन वर्षें झालीं. हस्तलिखित मजकूर इतिहासाचें परिशीलन केलेल्या सहृदय अशा मित्रांनीं वाचून आपला संतोष प्रगट केला व माझे मावसबंधु रा. य. गो. जोशी यांनीं प्रकाशनाचें

काम पत्करतों म्हटल्यामुळें पुस्तक छापून काढावें असें वाटलें. राजगुरु छापखान्याचे मालक श्री. बापूसाहेब राजगुरु व त्यांची अत्यंत तत्पर अशी सहायक मंडळी यांनीं छपाईचें काम केवळ पांच दिवसांत उरकलें म्हणून धुळें येथील शिक्षणसप्ताहांत हें पुस्तक माझ्या व्यवसायबंधूंच्या सेवेंत सादर करतां आलें. आधारभूत ग्रंथांची यादी पुढीलप्रमाणें आहेः—

( 1 ) सन १८५७ के गदरका इतिहास—लेखक, शिवनारायण द्विवेदी. ( 2 ) बाबू कुँवरसिंह—लेखक, मथुराप्रसाद दीक्षित. (3) The Indian Mutiny of 1857, by Colonel G. B. Mallesen, C. S. I. (4) A History of the Indian Mutiny by T. R. E. Holmes, (5) A History of the Sepoy War in India by S. W. Kaye, F. R. S. ( 6 ) Chamber's History of the Revolt in India, (7) सन १८५७—लेखक, प्रो. बेहेरे, (6) Colin Campbell, by Archibald Forbes, ( 9 ) Rise of the Christian Power in India—Major Basu, ( 10 ) Other side of the Medal by E. Thompson, ( 11 ) Rise and Fulfilment of the British Rule in India by E. Thompson and G. T. Garratt; ( 12 ) The Story of the Indian Mutiny and Mutineers of the Bounty by W. P. Nimmo Hay and Mitchell, Edinburgh; ( 13 ) History of India by E. Thompson, Benn's Six Penny Series.

या पुस्तकांशिवाय नेहमींच्या व्यवसायांत कांहीं पुस्तकें वाचण्यांत आलीं होतीं त्यांचाहि उपयोग या कथानकांत झाला असलाच पाहिजे.

पुस्तकाचें हस्तलिखित धुळें येथेंच माझ्या मातुलगृहीं झालें व त्याचें प्रसिद्धीकरणहि तेथेंच होण्याचा योग येत आहे याबद्दल मनाला आनंद वाटतो. हस्तलिखित वाचून सरकारसेवानिवृत्त पेन्शनर अधिकारी श्री. बाबासाहेब देशपांडे यांनीं व बिहारमध्येंच हल्लीं नोकरीस असलेल्या एका बड्या अधिकाऱ्यांनीं ज्या सूचना केल्या त्यांचे आभार न मानणें कृतघ्नपणाचें ठरेल.

कुँवरसिंहाच्या खालोखाल योग्यता असलेला 'फैझाबादचा मौलवी' त्यालाहि उजेडांत आणावा, व खटपटीनें साधल्यास आपल्या महाराष्ट्रांतहि ५७ सालच्या ज्या ठिणग्या उडाल्या त्यांची माहिती ग्रंथरूपानें छापून प्रसिद्ध करावी असा संकल्प हें पुस्तक प्रकाशित करतांना मनाशीं सोडीत आहे. सत्यसंकल्पाचा दाता जो जनतारूपी भगवान् त्यानें तो पुरा करावा येवढीच प्रभुचरणांपाशीं प्रार्थना आहे.

धुळें,
मिति कार्तिक शु॥ ९.
शके १८५८.

ग. सि. जोशी.

# माझें प्रकाशन—

१ वळवांचे पाऊस ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
*२ पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
३ पुनर्भेट भाग ३ रा ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
४ कणसाचे दाणे ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
*५ दुर्दैवी मोहरे ( ऐतिहासिक चरित्रें ) किं. १ रुपया.
६ पैसाच पैसा ( सचित्र नाटक ) किं. १ रुपया.
७ जीवन-पथ ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
८ आवडत्या गोष्टी (६१ लेखकांचा कथासंग्रह) किं. ३ रु.
*९ चित्तरंजन किं. १। रुपया.
१० फुलबाग ( कविता ) किं. १ रुपया.
११ वायफळांचा मळा किं. २॥
१२ वाहते वारे ( कथासंग्रह ) किं. १२ आणे.
१३ गारांचा वर्षाव ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
१४ सोनेरी नागीण ( कादंबरी ) किं. १ रुपया.
१५ हायस्कूल विद्यार्थी ( कादंबरी ) ८ आणे.
१६ शि. म. परांजपे चरित्र व आठवणी किं. १ रुपया.
१७ संराक (विडंबनात्मक कवितांचा संग्रह) किं. १ रुपया.
१८ खेड्यांतील स्वभावचित्रें (ले. मो. गो. सोमण, बी. ए.) किं. १। रुपया.
१९ बोलका सिनेमा (ले. य. गो. जोशी) किं. ८ आ.
२० होमकुंड (ले. य. गो. जोशी) किं. २ रु.

शिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें ऑर्डरप्रमाणें पाठविलीं जातील.

प्रकाशक—**यशवंत गोपाळ जोशी**, ७२३ सदाशिव, पुणें २.

* मुंबई इलाखा शाळाखात्यांत लायब्ऱ्यांकरितां व बक्षिसाकरितां मंजूर.

७४८४
च ५१६
२८/१७५६
मराठी ... ग्रंथालय ... वा. क्र. ५८४७

# बिहार-विद्रोह

अर्थात्

## जगदीशपूरचे बाबू कुँवरसिंह यांचें चरित्र

**प्रास्ताविक:**— विद्रोह म्हणजे बंड. इ. स. १८५७ सालीं उत्तर हिंदुस्तानांत ब्रिटिश राजसत्ता हिंदुस्तानांतून उखडून टाकण्याकरितां एक अयशस्वी क्रांति झाली. बिहार-विद्रोह–बिहारमधील बंड-त्या क्रान्तींतच अंगभूत आहे. पूर्वजांचे पराक्रम, मग ते यशस्वी असोत अगर अशयस्वी असोत, मनाला हर्षभरानें कंपित करतात; थोडा वेळ आपणांस अनुपम अशा आनंदाचा आस्वाद चाखवितात, रिझविण्यास कठीण अशा अंतःकरणाला रंजवितात. बंडाची मीमांसा शालेय पुस्तकांतून ठरावीक अशा साचांत केलेली आपण वाचतों. राज्य करणाऱ्या शासनसंस्थेविरुद्ध प्रजेनें केलेल्या उठावाला बंड असें म्हणतात. ती शासनसंस्था परकीय असली म्हणजे बंडास सिद्ध झालेल्या प्रजेकडून घडणारे अनर्थ साहजिकच अधिक कठोर असतात. कारण, परकीय शास्त्यांची दमननीति तितक्याच कठोरपणें त्या प्रजेला सतावून सोडीत असते. ज्या प्रमाणांत क्रिया त्याच प्रमाणांत प्रतिक्रिया या सिद्धान्ताला अनुसरून बंडांतील युद्धनीति चालत असते. असलीं बंडें शमवितां आलीं म्हणजे यशस्वी राज्यकर्त्यांच्या जातभाईनीं लिहिलेले इतिहास बंडखोरांचीं कृत्यें मात्र बहुशः भडक रंगांत रंगवितात व विद्रोही लोकांना दबविण्यासाठीं योजलेल्या जालीम उपायांना

समयसूचक राजनीति असें गोड नांव देतात. सत्तावन सालांत हा सर्व बनाव यथाक्रम बनून आला. बंडाचीं मोठमोठालीं पुस्तकें विचक्षण वाचकांनीं वाचावींत. या पुस्तकांत महाराष्ट्रियांना अपरिचित अशा बिहारी बंडाची हकीकत देऊन प्रसंगोपात्त मोठ्या बंडाचीहि कांहीं मीमांसा करावी असा संकल्प आहे. या बंडाचे अद्भुत घटनेंत कुँवरसिंहांनीं आपला विक्रम कसा प्रकट केला ही हकीकतहि साकल्यानें यांत वर्णिली जाईल.

**बिहार—प्रदेशवर्णन व अल्प इतिहासः—**

वेदकालापासून बुद्धकालापर्यंत या देशाला किक्कट, पलश, मगध आणि विहार अथवा बिहार अशीं अभिधानें मिळालीं आहेत. महाभारतांतील सुप्रसिद्ध जरासंधहि याच देशांत होऊन गेला. सार्वभौम सम्राट् अशोक व चन्द्रगुप्त मौर्य यांचें शासनचक्रहि येथूनच फिरत असे. आर्य चाणक्यांनाहि हीच भूमि प्रसवती झाली. सुप्रसिद्ध गया हें क्षेत्रहि याच प्रांताला भूषवितें. यमुनेला आपल्या उदरांत सांठवून विस्तृत झालेल्या जलौघानें या प्रदेशाला गंगामाई धनधान्यसंपन्न करते. मोगल साम्राज्याचा जनक--बादशहा बाबर यानेंहि हा प्रान्त जिंकला. तथापि त्याचे आधींच येऊन बिहारमध्यें कायम झालेल्या पठाण राजांनीं अकबराचे कारकीर्दीपर्यंत मोगल बादशहांची फारशी पर्वा केली नाहीं. तेथून पुढच्या कालांत मात्र बिहारमधील राजांनीं मोगलांच्या वाढत्या सत्तेपुढें आपली मान लवविली. ज्या तीन प्रांतांच्या 'दिवाणीची' याचना क्लाइव्हनें शाहआलम बादशहापुढें केली त्यांत बिहारहि समाविष्ट होता. या एकाच गोष्टीवरून देखील बिहार प्रांताची किंमत कोणालाहि समजेल. बिहार प्रांत इंग्रजांच्या पंखाखालीं अगदीं प्रथमच्या कालांतच पडल्यामुळें सन अठराशें सत्तावनपर्यंत इंग्रजी

सत्ता बिहारांत दृढमूल झाली होती. बिहारप्रांत हें अफूच्या व्यापाराचें आगर. अफूचा व्यापार करण्याची परवानगी जित-राष्ट्रांना देणें हें जित व जेते या दोघांनाहि फायद्याचें पडतें. जितांना पैसा मिळतो व जेत्यांना अमली पदार्थांच्या सेवनांत गर्क झालेल्या प्रजेवर विशेष प्रतिकार न होतांना राज्य करणें सोपें जातें. अफूशिवाय निळीचा व्यापारहि बिहार प्रांतांत मोठा चालत असे. सत्तावन सालांत बिहार, पाटणा, सारण, चंपारण, तिरहूत व शाहाबाद असे सहा जिल्हे या प्रांताचे होते व गया पाटणा, छपरा, मोतिहारी, मुझफरपूर व आरा हीं त्या प्रांतांचीं अनुक्रमानें मुख्य ठिकाणें होतीं. या सहाहि जिल्ह्यांचा 'कमिशनर' हा मुख्य अधिकारी असे. तत्कालीन कमिशनर टेलर नांवाचा होता.

**कमिशनर टेलर व बिहारची तत्कालीन फौजी व्यवस्था:—**

कमिशनर म्हणजे मुलकी अधिकाऱ्यांपैकीं प्रान्तांतील प्रथम दर्जाचा अधिकारी. फौजी अधिकाऱ्यांपेक्षां मुलकी अधिकाऱ्यांना जास्त दक्ष व लोकमतानुवर्ती राहणें भाग असतें. या नियमाला टेलर अपवाद होता. फौजी अधिकाऱ्यांची रक्ताची लालसा तितकी तीव्र नसेल इतकी टेलर साहेबाची होती. दिल्लीच्या बंडाचें वृत्त अफवांचे द्वारें पाटण्यास एकसारखें येत होतें. गोऱ्या लोकांचें जीवित अस्थिर झालें होतें यांत शंका नाहीं. तथापि आपल्या प्रान्तांत देशी फौजेची उठावणी झाली नाहीं किंवा लहानसा अत्याचार देखील झाला नाहीं ही गोष्ट ध्यानांत न धरतां केवळ आपल्या प्रान्तांत मुसलमानी वस्ती अधिक आहे येवढ्याच कल्पनेनें त्यानें आगामी अनर्थाचें भेसूर चित्र आपल्या मनाच्या चित्रपटावर रेखाटलें. असल्या भ्रमिष्ट भुताच्या हातांत अधिकाराचें कोलीत

असल्यावर आगीचा डोंबाळा न भडकला तरच नवल. पाटण्याच्या परेडीच्या मैदानांत खुल्या जागेवर लठ्ठ लठ्ठ असे वधस्तंभ गाडले गेले. व चार दोन बळी त्यावर लटकूं लागले. प्रजेच्या मनांत स्वस्थता राहिली नाहीं. आपणच अशांतता उत्पन्न करावी व आपणच वरिष्ठांकडे उलट तक्रार करावी हा हिकमती अधिकाऱ्यांचा प्रकार आजच नवीन उत्पन्न झाला आहे असें नाहीं. ती पूर्वापार चालत आलेली प्रथा आहे असें आपणांस यावरून सहजच समजेल. बिहारच्या व्यवस्थेसाठीं मुख्य लष्करी ठिकाण दानापूर हें ठरविण्यांत आलें होतें व त्या ठिकाणीं नं. १० चें गोरें पायदळ पलटण व नं. ७, ८ व ४० चें काळ्या शिपायांचें सैन्य असून आणखी एक तोफखान्याची तुकडी पण होती. "माझ्या प्रान्तांतील असंतोषाचा पारा फार चढला आहे, काळ्या शिपायांचीं हत्यारें काढून घेतलीं पाहिजेत" अशी तक्रार टेलरनें गव्हर्नर जनरल कॅनिंग याचेकडे केली. कॅनिंगचें उत्तर फार विचार करण्यासारखें होतें.

**कॅनिंगचें उत्तरः**—कॅनिंगनें दमननीति जोरानें चालविली नाहीं, म्हणून इंग्रजांनीं त्याला "दयामूर्ति कॅनिंग्" असें कुचेष्टेनें नांव दिलें आहे. कॅनिंग्नें जी दया दाखविली ती दाखविणें त्या वेळीं भाग होतें. कॅनिंग् काय इंग्रज नव्हता तर त्याला हिंदी बंडवाल्यांचें प्रेम यावें? तो इंग्रजच होता, त्याला सुद्धां बंडवाल्यांबद्दल त्वेष वाटत होता; पण भारतांतील सर्व इंग्रजी राज्याची जोखीम त्याचे शिरावर प्रतिष्ठित असल्यामुळें बाकीच्या अधिकाऱ्यांसारखें वाहवून जाणें त्याला उचित वाटत नव्हतें. इंग्लंडमध्यें सैन्यांत भरती होणें ही गोष्ट अत्यंत कमी मान्यतेची समजतात. पण हिंदी रमणी आपले रमण जर सैन्यांत दाखल झाले तर त्यांना पंचारती करण्यास तयार असतात. सैन्यांत दाखल होणें

नोंद नं. ७८८ ता. २०/११/५६



हा फार मोठा मान आहे व या मानाच्या जागेवरून शिपायांना हाकलल्यास उद्यांचें मरण आजच येणार हें कॅनिंग पूर्णपणें जाणून होता. विशेषतः दानापूरची छावणी उध्वस्त करणें तर त्याला मुळींच मान्य नव्हतें. कारण, कलकत्त्याहून दिल्लीकडे जाणारा मुख्य रस्ता तेथून फारच जवळ होता. दिल्लीकडे एवढा भडका उडाले-ला असतां कलकत्त्याहून दिल्लीकडे जाणारा मुख्य मार्गच जर बंड उत्पन्न झाल्यावर बंडखोरांनीं आडवून धरला तर सगळेंच संपेल ही गोष्ट तो पूर्ण जाणीत होता. सबब त्यानें टेलरला लिहिलें, "जरी कोणाचा काळ्या सैन्यावर विश्वास नसला तरी माझी पक्की खात्री आहे कीं, त्यांना कोणी प्रत्यक्ष त्रास दिला नाहीं, म्हणजे ते शांत राहतील." धूर्त कॅनिंग्! त्याची खात्री होती कीं, बिहारला डिवचलें म्हणजे त्याच्या मागोमाग बंगाल व उडिसा (ओरिसा) यांचीही रांग लागेल व सगळेंच उत्तर हिंदुस्तान पेटलें म्हणजे इंग्रजांना समुद्राशिवाय दुसरें आश्रयस्थान नाहीं. टेलरला समाधान वाटलें नाहीं. त्यानें बिहारमध्येंहि विद्रोही लोक आहेत असें दाखवून देण्याचा निश्चय केला. त्यानें आजू-बाजूच्या इंग्रजांना पाटण्यास येऊन राहण्यास लिहिलें व तिरहूत जिल्ह्याकडे प्रथम नजर फेकली.

**वारिसअलीः**— मुसलमानांचें जातीय प्रेम व धर्मवेड प्रसिद्ध-च आहेत. दिल्लीला मोंगल तख्त पुन्हा स्थापन झालें ही कल्पना पाटण्यांतील कांहीं मुसलमानांना पटली असावी. तेथील श्रीमंतां-कडून कांहीं पैसा मिळाल्यास तिरहूत जिल्ह्यांतहि बंडाची आग भडकण्यास हरकत नाहीं असली मूर्खपणाची कल्पना वारिसअली नामक एका जमादाराचे मनांत आली. टेलरनें आपले हेर सर्वत्र फैलून ठेवलेले होतेच. त्यांनीं वारिसअलीच्या पत्रव्यवहारावर नजर

ठेवली व अलिकरीम नामक पाटण्याच्या एका श्रीमंत सावकारास पत्र लिहितांना त्याला अटक करण्यांत आली. झटपट चौकशी होऊन वारिसअली फांसावर लटकला. कोणी पाठीराखा आत्मीयते-च्या भावनेनें आपणास अजूनहि सहाय होईल अशा खोट्या कल्पनेनें शेवटल्या क्षणाला वारिसअली मोठ्यानें ओरडला, “ दिल्लीच्या बादशाहाला मानणारे कोणी माझे बंधूजन असतील तर त्यांनीं अजूनहि पुढें येऊन मला सोडवावें.” त्याच्या अंतका-ळच्या विनंतीस कोणींहि मान दिला नाहीं. विस्मृतीच्या अफाट उदरांत वारिसअली नष्ट झाला. तो पोलीसचा एक अमलदार होता, तेव्हां सगळे काळे पोलीस असेच असले पाहिजेत अशा कल्पनेनें टेलरला घेरलें. परंतु हिंदी मनाची निमकहलाली टेलरला माहीत नसावी. आपण ज्या धन्याचें मीठ खातों त्याशीं बेइमान होणें हिंदी लोक पातक समजतात. उदरभरणाच्या पलीकडे कांहीं अधिक उदात्त ध्येय आहे ही कल्पना फार थोड्यांचे अंतःकरणांत प्रसवते. “ ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी ” असल्या भावनेनें, मिळेल त्यांत संतोष मानून स्वकीय-परकीय हा भेद मनांत न घेतां धन्याची एकनिष्ठ सेवा करण्यांतच हिंदी माणूस आपलें जड जीवित व्यतीत करतो. टेलरची दृष्टि वारिसअली नंतर अलिकरीम व त्याच्याचसारखे विचार असलेल्या लोकांकडे वळावी हें क्रमप्राप्तच होतें.

**अलिकरीम व पाटणाचे तीन मौलवीः—**

आपल्यावर कोणतें संकट ओढवणार होतें याची अलिकरीमला आधींच बातमी लागली व टेलरचे ऑफिसर त्याला पकडावयास येण्याचे आधींच त्यानें पलायन केलें होतें. हातांतलें सावज निसटलें म्हणजे पारध्याला जो त्वेष येतो त्या त्वेषानें वेडावून

टेलरनें आलिकरीमची इस्टेट जप्त केली व त्याला पकडून सरकारचे हवालीं करणारास एक हजार रुपयांचें बक्षीस लावलें. परंतु असलीं बक्षिसें स्वीकारण्यास लोक कां तयार नसतात कोण जाणे ? कदाचित् चोराच्या बरोबरच 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायानें आपलीहि आहुति पडेल अशी शंका पकडणाऱ्यांस येत असेल ! आलिकरीम पळाला, पण टेलरचें दमनचक्र अधिक जोरांत फिरूं लागलें. परेडच्या मैदानांतील फांसाचे खांबांना ओझ्यागणती बलिदान मिळूं लागलें व पाटण्यांतील प्रजा त्रस्त झाली. मुसलमानांत मौलवींना मान फार ! अजूनहि मौलाना मुल्ला, मौलवी वगैरे प्रकार मुसलमानांत अग्रपूजेचा मान घेतात. पण समुदायांच्या नेत्यांना कार्यविपत्तीच्या प्रसंगीं मोठें भय असतें अशी नीति आहे. त्या नीत्यनुरूप पाटणाचे मुख्य मौलवी-नामें महमूद हुसेन, अहमदुल्ला व वाजुलहक–यांस प्रथम पकडण्यांत आलें. उघडपणें त्यांना पकडण्याची टेलरला छाती झाली नाहीं, तेव्हां खाजगी भेटीस बोलावून त्यांना बेडया ठोकण्यांत आल्या. राजे प्रजापालक असतात, प्रजेचें व राजपुरुषांचें लेकराचें व आईचें असें नातें असतें–असावयास पाहिजे, असा निदान नीतिशास्त्राचा एक दण्डक तरी आहे ! पण अविश्वासाच्या पिशाच्चानें एकदां कां पछाडलें म्हणजे नातें-गोतें सर्व विसरलें जातें व क्रोधांधतेनें मनुष्य वागूं लागतो. टेलरची या अविचारी वागणुकींत चूक झाली यांत संदेह नाहीं. पण प्रत्येक चुकीला शिक्षा ही ठरलेलीच असते. ती केव्हां मिळेल तेवढेंच देवाघरीं ठरावयाचें असतें. आपल्या परमप्रिय मौलवींना अन्यायानें धरलें या गोष्टीची पाटण्याच्या मुसलमानांना फार चीड आली व त्यामुळें शांतता तर झालीच

नाहीं पण त्याच्या उलट परिणाम मात्र झाला. ३ जुलै १८५७रोजीं पाटण्याला बंडाची पहिली ज्वाला पेटली.

### पाटण्याची पहिली चुणूकः—

३ जुलै १८५७ रोजीं बंडाची उघड घोषणा झाली. तथापि, बंडवाल्यांचें हिरवें अर्धचंद्राङ्कित निशाण फडकूं लागण्यास नुसती मौलवींची पकडापकड येवढेंच कारण नव्हतें. टेलरसाहेबानें सर्व प्रजेचीं हत्यारें काढून घेण्याचा हुकूम केला होता. हा हुकूम मानण्यांत लोकांनीं अतिशय कसूर केली. कांहीं हत्यारें सरकारी नोकर नेऊं शकले. पण अधिकांश हत्यारें लोकांनीं दडवून ठेवलीं; व आतां जास्त वेळ थांबल्यास पूर्ण निःशस्त्र बनूं याच भीतीनें उघड बंडाचा पुकारा केला गेला. मुसलमान जाती, मुसलमान धर्म व मुसलमान राज्य या त्रयीची इज्जत राखण्याकरितां सगळ्यांनीं इंग्रजांविरुद्ध लढाईस उठावें अशी घोषणा करण्यांत आली. टेलर देखील स्वस्थ बसलेला नव्हता. बंडवाल्यांचें मुख्य ठिकाण हेरून त्यावर त्यानें विश्वासू शीख सेनेची रवानगी केली. केवळ आठ वर्षांपूर्वीं इंग्रजांना रणाङ्गणांत खडे चारणारे हे शीख वीर येवढ्या अल्पावधींत इंग्रजांच्या येवढे अंकित कसे झाले याचें फार लोकांना गूढ वाटतें. पण, इंग्रजी ग्रंथांतूनच असें वाचावयास मिळतें कीं, या प्रसंगीं शीख लोकांना पूर्वीची आठवण देण्यांत आली होती. भाई अर्जुनसिंह, तेगबहाद्दर व गुरु गोविंदसिंह यांचा जीव घेण्यास मोगली राज्ययंत्रच कारणीभूत होतें—मुसलमानांनीं शिखांचे धर्म-गुरु हालहाल करून मारले होते—या गोष्टीचीं उठावदार वर्णनें शिखांना सांगण्यांत आलीं होतीं. शीख लोकांना सूडाच्या कल्पनेनें भारून टाकतांना इंग्रज जादूगार हर्षानें नाचत असतील ! जगांत घरच्या फुटीसारखी दुसरी वाईट गोष्ट नसेल. पण फूट ही तर

अभागी भारत वर्षाच्या वांट्याला पुराण कालापासून आलेली आहे. असो, शिखांनीं आपल्या नैसर्गिक शूरत्वानें लढून बंडाचा झेंडा उभारणाऱ्या लोकांचा अगदीं अल्प कालांत मोड केला. पण या चुकीबद्दल टेलरसाहेब पाटण्याच्या लोकांना स्वस्थ थोडेंच बसूं देणार होते. त्यांनीं आपला सूड काढावयास लगेंच सुरुवात केली व त्यांच्या प्रथम ग्रासाला पीरअली नामक एका पुस्तकविक्याचें खाद्य मिळालें.

**पीरअलीची नवलकथा:—**

पीरअली हा एक पुस्तकविक्रेता पाटणा शहरीं त्या काळीं वास्तव्य करीत असे. पुस्तकांचेंच दुकान असल्यामुळें फुरसतीच्या वेळीं पुस्तकें वाचून जगाचें थोडेंबहुत ज्ञानहि त्यानें मिळविलें होतें. अयोध्या प्रान्तांत त्याच्या बऱ्याच ओळखी होत्या. पुस्तकाच्या धंद्यासंबंधीं त्या प्रान्तांत त्याचें जाणें येणें पण असे. प्रवासापासून येणारा बहुश्रुतपणा त्यानें संपादन केलेला होता पण त्याच्यांत एक दुर्गुण होता. तो म्हणजे दांडगेपणा. आजूबाजूला जें होमकुंड पेटलें होतें त्याची धग लागून त्याचें रक्तहि सळसळूं लागलें होतें, व लखनौ येथील उत्तेजित मुल्लामौलवींशीं प्रसंगवशात् त्याचा पत्रव्यवहार पण चाले. इंग्रज जातीचा त्याचा द्वेश पहिल्या प्रतीचा होता. इतका कीं, इंग्रजी भाषेचा देखील उपयोग तो आपल्या व्यवहारांत कधीं करीत नसे. आणि, खरें पाहूं गेलें तर आपल्याकडे सुद्धां परकीय भाषेवर केवढा तरी कटाक्ष आहे! यावनी भाषा कंठगतप्राण आले तरी पठण करूं नये असा स्पष्ट प्रतिबंध आपल्या प्राचीन लेखकांनीं करून ठेवला आहे. परभाषा-पठणाचे काय बरे येवढे अनर्थ असतील? बेंटिकसाहेबांचे वेळे-पासून आम्ही इंग्रजी भाषा शिकलों. आज आमच्यांत काय

उणेपणा आला आहे ? उलट आमचे ज्ञानभंडारांत केवढी तरी भर पडली ! पूर्व व पश्चिम या दोन उलट दिशांना वसलेल्या हिंदुस्तान व इंग्लंड ह्या देशांना जोडणारा इंग्रजी भाषा हा दुवा नाहीं काय ? हिंदुस्थानांत दुसरें इंग्लंड त्या भाषेमुळें निर्मितां येईल अशी आशा सुद्धां आज या भाषेनें उत्पन्न झालेली आहे. बंगाल, मद्रास, तेलंगण, गुजराथ, महाराष्ट्र आदिकरून भाषाभिन्नत्वानें अलग अलग असलेल्या हिंदुस्तानांतील मोठमोठ्या भूप्रदेशांना इंग्रजी भाषेमुळें जोडतां येत नाहीं काय ? कोणताहि राष्ट्रीय पुढारी घ्या त्याला इंग्रजी बोलतां आल्याशिवाय कोठल्याहि ठिकाणीं आज मान मिळणार नाहीं. आपल्याइकडे तर इंग्रजी भाषेला 'वाघिणीचें दूध' असें म्हटल्याचें आपल्या आढळांत येतें ! येवढे मोठे फायदे जरी आज प्रत्यक्ष आपण पाहतों तरी कित्येकांस यावनी भाषेचा स्वीकार केल्यानें नकळत आपण परकीय संस्कृतीचा अंगिकार करतों व आपण आपली आत्मिक अवनति करतों असें वाटतें. सकाळपासून रात्रीपर्यंत इंग्रजीचा अंगिकार केल्यामुळें रात्रीं स्वप्नांत देखील इंग्रजीच बोलण्याइतकी मजल गेलेले कांहीं बहाद्दर आपल्याला दिसतात. पण हा चमत्कार काय सर्वत्र होतो ? पीरअलीचा इंग्रजी भाषेवर कटाक्ष होता हें मात्र खरें !

असल्या प्रकारच्या माणसांवर पोलिसांचें मोठें प्रेम असतें. पहाना ! एकादी उंच उडणारी घार कोंबडीच्या पिलांबद्दल केवढी तरी आस्था दाखविते ! आपलें गगनविहाराचें रम्य काम सोडून एकट्या-दुकट्या पिलाकडे पाहिल्याबरोबर तिला त्या पिलाबद्दल आपलेपणा उत्पन्न होतो व एकदम त्याजवर झांप टाकून ती त्या पिलाला आत्मसात् करून टाकते. पोलीसची सर्वगामी दृष्टि त्यांच्या दृष्टीनें ठरलेल्या राज्यकंटकांवर इतक्याच तीव्रतेची असते.

नोंद नं.



त्यांच्या काळ्या का निळ्या कसल्या तरी बुकांतून त्यांची नोंद केलेली असते असें म्हणतात. १८५७ सालीं असलीं पुस्तकें होतीं कीं नव्हतीं हें निश्चयेंकरून सांगतां येणार नाहीं. पण पाटण्यांत झालेल्या पहिल्याच उठावाचे शेवटीं पीरअलीला पकडण्यांत आलें. त्वेषाच्या पहिल्या सपाट्यास कोणी एक डॉक्टर लायल नामक अफूच्या कामीं देखरेख करणारा ऑफिसर ठार मारला गेला होता. खुना-सारखीं धाडसाचीं कामें बेडर वृत्तीच्याच माणसांकडून होत असतात. पीरअलीवर वहीम येऊन त्याजवर आरोप शाबीत झाला. आरोपाची शाबिती झाल्याबरोबर तडकाफडकी शिक्षेचा अमलहि त्याचवेळीं होत असे. आजकाल आपण पाहतों, कीं प्रत्यक्ष खून करून सुद्धां आरोपीला प्राणदंड भोगावा लागण्यास वर्ष सहा महिने तरी खात्रीनें लागतात. आपण प्राणदंडोचित आहों, अखेरच्या न्यायालयांत सुद्धां आपल्याला क्षमा करण्यांत यावयाची नाहीं इतकें माहीत असून देखील तिकडे अभ्यर्थना केली जाते व तेथेंहि नकार मिळाल्यास राजप्रतिनिधि 'व्हाइसरॉय'साहेब अगर खुद्द राजे-साहेबांपर्यंतहि माफीचे अर्ज केले जातात. कोणाला ठाऊक या सर्व कालक्षेपांत त्या आरोपीच्या मनाला कसलें समाधान वाटत असेल ? पीरअलीची चौकशी व निकाल अगदीं झटपट झाला. त्याला आपल्या पूर्वजांच्या मालिकेंत पटकन स्थान मिळालें. त्याची हकी-गत थोडीशी मनोरंजक आहे म्हणून जरा विस्तारानें लिहीत आहें, येवढेंच !

**पीरअलीची चौकशी व त्याला प्राणदण्डः—**

पीरअलीला पकडल्याबरोबर टेलर व इतर कर्मचारी यांचेपुढें त्यास आणण्यांत आलें. हातांपायांत बेड्या, कमरेला करकचून बांधलेली दोरी व श्रमाच्या ग्लानीनें आंगातून गळणारा घाम

यामुळें पीरअलीचें स्वरूप उग्र दिसत होतें. बलिदान करण्यास बकरें न्यावयाचें म्हणजे त्याला शेंदूर वगैरे घालून पळसाच्या फुलाच्या तांबड्या माळा घालतात. तांबड्या वर्णाचा मृत्यूशीं एवढा निकट संबंध काय बरें असेल? यदृच्छेनें पीरअलीच्या शरीरावरहि रक्ताचा तांबडा छिडकावा झाला होता. कमरेच्या दोरीच्या करकोच्यांतून रक्ताच्या बारीक बारीक चिळकांड्या निघत होत्या व त्या त्याचे अंगांतून निघणाऱ्या घामाशीं संमिश्र होत होत्या. केवढें भयानक तें दृश्य दिसलें असेल?

"पीरअली, तुला प्राणांचें दान ज्या योगें आम्हांस देतां येईल अशी एकादी तरी गोष्ट तुला सांगतां येईल काय?" गोरे ऑफिसर विचारते झाले.

मृत्यूचा तांडव नाच डोळ्यांसमोर चालला असतां लीलेनें पाहूं शकणारा तो पीरअली निर्भय वृत्तीनें बोलला—

"जगांत पुष्कळ अशा गोष्टी असतात, कीं ज्याकरितां प्राण राखावे लागतात; जगांत कांहीं अशाहि गोष्टी असतात, कीं त्याजकरतां जीवनत्यागच आवश्यक असतो. पण, याद राखून ठेवा, कीं माझ्या ठिकाणीं माझी जागा घेण्यास शेंकडों शूर पुरुष पैदा होतील."

अघोरी क्रान्तीच्या पूजकांना समजत नाहीं कीं एकाद्या व्यक्तीचें हनन करून स्वतंत्रता मिळत नसते. व्यक्तींचा खून व संबंध राज्यपद्धतीचा पाडाव या गोष्टी अगदीं भिन्न असतात; पण, भडकलेले माथेफिरू क्रान्तीकारक अविचारी मार्गानें जातात व आपलें स्वतःचें जीवित नष्ट करून इतरांचें जीवित अधिक कष्टमय करून सोडतात. क्रान्तिकारकांची—व्यक्तींचे खून करून

समाधान मानणाऱ्या क्रान्तिकारकांची—परंपरा अजून नष्ट झालेली नाहीं ! कधीं होईल तें एक परमेश्वरच जाणीत असेल.

पीरअलीला फांशीं देऊन त्याच्या घरादाराची जप्ती करण्यांत आली. पण या घटनेच्या मागें दुसरें कोणी तरी असावें अशी कल्पना टेलरच्या मनांत येऊन त्या दृष्टीनें त्यानें प्रयत्न सुरू केले.

लुत्फअली:—लुत्फअली नांवाचा एक धनिक दुकानदार त्या वेळीं पाटणा शहरांत राहात असे. पैसे देणें घेणें हा एक त्याचा व्यवहार असे. सावकारी चांगली चालली, कीं मनुष्य श्रीमान् होतो. श्रीमंतीच्या मागें किती तरी जबाबदारी असते ! सगळेच लोक निरनिराळ्या दृष्टींनीं श्रीमंतांकडे बघतात. गरीबांना वाटतें, कीं त्यांनीं आम्हांला मदत करावी; त्यांच्या बरोबरीच्या माणसांना वाटतें, कीं त्यांनीं चांगल्या इतमामानें राहावें; सरकारला वाटतें, कीं त्यांनीं प्रसंगीं सरकारला मदत करावी व आपल्या प्रजेवरील वजनानें अशांति दडपून टाकण्यास सरकारास मदत करावी. विचार केल्यास मायेचा पसारा जगाच्या संसारांत केवढा मोठा आहे तें सहज दिसेल. खालच्या स्थितींतून वरच्या स्थितींत जाण्यास मनुष्य एकसारखा धडपडत असतो. त्याच्या कल्पनेप्रमाणें तो—जग ज्याला प्रतिष्ठा म्हणतें—त्या दर्जाला जाऊन पोंहोचला म्हणजे प्रतिष्ठितांच्या काय हालअपेष्टा असतात त्या त्याला दिसूं लागतात. तेव्हां क्षणभर तो असेंहि म्हणत असेल, कीं माझी पूर्वस्थिति फार बरी होती ! एकंदरींत काय ? आपल्या असलेल्या परिस्थितींत माणूस समाधान मानीत नाहीं. भविष्यकालीन परिस्थितीवर नजर देऊन मृगजलामागें धांवणाऱ्या वेडावलेल्या वाटसराप्रमाणें तो धांवतो व फसतो ! लुत्फअली श्रीमंत होता. अर्थात् त्याचेजवळ कांहीं नोकरचाकरहि होते. डॉक्टर लायलला

गोळी घालण्याचे कामीं ज्यांचेवर काम चालून शिक्षा झाल्या होत्या त्यांपैकीं लुत्फअलीचा एक नोकर पण होता. व पीरअलीला कांहीं पैसेहि लुत्फअलीनें दिले होते अशी खबर याच वेळीं टेलरला मिळाली. वास्तविक श्रीमंतांनीं ऑनररी मॅजिस्ट्रेटांच्या जागा पत्करून सरकारला विप्लवप्रसंगीं साहाय्य करावयास पाहिजे पण लुत्फअलीसारख्या श्रीमंतांनीं तें केलें नाहीं. " त्याला माझ्यासमोर घेऊन या. " टेलरसाहेब म्हणाले.

### लुत्फअलीवर खटला—

राजा बोले, दळ हाले. टेलर बोलले, शिपायी हालले. लुत्फअली घरींच सांपडला. अपराध केला आहे असल्या विषारी कल्पनांचे आघात ज्यांचे विचारशक्तीवर विंचवाच्या नांगीच्या टोचणीप्रमाणें तीव्र दंश करीत असतात ते स्थिरवृत्ति असूं शकत नाहींत. लुत्फअलीनें असें काय केलें होतें, कीं त्यानें आपल्याच घरांतून चोरासारखें बाहेर पळून जावें ? टेलरचे शिपायी आल्याबरोबर लुत्फअलीनें निघण्याची तयारी केली. व गाडीवानाला गाडी जोडावयास सांगितलें. गाडीवाला दुकानांत आला नव्हता. लुत्फअली स्वतांच सारथ्यकर्म करूं लागला व आपल्याला काळदाढेंत घालण्यास आलेल्या शिपायाला आपल्या गाडींत बसवून लुत्फअलीनें टेलरचा बंगला गांठला. एक चिठी देऊन त्याला मॅजिस्ट्रेटसमोर नेण्यांत आलें. लुत्फअलीवर आरोपाची शाबिती झाली नाहीं ! प्रत्यक्ष पुरावा मुळींच नव्हता. त्यामुळें लुत्फअलीला सोडून देणेंच भाग पडलें. एकाद्या सावकारानें एकाद्या कुळाला पैसे दिलेले असले व त्या कुळानें एकाद्या ऑफिसराचा खून केला म्हणजे काय त्या सावकाराचें खुनांत अंग समजावयाचें ? टेलरला पुष्कळ संशय आला असेल, पण मॅजिस्ट्रेटला कायद्याप्रमाणें काम

करावयाचें होतें. हडेलहप्पी पोलीस अधिकाऱ्यांना कायद्याच्या काटेकोर तारेवरील नाच पुष्कळ वेळां करतां येत नाहीं व त्यामुळें पोलीसनें भरलेले पुष्कळसे खटले अखेरपर्यंत टिकत नाहींत असें आपल्या आढळांत कितीदां तरी येतें. राष्ट्रीय निशाण आपल्या घरावर फडकाविणें हा गुन्हा आहे असा कोठेंहि कायदा झाल्याचे आधींच तो तसा फडकाविण्याबद्दल शिक्षा होऊन वरिष्ठ हायकोर्टानें तो खटला खोटा ठरवून आरोपीला सोडून दिल्याचें आपण आजहि ऐकतों. पोलिसांचें काम खटले भरावयाचे—आरोपाची शाबिती मॅजिस्ट्रेट करतात !

**पाटण्याहून दानापुरासः—**

एकादी दुसरी प्रमुख व्यक्ति फांसावर चढवली, पांच-पंचवीस साधारण लोक वधस्तंभाला लटकावले आणि पन्नास-शंभर संशयितांना तुरुंगांत डांबून टाकलें म्हणजे बेगडी शांतता प्रस्थापित होण्यास विलंब लागत नाहीं. पाटणा शहरीं असेंच झालें. लुत्फअलीवर मुकद्दमा चालून तो सुटल्यानंतर पाटण्यांतील कोणीहि माणूस बंडाच्या गोष्टी करतांना ऐकूं येईना. एका आठवड्याच्या आंत पाटण्यांत सामसूम झालेलें पाहून टेलरला धन्यता वाटली. अजूनहि, श्वेतवर्णीयांचें जीवित संकटांत आहे, दानापूरच्या सैनिकांना शस्त्ररहित केलें पाहिजे, असा पुकारा टेलरच्या मनोवृत्तीच्या लोकांकडून केला जात होता. परंतु, दानापूरचे फौजी अधिकारी देखील आपल्या काळ्या सैनिकांबद्दल संशय प्रकट करीत नव्हते. अशा प्रसंगीं, तारीख १६ जुलै, १८५७ रोजीं कानपुरांत झालेल्या भीषण हत्याकांडाची बातमी दानापूर मुक्कामीं पोंचली. बिहारी सेनेबद्दल कलकत्त्यास देखील संशय उत्पन्न झाला असावा असें दिसतें. कारण, ता. १५ जुलै रोजीं मुख्य सेनापतीनें दानापूरच्या

अधिकाऱ्यास तेथील फौजेच्या निःशस्त्रीकरणाबद्दल अखेरचें मत विचारलें होतें. पण दानापूरचा अधिकारी स्तब्धच राहिला. अखेरीस तारीख २४ रोजीं, कांहीं तरी केलें पाहिजे या बुद्धीनें त्यानें दानापुरास त्या दिवशीं येऊन पोंचलेल्या नं. ३७ च्या युरोपियन फौजेला निःशस्त्र करण्याचें ठरविलें. तारीख २५ जुलैचा दिवस उजाडला. परेडीच्या मैदानांत युरोपियन फौज, युरोपियन गोलंदाज दिसूं लागले.

—बिथरलेले काळे शिपाई व आजूबाजूस युरोपिअन गोलंदाज.

या दृश्यानें दानापूरच्या काळ्या शिपायांच्या मनांत इ. स. १८२४ च्या दृश्याची आठवण झाली असेल ! झालीच असावी !! नाहीं तर ते क्षणार्धांत इतके उलटले नसते. ही बराकपूरची आठवण नेहमींच ताजी राहण्यासारखी आहे.

**बराकपूरची घटना** इ. स. १८२४:—

नेपोलियन बोनापार्टला गाडून टाकण्याकरतां इंग्लंडमधील फॅक्टऱ्यांना कितीतरी ताण पडला होता ! दिवसरात्र काम करून त्यांतून पैदा झालेल्या असंख्य तोफा-बंदुकांनीं नेपोलिअनच्या महत्त्वाकांक्षेचें भूत, मांत्रिकानें एकादें भूत जसें बाटलींत बंद करून टाकावें त्याप्रमाणें, सेंट हेलेना या बेटांत बंद करून टाकलें होतें. वाटर्लूची लढाई जिंकली म्हणून विजयोत्साह करण्यांत आले. कांहीं वेळ आनंद वाटला. परंतु, गिरण्यांना पूर्वींप्रमाणें काम मिळेनासें झालें. कारण, आतां युद्ध संपलें होतें. युद्धाच्या कालांत फार काम करून गिरण्यांचीं तोंडें काळीं होतात. शांततेच्या काळांतहि त्यांना कांहीं खाद्य लागतें. युद्धाच्या वेळीं प्राणघातक हत्यारें निर्माण करावयाचीं असल्यामुळें पोलाद, शिसें वगैरे पृथ्वीच्या पोटांत उत्पन्न होणाऱ्या खनिज पदार्थांची जरूरी

लागते. शांततामय काळांत गिरण्यांचीं यंत्रें उद्भिज पदार्थ मागतात. इंग्लंडांत खनिज पदार्थ आहेत, उद्भिज पदार्थ नाहींत. तेच मिळविण्यांत इंग्लंडनें गेलें सर्व शतक खर्ची घातलें आहे. ब्रिटिश साम्राज्य इंग्लंडांतील गिरण्या चालू ठेवण्याकरतांच मिळविलें गेलें. इ. स. १८१५ नंतर जे साम्राज्यविस्ताराचे प्रथम प्रयत्न करण्यांत आले त्यांतलाच एक प्रयत्न ब्रह्मदेशांत करण्यांत आला होता. ब्रह्मी युद्धाला तोंड लागलें होतें. पण या पहिल्याच युद्धाच्या तोंडाला इंग्रजाच्या तोंडांत बसली होती. 'रामू' या ठिकाणच्या रणरंगांत ब्रह्मी सेनेनें ब्रिटिशांना पराजित केलें होतें. बंगालमधील निरनिराळ्या पलटणींना ब्रह्मदेशांत कूच करावयाचा हुकूम झालेला होता. ४७ नंबरची पलटण अशांतलीच होती. रामूच्या लढाईनें तिला हतोत्साह केलें असावें असें दिसतें. तेव्हां त्या पलटणींतील लोकांनीं आजचें मरण उद्यांवर टाकावें या हेतूनें आपल्या अधिकाऱ्यांकडे त्यांनीं केलेल्या कांहीं तक्रारी होत्या त्याचें निरसन प्रथम करा, मग आम्ही ब्रह्मदेशांत जाऊं; असा हट्ट आपले ऑफिसरांपाशीं धरला. ह्या तक्रारी काय व त्यांचें उत्तर कसें दिलें गेलें तें आतां पाहूं.

**शिपायांची कहाणी व कत्तल:—**

'मेलास तर स्वर्ग, जगलास तर राज्य' ही भगवान् श्रीकृष्णांनीं क्षत्रियापुढें ठेविलेली आशा सर्वच क्षत्रियांना आपले प्राण द्यावयास तयार करणार नाहीं. ब्रह्मदेश—विजय करून असें कोणचें ब्राह्मणी राज्य बंगाल्यांतील ब्राह्मण शिपायांना मिळणार होतें, कीं रामूच्या संग्रामानंतर देखील आपलें शिरकमल आपल्या हातांवर धरून त्यांनीं ब्रह्मी:शिपायांशीं लंढावें ? आधींच बंगाल ! [मेकॉले-

साहेबानें ह्या प्रान्तांतील लोकांना भ्याड ठरविलेलें आहे ] व त्यांत ब्राह्मण !! त्यांनीं अशी तक्रार केली, कीं आमचा पगार आम्हांला पुरेसा नाहीं, दलदलीच्या मार्गांतून आमचें सामानाचें ओझें आम्हांला पेलणार नाहीं. ( त्या वेळच्या शिपायाला एक बंगाली मण ओझें आपल्या आंगावर वाहावें लागत असे ! ) तर आम्हांला वाहनाची कांहीं सोय करून द्या म्हणजे बरें पडेल. निकडीचा प्रसंग जाणून अधिकाऱ्यांनीं त्यांची समजूत करण्याकरतां परेडीच्या मैदानावर बोलावण्यांत आलें. नेहमींच्या कवाइतीच्या शिस्तींत काळे शिपाई उभे राहिले ! त्यांना माहीत नव्हतें, कीं चारी बाजूंनीं गोळे भरून तोफा सज्ज ठेवल्या होत्या. सूचनेचा बिगूल फुंकला गेला.

धाड् ! धाड् ! धाड् ! धाड् !

तोफांतून अग्निगोलकांची वृष्टि शिपाई सैन्यावर झाली व ४७ वी पलटण नष्ट झाली. शिपाई इतक्या निःशंक वृत्तीनें तेथें आले होते, कीं त्यांच्या प्रेतांपाशीं सांपडलेल्या बंदुका भरलेल्या देखील नव्हत्या. हा सर्व प्रकार कसा घडून आला त्याचें वर्णन मेजर बसू यांनीं लिहिलेल्या " राइज आफ धी ख्रिश्चन् पॉवर इन् इंडिआ " या पुस्तकांत चौकस वाचकांस वाचावयास सांपडेल. आपली स्वतःची फजिती कोणाला सहन होते ? रामूच्या अपजयानें ब्रिटिश अधिकारी चिडले होते व बराकपूर येथील कत्तल हें त्या त्वेषाचेंच फळ होय. असल्या गोष्टींची स्मृति लवकर नष्ट होत नाहीं. दानापूरच्या शिपायांना देखील तसल्याच परिस्थितींत सांपडल्यामुळें बराकपूरचें स्मरण झालें असेल.

**दानापुरास बंडाचा उद्भवः—**

तारीख २५ जुलै १८५७ रोजीं दुपारीं बारा वाजतां शिपा-

यांना परेडीच्या मैदानावर बोलावण्यांत आलें. आदल्या दिवशींच गोरे शिपाई आलेले त्यांनीं पाहिले होते. आपणांस ठाऊक आहेच कीं, तेथें गोलंदाजहि तयार होते. इतकी सर्व तयारी झाल्यावर आपली चटणी उडवण्यास हे यमदूत कमी करणार नाहींत अशी दानापूरच्या शिपायांची खात्री झाली. तथापि त्यांच्यांतील ४० नंबरची पलटण मात्र अजूनहि गोऱ्यांवर पूर्ण भरंवसा ठेवून वागत होती. बराकपूर व दानापूर दोन्ही ठिकाणच्या घटना सारख्याच. दोनहि ठिकाणीं निःशस्त्रीकरणासाठीं हाकलून आणलेले काळे शिपाई मध्यभागीं व आजूबाजूस गोऱ्या सैन्याचें कडें. अशा स्थितींतहि दानापूरवासीय शिपायांना बराकपूरच्या पलटणीचें हत्याकांड सहन करावें लागलें नाहीं. जरी ४० नंबरची पलटण विश्वस्त होती तरी बाकीचे दोन्ही सेनाविभाग आपल्यापुढें काय वाढलेलें आहे तें पूर्णपणें जाणत होते. अपेक्षेप्रमाणें, "शस्त्रें खालीं ठेवा" असा हुकूम आला. उत्तरादाखल नं. ७ व नं. ८ या सेनाविभागांनीं बरोबर भरून आणलेल्या बंदुकांनीं उत्तर दिलें. बकरी सुद्धां अखेरीच्या प्रसंगीं वाघावर उलटते असें लोक सांगतात. मग विकार व विचार ह्या दोनहि शक्ति पूर्ण जागृत असलेल्या देहधारी मनुष्यांनीं आपल्याला देहदंड देण्यास तयार असलेल्या शत्रूवर उलटावें यांत नवल नाहीं. कोणाला ठाऊक काय कारण झालें तें. दानापूर फौजेचा मुख्य गोरा सेनापति हें कर्म पाहण्यास तेथें हजर नव्हता. आपल्या हाताखालच्या ऑफिसरांवर तें काम सोंपवून सेनापतीसाहेब आपल्या बंगल्यावर जाऊन बसले होते. ते वयोवृद्ध होते व प्रथमपासून शिपायांना निःशस्त्र करण्याच्या कल्पनेला त्यांचा विरोध होता. कदाचित्, आपल्या मनाविरुद्ध

करावयास लागणारें काम करणें त्यांना आवडलेंहि नसेल ! आतां ४० नंबरच्या सेनाविभागाचें काय झालें तें पाहूं !

**सेनाविभाग नं. ४०:--**

आपल्याबरोबर काम करणारे आपले सोबती समोर आलेल्या गोऱ्यांना गोळयांच्या तोंडीं देऊन परेडीच्या मैदानावरून झपाट्यानें निघून जातांना ४० नंबरचें सैन्य बघत होतें. अशा वेळीं घटनाचक्र गोऱ्यांच्या कमनशिबानें उलटें फिरलें. " लबाड असतील हे ४० नंबरवाले लोक " अशा कल्पनेनें गोऱ्या सैन्यानें त्यांच्यावरच गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. प्राणरक्षा करण्यासाठीं त्यांनाहि आपल्या दोस्तांचा अनुसार करणें भाग झालें. डोकें शांत ठेवून गोऱ्या शिपायांनीं जर राजनिष्ठ राहूं इच्छिणाऱ्या सैन्य-विभागाला आपले दोस्त बनवून घेतलें असतें तर खात्रीनें पुढें भडकलेली आग इतकी पेटली नसती. परंतु गोऱ्या शिपायांची स्थिति त्यांच्या सेनापतीच्या अभावीं कप्तान नसलेल्या फुटक्या नावेसारखी झाली होती; व काळा दिसला, कीं तो बंडखोरच आहे व म्हणून तो वध्यच आहे अशा कल्पनेनें त्या वेळीं सर्व गोऱ्यांना घेरलें होतें. तारीख १७ जुलै रोजीं कानपुरांत इंग्रजी सत्ता पुन्हा प्रस्थापित झाली होती. आपले जातीय निर्घृणपणानें बंडवाल्यांनीं मारले, तेव्हां त्यांचा सूड आपणहि घेतला पाहिजे अशी कल्पना त्या वेळीं गोऱ्या शिपायांच्या डोक्यांत असली पाहिजे. तशांत सेनापति नसल्यानें त्यांना सगळेंच रान मोकळें सांपडलें होतें. हातांतल्या बंदुकींतील बार संपल्यावर पळून जाण्याशिवाय दुसरा मार्ग काळ्या शिपायांना नव्हता. व तोच मार्ग त्यांनीं पत्करला. जवळपासचें एकादें मोठें शहर गांठावें या हेतूनें त्यांनीं आरा शहराकडे जावयास प्रारंभ केला. तत्कालीन गोरे लोकांची

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

बंडवाल्यांचा सूड घेण्याची कल्पना किती क्रूरपणाची होती तें थोडक्यांत सांगूं. बंडवाल्यांकडून कांहीं गोष्टी चुकीच्या झाल्या असतील; पण जगांत शांतिसाम्राज्य स्थापन करण्यास अवतीर्ण झालेल्या प्रभू येशूच्या अनुयायांनीं देखील पुष्कळच क्रौर्य प्रकट केलें !

**इंग्रजांच्या मनःस्थितीची मीमांसाः—**

अगदीं नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या टॉम्सन् व गॅरेटकृत " राइझ अँड् फुलफिलमेंट् ऑफ दि ब्रिटिश पॉवर इन् इंडिया " या पुस्तकांत ही मीमांसा फार चांगल्या तऱ्हेनें केलेली आढळते. सन १९३४ च्या आपल्या आवृत्तींत पृष्ठ ४५२-४५३ यांवर ग्रंथकार स्पष्टपणें लिहितात कीं, " सशस्त्र बंडाचा उद्भव झाल्याबरोबरच युरोपियनांच्या कत्तली झाल्या. त्याचा बदला म्हणूनच कीं काय, ब्रिटिशांनींहि प्रत्युत्तर दिलें व बंडखोर सांपडला म्हणजे त्याला फांसावर देऊनच शांत न होतां त्याला मानसिक व पारलौकिक यातनाहि भोगाव्या लागतील अशा तऱ्हेच्या शिक्षांस सुरुवात झाली. " नुसतें फांशीं देणें म्हणजे कसें तरीच वाटतें, बंडवाल्यांना कांतडीं सोलून मारावयास हवें, जिवंत जाळावें, निदानपक्षीं तोफेच्या तोंडीं तरी द्यावें " असें निकलसनसाहेब कर्नल एडवर्ड्स् यास लिहितो. एकदां सूडाच्या बुद्धीनें मानवी अंतःकरणाचा ताबा घेतला म्हणजे सर्वत्र विपरीत असेच देखावे दिसूं लागतात. ब्रिटिशांच्या दृष्टीनें फक्त बंगाली पलटणीच नव्हेत तर प्रत्येक हिंदी मनुष्य प्रत्यक्ष बंडवाल्यायेवढा अघोरी दिसूं लागला. कोणी कोणी एकसहा कत्तली कराव्यात असें म्हणूं लागले व कोणी कोणी दिसतील त्या बंडवाल्यांना गोळ्या घालून मारण्याची भाषा वापरूं लागले. तारीख ४ जून १८५७ रोजीं बनारस येथील बंडाचा उपशम झाल्यानंतर कर्नल नील यानें आजूबाजूच्या

प्रदेशांत लष्करी कायदा सुरू केला. स्वयंसैनिक मंडळी सांपडतील त्या संशयितांना धरून उगाच मजा म्हणून फांसावर लटकवूं लागली. एकादा मनुष्य पकडावा त्याला हत्तीवर बसवावें व एकाद्या आंब्याच्या झाडाला टांगलेल्या दोरींत त्याची मान अडकवून खालचा हत्ती काढून घ्यावा अशा लीला ही मंडळी करूं लागली. तथापि या सर्व अत्याचारांना अधिकारी मंडळी जबाबदार असत असें मात्र नाहीं. कोणीहि युरोपियनांनीं मग ते सैन्यांत असोत वा नसोत एकत्र मिळावें, चौकशीकोर्ट भरविल्याचा देखावा करावा व दोषी-निर्दोषी, स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध असले भेद लक्षांत न घेतां एतद्देशीयांच्या खुशाल कत्तली कराव्यात असला प्रकार सर्वत्र सुरू होता. या सर्व कृतींत जातीय मत्सराचा वेडेपणा दिसून येत होता." सूडास सूड अशा तऱ्हेचें वर्तन जबाबदार अधिकारी देखील त्या काळीं कसें करूं शकत याचें प्रत्यंतर पंजाब-मधील २६ व्या काळ्या पलटणीबाबत आपणांस बघावयास मिळेल.

**२६ वी काळी पलटण:—**

तुलनात्मक दृष्टीनेंच लिहावयाचें झाल्यास अमृतसरचे डेप्युटी कमिशनर् मि. फ्रेडरिक कूपर यांचें नांव बंडवाल्या नानासाहेबां-च्या एवढ्या किंबहुना त्याहून देखील जास्त मोठ्या अक्षरांत क्रौर्याच्या गोष्टी बंडाच्या ज्या ज्या इतिहासांतून सांपडतात त्या त्या इतिहासांतून लिहिलें गेलें पाहिजे. कूपरनें लाहोरच्या २६व्या काळ्या पलटणींतील २८२ लोकांना नानाच्या सदयतेनेंच मारलें. ब्रिटिश क्रौर्याचा दरारा एवढा मोठा होता, कीं माणसें पकडलीं गेलीं म्हणजे जीवनावस्थेंतच मृत्यूचा अनुभव घ्यावयास सुरुवात करीत. त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे ५० गोऱ्यांनीं ह्या २८२ जणांना सहज पकडून आणलें. मध्यरात्रीच्या सुमारास अजनाला

येथील पोलीसचौकींत या सगळ्यांना कोंडून ठेवण्यांत आलें. फार पाऊस पडत होता म्हणून लगेचच्या लगेच त्यांना गोळ्या घालण्यांत आलें नाहीं. बा वरुणा ! कशाला येवढी कृपा त्यांच्या-वर केलीस ! ही कृपा अस्थानीं ठरावयाची होती. सकाळ उजाडली. कांहीं शीख शिपायांना लांब लांब दोऱ्या देऊन पाठ-विण्यांत आलें. पण जवळपास झाडें नव्हतीं. त्यामुळें, त्यांना गोळ्या घालून ठार मारावयाचें ठरलें. कूपरच्या पदरच्या मुसल-मान शिपायांना त्या दिवशीं बकरी-ईदची सुट्टी देण्यांत आली होती व जवळच अमृतसरला नमाज पढण्यासाठीं पाठवून देण्यांत आलें होतें. आणि पकडून आणलेल्या मुसलमान कैद्यांची बकरी-ईद निराळ्या तऱ्हेनें साजरी होणार होती. पोलीस स्टेशनचें दार उघडलें गेलें. दहा दहा लोकांना एका मागून एक असें आणा-वयाचें ठरलें. पंधरा दशक संपले ! समोर होत असलेल्या हत्येनें गोळ्या घालणारांपैकीं अत्यंत सराईत असा शिपाई सुद्धां चक्कर येऊन पडला. तेव्हां थोडी विश्रांति घेण्यांत आली. पुन्हा यमदूत निघाले. २३७ लोक ठार मारून झाल्यावर बाकीच्यांना पुकार-ण्यांत आलें.

**कलकत्त्याची अंधारकोठडी व अजनाला पोलीस स्टेशन !!**

ठेंचून ठेंचून कैदी आंत भरले गेल्यामुळें सकाळपर्यंत बाकीचे ४५ इहलोकींची यात्रा संपवून तरी गेले होते अगर अगदीं शेवटची घटका मोजीत होते. अंधारकोठडीच्या कल्पित गोष्टीच्या–निदान शंकित गोष्टीच्या— जनकाला आकाशांतून ही गंमत पाहून सुख झालें असेल.

**अजनाल्याची विहीर:—**

आतां, एवढीं सगळीं प्रेतें कोठें टाकावयाचीं, येवढाच प्रश्न शिल्लक

राहिला. गोळ्यांनीं मारले गेलेले व गुदमरून मेलेले असे सगळेच मुडदे बाहेर खेचण्यांत आले. परंतु, गोळ्यांनीं न मारलेल्यांपैकीं कांहींचे प्राणपक्षी देहपंजरांत अजूनहि अडकलेले होते. गंमतच करायची, मग थोडी तरी कां करावी? जिवंत व मेलेले असे सगळेच एका कोरड्या विहिरींत ढकलण्यांत आले व आंत माती, दगड वगैरे लोटण्यांत येऊन ती विहीर बुजवण्यांत आली. एल्जिन्साहेब व्हाइसरॉय झाल्यानंतर कानपूरच्या विहिरीवर एक स्मारक इ. स. १८६३ सालीं मोठ्या समारंभानें बांधण्यांत आलें. आणि, अजनाल्याची विहीर? तिच्यांत घातलेल्या मातींतून कांटेरी झाडें-झुडपें वाढत असतील!! एवढ्या मोठ्या शूरत्वाच्या कृत्याबद्दल छोट्या मोठ्या ऑफिसरांनीं कूपरवर स्तुतिस्तोत्रांचा वर्षाव केला.

१, ऑगस्ट, १८५७ या तारखेला हा प्रकार घडून आला—

१५, जुलै, १८५७ या तारखेस कानपूरची कत्तल झाली होती. कानपूरच्या कत्तलीबद्दल हिंदी राष्ट्र लाजेनें खालीं मान घालतें!! अजनाल्या कत्तलीबद्दल 'हिंदुस्तानरक्षक' (Saviour of India) जॉन लॉरेन्स् लगेच दुसऱ्या दिवशीं कूपरला लिहितो—

लाहोर, २–८–१८५७

परमप्रिय कूपर,

२६ व्या पलटणीवर तुला जो विजय मिळाला त्याबद्दल मी तुला धन्यवाद देतों. तूं व तुझे पोलीस फारच धडाडीनें वागलांत व याजबद्दल सर्व देश तुमचा ऋणी राहील. अजनाल्याला जें शासन मिळालें त्या योगें तरी बाकीच्यांना चांगली दहशत बसेल अशी आशा आहे. अजून कोणी विद्रोही शिल्लक असल्यास त्यांचें चांगलें दमन कर.

जॉन् लॉरेन्स्.

निर्लज्जपणें कूपर लिहितोः—

कानपूरला एक विहीर आहे तशीच अजनाला येथेंहि आहे ! !

होय ना ? मग अजनाल्याच्या विहिरीवर प्रभुप्रार्थना करणारा एकादा दगडी देवदूत कोणी कां बरें उभारला नाहीं ?

दानापूरचे शिपाई आराच्या बाजूला पळाले ! शोण नदीवर हरेकृष्णसिंहानें त्यांच्याकरतां नावा तयार ठेविल्या होत्या.

**हरेकृष्णसिंहः—**

कृष्णसख्याचें पावन असें गोड नांव भक्ताला आनंदसागरांत बुडवून टाकतें. श्रीकृष्णाच्या सुंदर कथा कोणी वाचल्या नाहींत? श्रद्धायुक्त असे भारतवासी कृष्णलीलांवर फार—अगदीं बहोत—खूष आहेत. कंसमर्दक कृष्ण; पांडवरक्षक कृष्ण; द्रौपदीसखा कृष्ण; रुक्मिणीरमण कृष्ण—कृष्णाचीं किती तरी रम्य स्वरूपें ! 'कृष्ण' एवढा एक शब्द कर्णपथावर आदळला अगर नुसत्या त्या स्मृतीच्या अदृश्य पडद्यावर देखील उमटला म्हणजे आपल्या ज्ञान-चक्षूंपुढें उभीं ठाकतात. शरणागताला तारण करण्याचें कामच श्रीहरिकृष्णानें आपल्याकडे घेतलें आहे. तो आपल्या कंसमर्दक रुद्र स्वरूपांत आपल्याला कदाचित् कांहीं वेळ आनंदवील, पांडव-रक्षक कृष्ण आपल्या सदय मूर्तीनें आपले प्रणाम घेईल, द्रौपदी-सखा कृष्ण आपल्या भक्तवत्सलतेनें कोणाहि सद्गत मनुष्याच्या मनांत कृष्णप्रेम उचंबळण्यास कारण होईल; रुक्मिणीरमण कृष्ण कित्येक रमणींना असा नवस करावयास लावील कीं, " देवा, तुझ्या कृपेनें आमचेंहि जीवन रुक्मिणीच्या सौभाग्येंकरून युक्त होऊं दे " परंतु पार्थसारथी कृष्णाचें रूप मनुष्यजातीला मित्रधर्म व सेवाधर्म यांचे जे आदर्श घालून देतें त्यामुळेंच कृष्ण आज सर्वांच्या अंतःकरणांचा कबजा घेतो असें म्हटल्यास फारसें

अस्थानीं होणार नाहीं. सेवावृत्तींतील उच्चतम आनंदाचा आस्वाद घेणें फार थोड्यांच्या नशीबीं असतें. परमगहन असा सेवाधर्म 'योगिनाम् अप्यगम्यः।' असा असेल पण योगस्वरूप कृष्णांनीं तो स्वतः आचरून दाखविला आहे. संपत्ति, विपत्ति, या कालीं; प्रासाद अगर कुटिका या स्थानीं; हर्ष अथवा अमर्ष असल्या स्थितींत; सेव्यसेवकांचें नातें तितक्याच प्रेमाचें राहतें. त्यांचे देह दोन पण मनें एकच असतात. फरकच करावयाचा तर येवढाच करतां येईल. खरा सेवक मालकाचें हित, मालक स्वतः बघत नसेल इतक्या काळजीनें पाहतो. मानवी हरेकृष्णसिंह कुँवर-सिंहाचें हित रक्षण करण्यांत सदैव तत्पर असे. त्यांच्याच मदती-च्या आशेनें तो शोणनदीवर नावा टाकून बसला होता. दाना-पूरच्या बागी—बंडखोर—शिपायांनीं आराकडे कूच केलें.

**विद्रोही शिपायांचें आराकडे कूचः—**

दानापूरचे शिपाई आरा येथें कां गेले या प्रश्नाच्या उत्तरांत बंडवाल्यांच्या मनःस्थितीचें स्वरूप आपणांस बघावयास सांपडतें. दीन जनता त्रस्त झाली म्हणजे कोणा तरी बलिष्ठाचा आश्रय घेते. पुराणांतरीं सुद्धां पृथ्वी गाईचें रूप घेऊन भगवान् विष्णूंकडे गेल्याचा दाखला सांपडतो. सार गोष्ट इतकीच कीं, गरिबांनीं एकादी आगळीक केली तर तिचें निरसन कसें करावें याची कल्पना त्यांना नसते. भांबावलेल्या वृत्तींत बंडवाल्यांचें देखील असेंच झालें. डलहौसीच्या सुधारणांमुळें हिंदुस्तानांत एकाच बंडा-पुरती सामुग्री साचलेली नव्हती. निदान 'अर्धा डझन' तरी बंडापुरती ती सामुग्री होती असें आपणांस इंग्रजी इतिहासकारांच्या इति-हासांतच वाचावयास मिळतें. सुधारणा!!—कंपनीच्या गव्हर्न-रांनीं केलेल्या सर्वच नाविन्यमय क्रांतिकारक कायद्यांना अथवा

प्रचलित केलेल्या नवीन रूढींना पोटभरू इतिहासकार 'सुधारणा' असें नांव देतात. हिंदी संस्कृति, पाताळापर्यंत खोल खणलेल्या अशा मोठ्या थोरल्या खड्ड्यांत बुडून जाईल इतकीं परिणामकारक हीं कृत्यें होतीं, तथापि 'रिफॉर्म्स्' म्हणजे सुधारणा येवढा शब्द कोशांतून पाहून पाठ केल्यानंतर असल्या कृत्यांना दुसरें कोणतें नांव आम्ही देणार ? खरें पाहूं गेलें तर वॉरन् हेस्टिंग्ज्पासून डलहौसीपर्यंत सर्व गव्हर्नर्स्-जनरलांनीं जीं कृत्यें केलीं तीं, परकीय राज्य हिंदुस्तानवर अबाधित चालावें अशा हेतूनें केलेलीं होतीं. परंतु, आम्हांला या सर्व 'सुधारणाच' दिसतात. राज्यकर्त्यांचे दृष्टीनें यांत कांहींच चुकलेलें नाहीं. परंतु, जितांनीं सुद्धां इतकें 'मुकीं बिचारीं कुणीं हका' अशा मेंढरांसारखें अनुकरणशील बनून, खड्ड्यांत देखील पडण्यास कां तयार व्हावें तें समजत नाहीं. इतिहास खरे घडून आलेल्या परिस्थितीचे आरसे असावयास पाहिजेत. पण आपल्याइकडे, त्यांच्यामागील पारा उडालेला दिसतो. आरा हें शहर शाहाबाद जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होतें म्हणून बंडवाले तेथें गेले असतील का ?

**बंडखोर आराकडे कां गेले ? :—**

'आरा' हें शाहाबाद जिल्ह्याचें मुख्य शहर असल्याचें आपणांस माहीत आहेच. शहर व खेडेगांव ! इंग्रजांच्या अनेक सुधारणांपैकीं खेडेगांवांचें महत्त्व कमी करून शहरांच्या वसाहती करणें हीहि एक सुधारणा इंग्रजी अमलाबरोबर इकडे आली. यांत्रिक युगांतील मयासुरी मायेचा व्याप शहरांतच वाढूं शकतो. इ. स. १८५७सालीं ह्या मायेचा पसारा हल्लींच्याइतका सर्वव्यापी झालेला नव्हता. तरी तिचें तें जालीम स्वरूप आपल्याला जाळून टाकील येवढें मात्र तत्कालीन लोकांना समजून आलें असावें. आणि म्हणूनच हें बंड उत्पन्न झालें.

इंग्रजी सत्ता बलिष्ठ आहे. अधिक खरें बोलावयाचें म्हणजे युक्तिबाज आहे. त्या सत्तेवर हत्यारांनीं आक्रमण केल्यास आमच्यातील फुटीच्या जोरावर ती सत्ता आम्हांला वांकविते, ह्या सर्व गोष्टी आम्हांला आतां समजूं लागल्या आहेत आणि म्हणूनच आज आमच्यांतील राजकीय पुढारी निःशस्त्र प्रतिकाराची भाषा बोलत आहेत. 'आरा' हें शहर होतें, त्या शहरांत मुख्याधिकारी होते, तेथें तुरुंग होता, तेथें खजिना पण होता. ह्या सर्वांकडेच बंडवाल्यांची संक्रान्त वक्र दृष्टीनें पाहते. फ्रेंच क्रान्तिकारकांनीं काय केलें? प्रथम पॅरिसवर हल्ला करून तेथील अधिकारी पकडले. तेथील तुरुंग फोडले व संपत्तीची लुटालूट केली. अधिकारी, तुरुंग व खजिना! अधिकारी—जुलूम करतात अशा कल्पनेनें; तुरुंग—आपल्या भयाण भिंतींच्या आवारांत देशभक्तांना खितपत ठेवतात म्हणून; व खजिन्यांत—सरकार गरिबांच्या संपत्तीचा अन्यायानें संग्रह करतें अशा भावनेनें; हीं तीन स्थानें बंडवाल्यांचें प्रथम ध्येय म्हणून ठरलीं जातात. शहरांत जसे राजप्रतिनिधि तसे लोकप्रतिनिधि देखील असतात; व त्यांच्याच पुढारीपणाखालीं विद्रोहाचे झेंडे नाचतात. आऱ्याहून जगदीशपूरला जाऊन तेथील कुँवरसिंहाला पुढारी बनवूं असें बंडखोरांनीं ठरविलें.

**विद्रोही सेना, हरेकृष्णसिंह व कुँवरसिंहः—**

शोण नदीवर हरेकृष्णसिंह दानापूरच्या बंडवाल्यांची वाट पाहत नावा घेऊन बसला होता. ही गोष्ट आधीं ठरलेल्या ठरावाला अनुरूप अशीच होती. हरेकृष्णसिंहाला कुँवरसिंहांनीं दानापूरची परिस्थिति अवलोकन करावयास पाठविलें होतें. हरेकृष्णसिंहाचें अंतःकरण इंग्रजांविषयीं द्वेषानें जळत होतें. आपल्या प्रभूचें जीवित असल्या कठीण काळीं सुरक्षित नाहीं ही

गोष्ट तो पूर्णपणें जाणत होता व कमिशनर टेलरचा त्या वेळचा न्यायहि और होता. एकाद्याला पकडून आणावें व जिवदान मिळेल अशा आश्वासनावर त्याचेकडून बंडांत भाग घेण्यास उद्युक्त असलेल्या अथवा प्रत्यक्ष भाग घेतलेल्या लोकांचीं नांवें त्यांस विचारावींत. तीं ऐकून झाल्यावर, "अरे, हीं सगळीं नांवें तर आम्हांला माहीत होतीं, आणखी सांग" असें त्याला विचारावें व तो गोंधळला म्हणजे त्याला उचलून फांशीं द्यावें. असल्या अंधेर नगरीच्या साम्राज्यांत कुँवरसिंहासारखा प्रतिष्ठित मालक अकारण बली पडावा ही गोष्ट त्याला संमत नसावी असें दिसतें. त्यानें एक नामी युक्ति योजली. कुँवरसिंह बंडखोरांचे नायक बनण्यास तयार नाहींत हें तो पक्कें जाणून होता. सबब त्यानें दानापूरच्या लोकांना खोटीच थाप दिली कीं, ते तुमचे सेनानी होतील. बंड तर झालें. पुढें कसें करावें? ह्याचा पूर्ण विचार करून त्यानें कुँवरसिंहांना निरोप पाठविला. "बंडास सुरुवात झाली आहे. आरा शहर बंडवाल्यांचे ताब्यांत आलें आहे. प्रसंग कठीण आहे. कारण आपण त्यांचे पुढारी होत नसाल तर आम्ही जगदीशपूरवर हल्ला करूं असें ते म्हणतात." कुँवरसिंह पेंचांत पडले. "मी आरा येथें येतों" असा निरोप पाठवून कुँवरसिंह आऱ्यास निघाले.

**'आरा' शहरीं कुँवरसिंहाचें आगमनः—**

कुँवरसिंह येण्याचाच अवकाश. बागी सैनिकांनीं लष्करी थाटाची सलामी दिली व "आमच्या प्राणांचें मोल देऊन आम्ही आपलें संरक्षण करूं, परंतु आम्हांला आतां इंग्रजांच्या हवालीं करूं नका." अशी आश्वासनपूर्वक विनंति शिपायांनीं कुँवरसिंहाला केली. सेनापतिपदाची धुरा कुँवरसिंहाच्या खांद्यावर बसली. सैनिक

आनंदले पण कुँवरसिंहाच्या चेहऱ्यावर नवीन आलेल्या जबाबदारीमुळें उत्पन्न झालेल्या चिंतेची छटा दिसूं लागली. बंडवाल्यांचे पुढारी म्हणून जे आपण ऐकतों त्या सर्वांची कथा एकच आहे. बंडवाल्यांनीं बंडें करावींत व जवळच्या मोठ्या शहरीं पळून जावें, नंतर तेथील कोणी तरी मोठा माणूस पकडावा व त्याच्यावर पुढारीपणाचें ओझें लादावें, हाच चमत्कार सर्वत्र झाला होता. झांशीची लक्ष्मीबाई; कानपूरचे नानासाहेब व बिहारचे कुँवरसिंह या सर्वांना त्यांच्या अनुयायांनींच बंडाला उद्युक्त केलें. प्रत्येकाला इंग्रजांनीं डिवचलें होतें व प्रत्येकजण इंग्रजांबद्दल साशंक होता ही सर्व गोष्ट खरी असली तरी प्रत्यक्ष पुढारीपण घेऊन आपण स्वतः आधीं बंडाची धुरा त्यांनीं कोणी उचलली असें दिसून येत नाहीं. सर्वांनीं संगनमत करून एकदम उचल जर केली असती तर इंग्रजांना बंडाचा उपशम करतां आला असता कीं नाहीं याचा फार संशय वाटतो. बंडाचे सर्वच पुढारी मरण यावयाचेंच तर, "मारितां मारितां मरावें" या युद्धनीतीनें उत्तम गतीस पावण्याकरितां बंडांत सामील झाले होते—प्रभुसत्ता बलवती झाली व तिनें इंग्रजांना सहाय केलें. उगाच बंडखोरांच्या पुढाऱ्यांना दोष लावण्यांत त्यांची निंदा करण्याचें पातक मात्र ग्रंथकारांचे पदरीं पडतें ! हे कुँवरसिंह कोण त्यांचें वर्णन करणें हाच पुस्तक-लेखनाचा आदिहेतु आहे.

**कुँवरसिंहांचें महत्त्वः—**

महाराष्ट्रीयांना आपल्या शूर पूर्वजांबद्दल फार आदर वाटतो—इतका कीं, त्या मेलेल्या वीरांच्या मृत्युतिथींचे उत्सव आपण करतों. बंडवाल्यांत देखील महाराष्ट्रीयांनीं केवढी उचल केली होती. साताऱ्याचें राज्य इंग्रजांनीं अन्यायानें गिळंकृत केलें होतें. ह्यामुळें

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

चीड येऊन थेट पार्लमेंटापर्यंत दाद मागण्यास गेलेला रंगो बापूजी व नानासाहेब बंडवाल्याकरितां खटपट करावयास लंडनला गेलेला अजीमुल्लाखान ह्यांच्याच डोक्यांतून बंडाची कल्पना निघाली असें म्हणतात. रंगो बापूजी, झांशीची संग्रामदेवता, तात्या टोपे, नानासाहेब व रावसाहेब ह्या सर्वांचा मार्ग चुकला असला तरी ते आज आम्हांला वंद्य आहेत—कुँवरसिंहांची गति जरी तीच असली तरी ते बिहारी लोकांना आजहि वंदनीय आहेत. प्रत्येक बिहारी माणूस कुँवरसिंहांचें नांव स्मरून अजूनहि कंपित होतो. बिहारी प्रजेनें कुंवरसिंहांचें कांहीं स्मारक मूर्तिरूपानें केलें आहे कीं नाहीं, सांगतां येत नाहीं. परंतु इंग्रजांच्या कृपाछत्राखालीं आज सबंध भरतखंड एकाच तांबड्या रंगानें रंगला आहे अशी परिस्थिति झालेली असल्यामुळें महाराष्ट्र व बिहार हे प्रांत विलग वाटत नाहींत. परमेश्वरनिर्मित पंचमहाभूतांवर कोणाचा हक्क आहे काय ? त्याच न्यायानें वीर पुरुषांच्या यशोगानावर देखील सगळ्यांनींच सारखा हक्क सांगावा ! ऐंशी वर्षांपूर्वींच्या भीषण युद्ध-प्रसंगीं बिहारच्या या ऐंशी वर्षांच्या वीरानें तरुणाला देखील लाजवील असें जें समरकौशल्य प्रकट केलें त्या बिहारी वीराला शतशः प्रणाम असोत ! स्मृतिपटलावर ज्ञानकिरण पाडणाऱ्या सूर्यनारायणा ! त्या वीराचें यशोगान गाण्यास लेखणीला सामर्थ्य दे ! कुँवरसिंहांच्या वंदनीय स्मृतिचित्रा ! ह्या लिखाणाला आपला शुभ आशीर्वाद दे !

**थोडा पूर्वेतिहासः—**

फार प्राचीन काळीं प्रसिद्धि पावलेल्या उज्जयिनी नगरींतून कांहीं रजपूत घराणीं शाहाबाद जिल्ह्यांत आलीं. त्या

घराण्यांच्या वंशांतच कुँवरसिंहांचा जन्म झाला. आपल्या इकडे नांवाच्या मोठेपणाला लोक अतिशय मान देतात. एकादा फडणीस किंवा एकादा फडके आपणांस आढळला तर त्याचें कुळ विचारतां तो खुशाल नाना फडणीस आणि हरिपन्त फडके यांच्यांशीं आपलें नातें लावून मोकळा होतो. रजपुतांचा प्रकार थोडा निराळा आहे. ते आपलीं नातीं पुराणकालीन देवादिकांशीं जोडावयास नेहमीं सिद्ध असतात. शाहाबाद जिल्ह्याचे बाजूस वसाहत करून राहिलेल्या ह्या रजपुतांचा डुमरांवचे राजघराण्याशीं संबंध होता व डुमरांव राजवंश आपली परंपरा भोजराजापासून सांगतात. स्वर्गस्थ पंडित मोतिलाल नेहरू यांनीं आपल्या नांवाबरोबरच डुमरांवचें नांव महाराष्ट्रीयांना परिचित केलेलें आहे. वकिली सोडली तरी डुमरांव खटला तेवढाच अखेरीपर्यंत चालविण्याची मनीषा त्यांनीं जाहीर केली होती. या एका गोष्टीनें तिकडील लोक अजून देखील या घराण्यांना किती मानतात याची कल्पना येईल. पाटण्याच्या कमिशनरनें एकदां जमीनदारांची एक सभा बोलावली होती. त्यांत डुमरांवच्या जमीनदारांचें आसन प्रथमस्थानीं ठेवलेलें नव्हतें. एवढी गोष्ट पाहतांच तेथें हजर असलेल्या कुँवरसिंहांनीं आसनांची पुन्हा मांडणी करावयास लाविली होती. पूर्वज पराक्रम करून चिरंजीव झाले त्यांच्यासारखे पराक्रम आमच्यांत नाहींत व पराक्रम करून दाखविण्याची परिस्थितिहि आज राहिलेली नाहीं. तरी पण, पराक्रमानें प्रसिद्धीस आलेल्या पूर्वजांना आम्ही मानाच्या जागा राखून ठेवतोंच. श्रीरामचंद्रांची कथा चालली असतांना उजव्या बाजूला मानाच्या ठिकाणीं मारुतीचा मोकळा पाट आपण अजूनहि ठेवितों. हीच पावनस्मृति कुँवरसिंहांसारख्या वीरांचें यशोगान करण्याची

कल्पना सहृदय लेखकांचे अंतःकरणांत निर्माण करते. कुँवर-सिंहांच्या बालपणाची हकीकत फारशी प्रसिद्ध नाहीं.

## कुँवरसिंहांचें बालपणः—

आर्यांच्या संस्कृतींत श्रुति व स्मृति हे शब्द वंद्य आहेत. कोठेंहि संकल्पाचें आदिस्थान " श्रुतिस्मृतिपुरोणोक्तफलप्राप्त्यर्थं ! " ह्या मंत्राला देण्यांत येतें. श्रुति ह्या शब्दांत 'श्रु' म्हणजे ऐकणें व स्मृति ह्या शब्दांत 'स्मृ' म्हणजे लक्षांत ठेवणें हे प्रधान धातु आहेत. यंत्रकलेच्या आगमापूर्वीं आमची वेदविद्या जतन करून ठेवण्यांत ऐकण्यानें व लक्षांत ठेवण्यानें फार मोठी कामगिरी केली. परंतु आमच्या भारतवर्षांत इतिहासलेखनाला फारसें महत्त्व दिलेलें दिसत नाहीं. शिवरायांनीं महाराष्ट्राला कांहीं काल स्वातंत्र्यलाभ करून दिला; पण आज आम्ही त्यांच्या जन्मशकाची देखील किती ओढाताण करीत आहोंत ? त्यांना लिहितां येत होतें कीं नव्हतें, या गोष्टीची सुद्धां आपल्याला खात्री नाहीं. शिवरायांची गोष्ट तर फार जुनी झाली, पण त्यांच्यानंतर शंभर वर्षांनीं जन्मलेल्या कुँवर-सिंहांच्या बाल्यावस्थेची देखील माहिती आम्हांला वाचावयास मिळत नाहीं. त्यांनीं आपल्या आयुष्याच्या उत्तरभागांत जे पराक्रम केले त्यांवरून त्यांनीं बालपणीं उत्तम क्षत्रियविद्या संपादन केली होती असें आपण म्हणूं शकतों—येवढेंच. बाकीचें सर्व तर्कजाल. एकाद्या माणसानें चांगलें नांव कमावलें म्हणजे त्याला अगदीं लहानपणापासून ओळखणारे असे कित्येक तरी वृद्ध पुरुष आणि आजीबाई निर्माण होतात ! ! विक्रमयशसिद्धीनंतर प्रचुर-यशोगान हीच आमच्या इकडील परंपरा पडलेली दिसते. अशाच तऱ्हेच्या पुष्कळ कथा बिहार प्रांतांत कुँवरसिंहांच्या बाल्यावस्थे-

संबंधीं प्रचलित आहेत त्यांवरून त्यांच्या बालपणाची थोडीशी माहिती उपलब्ध आहे. समरविजयी शूरांचीं चरित्रें सर्वत्र सारखींच दिसतात. शिवरायांच्या बाल्यावस्थेचीं जीं वर्णनें आपण वाचतों तीं तंतोतंत कुँवरसिंहांच्या बाल्यावस्थेला लागूं पडतात. तें कसें हें थोडक्यांत पाहूं.

**एक तुलनाः—**

मुसलमानी अमलाविरुद्ध बंड पुकारणारे शिवाजी व ब्रिटिश सत्ते-विरुद्ध लढणारे कुँवरसिंह. दोघांच्या वडिलांचीं नांवें शहा या शब्दा-नेंच प्रारंभ झालेलीं आहेत. शहाजी श्रीशिवनृपतींना जन्मकारण झाले; तर शहाजादासिंह कुँवरसिंहांचें पितृपद पावले. शाह म्हणजे राजे– राजांच्या सन्तानानें राज्येंच करावींत. हल्लींचे कोणी एक 'शाह', 'पाठक शाह आणि कंपनी' या नांवानें शाईच्या पुड्या विकतात व कोणी दुसरे 'शहा' पुस्तकांचें दुकान घालतात. बदललेल्या कालाचा हा परिणाम आहे! या वीरांच्या जन्मस्थानां-च्या नांवांतहि साम्य दाखवितां येईल. शिवनेरी व जगदीशपूर-एक स्थान श्रीशंकरांचें व दुसरें श्रीविष्णूचें. शिवपूर्व नांवानें प्रसिद्ध असलेल्या स्थानीं शिवाजी जन्मले, विष्णुपूर्व नांवानें प्रसिद्ध असलेल्या ठिकाणीं कुँवरसिंह अवतार घेते झाले. रामायणीं विस्तारें करून वर्णन केलें गेलेलें 'दंडकारण्य' ही शिवरायांची संचारभूमि; तर त्याच पवित्र ग्रंथांत उल्लेखिलेल्या ताटकावन प्रदेशांत कुँवरसिंहांचा संचार. पुस्तकी शिक्षणाचा दोघांनाहि सारखाच अभाव व वीरवृत्ति वाढविणारें क्षात्रकर्म शिकण्याकडे दोघांचा सारखाच लय. गरिबांच्या दुःखानें हळहळून जाणें हाच दोघांचा धर्म व त्यांचीच कड घेऊन अन्यायाचा प्रतिकार करण्यांत देह झिजविणें हेंच दोघांचें अवतारकार्य! दयावृत्ति धारण करणारा

मनुष्य स्वतांची शक्ति परक्याच्या उपयोगांत आणल्या कारणानें शक्तिहीन बनतो म्हणून दया करणें हेंच ज्याचें आद्य तत्त्व आहे अशा ख्रिस्ती धर्मावर तोंडसुख घेणारे कांहीं पाश्चात्य पंडित आतांशा निर्माण होऊं लागले आहेत. परंतु या तत्त्वाच्या मागें लागून फसगत झालेल्या जर्मन राष्ट्राची मध्यंतरीं वाटेल त्यानें कींव करावी अशी अवस्था त्याला प्राप्त झाली होती. धर्म कोणताहि असो त्यांत दयावृत्ति श्रेष्ठच मानली असते. ज्याला बुद्धि नाहीं असे पशु देखील परस्परांच्या उपयोगी पडतांना आपण बघतों. मग आपण ज्या राष्ट्रांत निर्माण झालों त्या मातृभूमीच्या बंधनकर्त्याविरुद्ध जर कोणी प्रयत्न केला तर तो खचित अस्थानीं नाहीं! आतां, कुवरसिंहांच्या सदय अंतःकरणाची साक्ष पटविणाऱ्या कांहीं गोष्टी सांगू या—

**गोष्ट पहिली—**

आरा येथील कुँवरसिंहांच्या जमीनदारी इस्टेटीनजीक एका गरीब ब्राह्मणाचें घर होतें. 'ब्राह्मण' या नामाला 'गरीब' हें विशेषण, 'इंग्रज' या नामाला 'धूर्त' या विशेषणाइतक्या सहजपणानें लागतें. ब्राह्मणांचें उदरंभरण ज्या अनेक मार्गांनीं होतें, त्यांतील एक मार्ग 'भिक्षुकी' हा आहे. भिक्षावृत्ति एकदां स्वीकारली म्हणजे मानापमानाचें सुखदुःख विसरावें लागतें. मनुष्य पुष्कळदां चारित्र्यहीन होतो. आपण भीक मागावी व शेजारच्या श्रीमंतानें मनमुराद मौज मारावी याचें वैषम्य गरिबाला फार बोंचतें. परमेश्वरनिर्मित सगळी मानवजाति. मग तिच्यांत असा फरक त्यानें कां करावा? असा सात्त्विक सोवळेपणाचा प्रश्न कित्येक वेळीं दरिद्र्यांचे मनांत डोकावतो. हाच प्रश्न फार गरिबांच्या मनांत एकाच वेळीं उत्पन्न होऊं लागला म्हणजे श्रीमंत व गरीब

या दोन वर्गांत झगड्याला सुरुवात होते व अशान्ततेचें साम्राज्य माजतें. 'पोट व अवयव' ही गोष्ट कोण जाणत नाहीं? सर्व जाणतात. पोटानें अवयवांना जीवनरस पुरवावा हा निसर्गनियम आहे. असें असतांना किती श्रीमंत 'पोटें' गरीब 'अवयवांना' पूर्णांशानें अन्नरस देतात? विधिघटनेचें हेंच मायावी स्वरूप जगाच्या आरंभापासून त्याच्या अंतापर्यंत समाजशांतीचा भङ्ग करीत राहणार! कुँवरसिंह धनी आहेत, त्यांच्या बगीचांत खूप फुलझाडें आहेत व आपण तीं घेतल्यास देवाला वाहतां येतील अशा इच्छेनें ब्राह्मणानें रोजच्या रोज सकाळीं उठून फुलें चोरून नेण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत ब्राह्मण पकडला गेला. कुँवरसिंहांच्या नोकरांनीं त्याचें पापकर्म कुँवरसिंहांजवळ विदित केलें व त्याला कांहीं तरी ताकीद देण्यास विनविलें. कुँवरसिंहांनीं त्या चोरीचा हेतु लक्षांत आणून आपल्या फुलझाडांच्या जमिनी-पैकीं एक तुकडा त्या ब्राह्मणाला इनाम करून दिला व त्याला योग्य तऱ्हेनें परमेश्वर-पूजन करण्यास सांगितलें.

**गोष्ट दुसरी —**

आपल्या उत्तुंग शिखरांनीं हिंददेवीच्या शिरोभागावर मुकुटा-प्रमाणें विलास करणारा नगराज हिमालय कोणाला ठाऊक नाहीं? सर्वच त्याला जाणतात व त्याच्या वैभवानें विस्मय पावतात. त्या अद्रिपतीच्या पदकमलांवर आपलें अंग लडिवाळपणानें टाकून आजहि स्वातंत्र्य भोगीत असलेला नेपाळ प्रांत आनंदानें पहुडत असलेला आपणांस दिसतो. नेपाळमधील रहिवासी लोक पशुपति-नाथाचे पूजक आहेत. आपल्या भूतगणांसह गळ्यांत नररुंडमाला घालून विक्राळ ताण्डवनृत्य करण्यांत आनंदून जाणारें रुद्रस्वरूप भ्याडांना तर भिववतेंच पण शूरांना देखील क्षणभर कंपित केल्या-

शिवाय राहत नाहीं. भक्तांची परमेश्वरावरील श्रद्धा एक तर प्रेमामुळें असते अथवा त्या भक्तीच्या पार्श्वभागीं भीति ही भावना असते. भीतियुक्त भक्ति हीच श्रद्धा उत्पन्न करण्यास मुख्यत: कारण बनते. पशुपतेश्वराला नरबलि लागत असतो. नेपाळी लोक पशुपतेश्वराचे पूजक आहेत—ते त्याला भाविक अंत:करणानें भजतात. देवाला देण्याकरितां का होईना, पण नरमेध करणाऱ्या लोकांची मनोरचना आपण अगदीं सहज आकलन करूं शकूं. गाई-बकऱ्या कापणारे खाटीक क्रूर असतात. प्रसंग आल्यास गाईच्या मानांवर चालणाऱ्या सुऱ्या माणसांचे मानांवर देखील चालूं शकतात ह्या गोष्टी आपल्या नेहमींच्या प्रत्ययाच्या आहेत. नेपाळी लोक देखील दयारहित आहेत. नेपाळी जातीच्या रणदलनसिंह नामक एका मनुष्यानें एकदां एक खून केला व शिक्षेच्या भयानें तो आश्रयार्थ कुँवरसिंहांकडे आला. अपराधाची पूर्ण कबूली देऊन 'क्षमस्व' अशी याचना कुँवरसिंहांकडे त्यानें केली. कुँवरसिंहांनीं त्याला आपल्याजवळ ठेविलें. या उपकारानें मारला गेलेला रणदलनसिंह कुँवरसिंहांची भक्ति इतक्या एकनिष्ठतेनें करूं लागला कीं, अखेर त्यास कुँवरसिंहांनीं आपला मुख्य सल्लागार नेमिलें.

**गोष्ट तिसरी—**

इंद्रियांना प्रत्यक्ष अनुभव घेतां येईल असल्या वस्तूंपेक्षां अतींद्रिय कल्पना मनाला अधिक सुखवितात व दुखवितात देखील. असल्याच भावनाप्रधान कल्पनांपैकीं धर्म ही एक कल्पना आहे. भारतवर्षाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास अवलोकन करावा. किती तरी धर्मासंबंधीं नव्या नव्या कल्पना व नवीन नवीन मतें उदय पावलीं व लोपून सुद्धां गेलीं. प्रत्येक नवमतवादी धर्ममतांचे अनुयायी जुन्या

रूढीला अनुसरणाऱ्या लोकांना शिव्या देतात व आपण कांहीं तरी नवें तत्त्व शोधून काढलें अशी प्रौढी मिरवितात. पण, जगांत नवें असें खरोखर कांहीं नाहीं. कुठच्या तरी अज्ञेय अशा शक्तीच्या जोरावर नाचणारीं मानवदेहधारी कळसूत्री बाहुलीं नवीन असें काय निर्माण करणार ? 'मी', 'मी' म्हणणाऱ्या अचाट पराक्रमी पुरुषांनीं उभारलेले मनोरे त्यांच्या आजच्या जीर्ण स्वरूपांत काय धडा शिकवितात ? ते सांगतात, "अल्पकाल मिळालेल्या यशानें फुगून जाणाऱ्या मानवांनो ! तुमची आपल्या यशाची वल्गना विफल आहे. कालचक्र त्याला मिळत असलेल्या गतीनें फिरत असतें व त्याच्याबरोबरच गतिमान अशा निरनिराळ्या मानवजाति आज एक वर, तर उद्यां दुसरी वर अशा प्रकारें 'वर-खालीं'चा नाच करतात." ह्याच क्रमानें भारतवर्षात एक काल असा आला होता कीं, ब्राह्मण धर्मावर आघात करणारे बौद्ध व जैन पन्थ यशस्वी होते. कालचक्र पुन्हा फिरलें. जिनमताचें खंडन झालें व ब्राह्मण्याचें पुन्हा स्तोम माजलें. हे जयापजय कसे झाले असतील याची कल्पना बिहार प्रांतांतील 'गया' क्षेत्रीं होते. बुद्धगया व ब्राह्मणमान्य 'गया' अशीं दोन एकमेकांजवळ तेथें वसलेलीं पूज्य-स्थानें आमच्या दुहीच्या इतिहासाचें प्रत्यंतर दाखवितात. कुँवर-सिंहांच्या वेळीं जैन व ब्राह्मण या मतांचा झगडा या प्रान्तांतहि तीव्र होता. परंतु वन्य सिंहापुढें लांडगा व शेळी जशी सारखीच नरमाईनें वागतात त्याचप्रमाणें कुँवरसिंहांच्या हुकमतीखालीं हे दोनहि धर्मपंथीय लोक एकत्र राहून सुखानें कालक्रम करीत. अन्यत्र ही गोष्ट शक्य नाहीं. आजकालहि जमखंडी संस्थानांत 'कुडची' या गांवीं जिनमतानुयायांना होणाऱ्या त्रासावरून एकाच राज्यांत भिन्न मतांच्या लोकांना वागवणें किती कठीण आहे त्याची सहज

मराठी ग्रंथ संग्रहालय

कल्पना येईल. कुँवरसिंहांना लोकांत एवढा मान होता पण त्यांना गृहसौख्य नव्हतें.

**कुँवरसिंहाचें कुटुंबः—**

शाहजादासिंहांना कुँवरसिंह सोडून आणखी तीन अपत्यें होतीं—अमरसिंह, राजपतसिंह व दयालसिंह. कुँवरसिंहांना त्यांच्या वडिलांनीं आपल्या जमीनदारीचा पाऊण हिस्सा दिला होता व बाकीच्या चतुर्थांशांत तिन्ही भाऊ आपला गुजारा करीत. आरा शहरापासून तों जगदीशपूरपर्यंत ह्या कुटुंबाच्या जमिनी पसरल्या होत्या. अमरसिंहादि बंधू आपल्या राहणींत जास्त खर्चिक असत. बहुतेक इनामदारांचीं कुटुंबें आपल्या पूर्वापार मोठेपणास आठवून खोट्या इभ्रतीच्या नादाला लागून कर्जबाजारी असतात हें आपण दरदिवशीं बघतों. कुँवरसिंहांचें घराणें या नियमाला कसें अपवाद होईल? अखेरीस इतक्या थराला गोष्ट आली कीं, सावकाराचें कर्ज फेडण्यासाठीं सर्वच जमिनी लिलावास निघण्याची वेळ आली. कुँवरसिंहांनीं पुष्कळ प्रयत्न केला; पण कर्ज इतकें भरपूर झालें होतें कीं, सर्व रकम फिटणें अशक्य दिसूं लागलें. मोठ्या मिनतवारीनें दोन महिन्यांची मुदत मिळाली. तोंच बंडाचा भडका उडाल्याच्या बातम्या येऊं लागल्या. कुँवरसिंहांना एकच मुलगा झाला पण तो यौवनदशेंतच मृत्युमुखीं पडला. एक नातू होता; तो पण वेडसर! एवंच, कुँवरसिंहांचें कुटुंबसुख यथातथाच होतें. तथापि त्यांनीं कंपनीशीं द्रोह केला नाहीं. इ. स. १८५७ च्या जून महिन्यापर्यंत खुद्द कमिशनरचीं पत्रें कुँवरसिंहांना येत होतीं त्यांवरून स्पष्ट दिसतें कीं, टेलरचाहि कुँवरसिंहांवर विश्वास होता. शाहाबाद जिल्ह्याचे कलेक्टर तर प्रसंगविशेषीं कुँवरसिंहांची प्रत्यक्ष मदत देखील घेत असत. असा एकामेकांचा खेळीमेळीचा व्यवहार

होता. परंतु जाळ्यांत सांपडलेल्या वनराजाला बायकामुलांनींहि खडे मारावेत या न्यायानें प्रसंगानें त्रस्त झालेल्या कुँवरसिंहांच्या यशाला कलङ्क लावण्याचा प्रयत्न कांहीं लोक करूं लागले. त्या वेळीं मागें अडचणीच्या प्रसंगीं कुँवरसिंहांनीं साहेबाला केलेली मदत साहेब स्मरेनासे झाले. ही मदत केव्हां झाली होती तो प्रसंग कोणता याचें विवेचन करूं.

**कुँवरसिंहांची ब्रिटिश अधिकाऱ्यांबद्दल स्नेहबुद्धिः—**

उत्तर हिंदुस्तानांत इंग्रजांविरुद्ध बंड उठल्यानंतरची गोष्ट. आरा शहरांतील तुरुंगांत अधिकारी व कैदी यांजमध्यें तेढ उत्पन्न झाली. कारण असें झालें कीं, तेथील अधिकाऱ्यांनीं तेथील हिंदु कैद्यांस रोज रोज नवीं मडकीं देण्याचें नाकारलें. ही गोष्ट आपल्या इकडच्या लोकांना तितकीशी कळणार नाहीं. परंतु काशीला जे लोक जाऊन आले आहेत त्यांना या गोष्टींतील सत्य कळण्यासारखें आहे. तिकडून जाऊन आलेलीं माणसें सांगतात कीं, दही वगैरे पदार्थ त्या बाजूला मातीच्या भांड्यांतून मिळतात व त्यांतील खाद्य पदार्थांचें सेवन केल्यानंतर तीं भांडीं फोडून टाकण्यांत येतात. तिकडल्या बाजूची धर्मकल्पना अशी आहे कीं, एकदां मातीच्या भांड्यांतून खाल्ल्यावर तें भांडें निषिद्ध समजलें जातें. आरा शहरांतील अधिकाऱ्यांना एवढी अक्कल पाहिजे होती कीं, जिकडे तिकडे धर्मनाश होईल या शंकेनें बंडाची आग धडाडत असतांना कैद्यांच्या मनाविरुद्ध वर्तन करणें फायद्याचें होणार नाहीं. तथापि, हेकेखोर अधिकारी पड घेईनात व तुरुंगांतील कैदीहि आपलें म्हणणें सोडीनात. अखेरीस कुँवरसिंहांच्या मदतीची याचना करण्याचें ठरलें. ऋणानुबंधी या नात्यानें कुँवरसिंहांनीं मॅजिस्ट्रेटच्या म्हणण्यास मान दिला. आपण स्वतः जगदीशपुरांत

राहून एका नोकरातर्फें त्यांनीं एक निरोप पाठविला— " माझी इच्छा आहे कीं, तुम्ही अधिकारी सांगतील त्याप्रमाणें वागावें." सर्व कैद्यांनीं एकमतानें कुँवरसिंहांची आज्ञा मान्य असल्याचें सांगितलें व तुरुंगांत शांतता नांदूं लागली.

नंतर आरा येथील खजिना दुसरीकडे हलवण्याची जरूरी भासूं लागली. कुँवरसिंहांनीं आपले स्वतांचे अनुचर ब्रिटिश सैन्या-बरोबर दिले व खजिना इष्ट स्थळीं पोंचविण्यांत आला. परंतु बैल आपल्या जातिस्वभावावर गेला. ( इंग्रजांना चेष्टेनें जॉन् बुल अशी संज्ञा आहे. ) आपल्याला चुचकारणाऱ्यालाच त्यानें शिंगांवर घेण्याचें ठरविलें. चुगलखोरांच्या चुगल्यांना मान देऊन कुँवरसिंहांना भेटीसाठीं कमिशनरनें पाटण्यास बोलावलें. परंतु, आधीं एका प्रसंगीं कुँवरसिंहांनीं टेलरचें म्हणणें मानलें नव्हतें. तेव्हां ह्या भेटीस बोलावण्याचा अर्थ काय होता हें न समजण्याइतके कुँवरसिंह मूर्ख नव्हते. आलेल्या दूताला त्यांनीं परत पाठविलें. ही मागची हकीगत काय झाली होती तें आतां पाहूं.

**कुँवरसिंहांना टेलरचें पाचारण; कुँवरसिंहांचा नकार; मागची थोडी हकीगतः—**

दानापूरच्या शिपायांना निःशस्त्र करण्याचा टेलरचा मानस फार दिवसांपासून होता हें आपण पाहिलेंच आहे. जमल्यास त्या कामीं कुँवरसिंहांचा उपयोग करून घ्यावा असें टेलरनें ठरविलें व त्यांना पाटण्यास बोलावून ती गोष्ट त्यांचेपुढें त्यानें ठेविली. दाना-पूरचे शिपाई शाहाबाद जिल्ह्यांतून भरती झालेले होते. त्यांच्याशीं कुँवरसिंहांचा संबंध तितका निकट नव्हता. त्यामुळें कुँवरसिंहानें उत्तर दिलें, " दानापूरचे पलटणी शिपाई जगदीशपूरनिवासी नाहींत, किंवा आरा येथील पण नाहींत; ते सर्व जिल्ह्यांतील निरनिराळ्या

स्थानांतून एकत्र केलेले आहेत. सबब आपण जें मला करावयास सांगतां तें माझ्यानें होणार नाहीं." हीच गोष्ट टेलरच्या मनाला शल्यासारखी बोचूं लागली. कुँवरसिंह मुद्दामच टाळाटाळी करतो तेव्हां त्याला अटकच केली पाहिजे असले विचार त्याचे मनांत घोळूं लागले व कुँवरसिंहांना गिरफदार करण्यासाठीं त्यानें आपल्या कांहीं दोस्तांना पण विचारलें. पण, गया येथील मॅजिस्ट्रेटनें त्याला स्पष्ट शब्दांत कळविलें कीं, "कांहीं लुंग्यासुंग्या चारदोन लोकांना तूं फांशीं देतोस हें खरें. पाटणा शहरीं झालेल्या बंडाला तूं असल्या उपायांनीं दबवूं शकलास हेंहि खरें. पण कुँवरसिंहाशीं जर असली कपटनीति लढविशील तर तूं आपल्यावर अनर्थ ओढवून घेशील."

टेलरचे एवढ्यानें डोळे उघडले नाहींत. त्यानें कुँवरसिंहांच्या एका ओळखीच्या माणसासच निरोप दिला कीं, "कमिशनर अगदीं जरूरीच्या कामासाठीं तुम्हांला बोलावीत आहे, निघून यावें." अजीमुद्दीन हुसेन निरोप घेऊन निघाला व त्यानें तो सांगितल्याप्रमाणें कुँवरसिंहांना पोंचविला देखील. कुँवरसिंहांच्या कानांवर पाटण्याची घटना होतीच. त्यांच्या मनांत पुढील विचार आले असावेत:—

पाटणा येथील मौलवींना टेलरनें विश्वासानें बोलावलें होतें! त्यांचा विश्वासघात करून त्यांना त्यानें तुरुंगांत डांबून ठेविलें! आज मला तो बोलावीत आहे—तेव्हां मलाहि तो कैदेंत टाकील, यांत संशय नाहीं. कुँवरसिंहांनीं दूताला विचारलें, "टेलर मला तुरुंगांत तर टाकणार नाहीं ना?" दूत स्तब्ध राहिला. कुँवरसिंहांनीं परत निरोप पाठविला, "प्रकृति बरी नाहीं, बरें वाटल्यावर येईन." या प्रकरणीं दोष कोणाचा तें आतां पाहूं—

**यांत दोष कोणाचा ? :—**

टेलरनें आमंत्रण दिलें व कुँवरसिंहांनीं तें स्वीकारिलें नाहीं यांत आमंत्रण करणाराची चूक होती, कीं आमंत्रण नाकारणाराची चूक होती हें प्रथम पाहिलें पाहिजे. मागील विवरणावरून आपल्याला स्पष्ट दिसून येईल कीं, टेलरला काय वाटेल तें करून आपली तहान काळ्या लोकांच्या रक्तानें शमवावयाची होती. त्याचा तो जाणून बुजून प्रयत्नच चालला होता. त्याच प्रयत्नाचें एक अंग म्हणजे कुँवरसिंहांना गिरफदार करण्याचा प्रयत्न. कुँवर-सिंहांना सांगितलेलीं सगळीं कामें त्यांनीं आजपावेतों बिनबोभाट केलीं. तेव्हां दानापूरच्या शिपायांचीं हत्यारें काढून घेण्यास मदत करण्याचें कामहि त्यांनीं करावयास पाहिजे अशी त्याची अपेक्षा होती. पण ज्याला जें ओझें उचलेल त्याला तें द्यावें. अधिक देऊन तें न उचललें गेल्यास तो दोष उचलणाराचा नसतो, देणाराचा असतो. टेलरला ठाऊक होतें कीं, कुँवरसिंहांवर अडचणीचा प्रसंग आलेला होता. आपली पूर्वपरंपरागत चालत असलेली जमीन कर्जापोटीं सावकार जप्त करील अशी त्यांना वाटत असलेली भीति टेलरला माहीत होती. त्यांना कर्ज मिळम नव्हतें हेंहि तो जाणत होता. अशा प्रसंगीं त्याना पकडून तुरुंगांत घालण्याचा अश्लाघ्य प्रयत्न करणें अत्यंत दुष्टपणाचें होतें. 'गंडस्योपरिपीटिका' किंवा जखमेवर मिठाचें पाणी, असला हा प्रकार होता. अशा प्रसंगीं आजूबाजूची परिस्थिति आपणांस कितपत अनुकूल अगर प्रतिकूल आहे ह्याचा अंदाज बांधण्यासाठीं जर त्यांनीं हरेकृष्णसिंहाला कोठें पाठविलें असलें तर त्यांत वावगें असें काय झालें ? भांबावलेला माणूस भ्रमिष्टासारखें आचरण करीत असतो. त्याला माहीत नसतें लोक आपल्या कृतीकडे

कोणत्या दृष्टीनें बघतात तें! हरेकृष्णसिंहालाहि असें वाटलें असावें कीं, आपला मालक ज्या अर्थीं आपणांस दानापुरास पाठवीत आहे व ज्या अर्थीं तो विपत्तींत आहे त्या अर्थीं त्याची इच्छाच असावी कीं, आपण बंडांत भाग घ्यावा. पण कुँवरसिंहांनीं एका शब्दानेंहि तशी सूचना त्याला दिलेली नव्हती. तेव्हां कशा युक्तीनें हरेकृष्णानें आपल्या धन्याच्या मानेला पाश लावला तें भाषण बघितलेंच आहे. बिहारी बंडवाल्यांचा धुरीणपणा कुँवरसिंहांकडे आला यांत कुँवरसिंहांचा दोष नव्हता. तशी परिस्थिति निर्माण झाली व विकारवशतेच्या भरांत त्यांनीं विद्रोहाच्या आवर्तांत उडी टाकली.

**कुँवरसिंह व अमरसिंह:—**

दानापूरच्या शिपायांनीं आरा शहरीं येऊन कुँवरसिंहांच्या गळ्यांत सेनापतिपदाची माळ तर टाकली. या नवीन आलेल्या जबाबदारीनें त्यांना उत्साह तर आला नाहींच; पण ते चिंतामग्न झाले ही गोष्ट आपण वाचली. या चिंतेला कारणहि तसेंच होतें. त्यांच्या आप्तांपैकीं एकानेंहि या बंडास सामील होण्यास त्यांना संमति दिलेली नव्हती. सर्वांना इंग्रजी शक्तीचें सामर्थ्य माहीत होतें. आपण जमीनदार किती क्षुद्र? आपल्या शक्तीच्या जोरावर ब्रिटिश साम्राज्याशीं कसली टक्कर दिली जाणार? आणि समजा, कीं कांहीं काल युद्धप्रसंग यशस्वी झाला तरी अखेरपर्यंत आपण कशी तड पोंचविणार? असले प्रश्न सगळ्यांच्या मनांत उद्भवूं लागले. कुँवरसिंहांच्या बंधुवर्गानेंहि आपल्या शंका पूर्णपणें कुँवरसिंहांपुढें मांडल्या. पण, टेलरच्या बोलावण्याचें काय करणार? हाहि प्रश्न सोडविणें फार कठीण होतें. एका बाजूला, असहाय स्थितींत एकाद्या फांसाच्या दोरीला लटकून अगर एकाद्या तोफेच्या तोंडीं

बांधलें जाऊन मरण, तर दुसऱ्या बाजूला जगांतील एका पहिल्या दर्जाच्या राष्ट्रांतील शक्तिसर्वस्वाविरुद्ध लढत लढत लढाईंत येणारें मरण हा पेंच कुँवरसिंहांना पडला. मानधन क्षत्रिय वीरोचित मृत्यूला कधींच भीत नाहीं. हसत मरण्याच्या प्रेमपंथाला जाण्याचें कुँवरसिंहांनीं ठरविलें; व अमरसिंहानें वडील बंधूंची साथ केली. बंधुप्रेम त्याला म्हणावें कीं, ज्या प्रेमासाठीं भयाण मृत्यूच्या घोर दाढेंत भरडून निघण्याची देखील तयारी असते. भ्याडांना मृत्यु भिववितो. शूरांना तो उत्साहानें लढावयास लावतो. स्वदेशीयांचे प्राण परक्यांच्या खड्गांना बली देऊन मिळणाऱ्या जहागिऱ्याहि कांहीं घेतात. पण स्वदेशाला तारण्याच्या कामांत स्वतःचें वित्तार्पण व प्राणार्पण करणारेहि कांहीं असतात. मातृभूमीचें तोंड रक्तवर्ण करण्यास मदत करणारांना येवढेंहि समजत नाहीं, कीं त्यांच्याहि तोंडाला पीतवर्ण फासला जातो. अमरसिंहानें वडील बंधूंना आपल्याकडून जें सांगावयाचें तें सांगून सोडलें होतें. पण कुँवरसिंहांनीं बंडांत भाग घेतला म्हणून त्यांना तो विन्मुखहि झाला नाहीं. स्पर्धेनें एकमेकांच्या उरावर बसणारे भाऊ आमच्याकडे शेंकडयांनीं सांपडतात तरी, कुँवरसिंह आणि अमरसिंह असलीं हीं भावंडें कधीं कधीं निर्माण होतात ! कुँवरसिंहांनीं आरा येथें आश्रय घेऊन राहिलेल्या इंग्रजांकडे आपली दृष्टि प्रथम फेंकली.

## इंग्रजांचें आरा शहरांतील आश्रयस्थान:—

प्राणरक्षणार्थ इंग्रज ज्या ठिकाणीं राहिले तें स्थळ दुमजली होतें. चारी बाजूंनीं तें खुलें होतें व सगळ्या दिशांना गच्ची केलेली होती. नव्या मनूचे निदर्शक असे लोहमार्ग आरा शहरीं त्या वेळीं नवीनच बांधले जात होते व ज्या इंजिनिअरच्या देखरेखीखालीं तें काम

चाललें होतें त्या इंजिनिअरला राहण्यासाठीं म्हणूनच तें बांधण्यांत आलें होतें. शत्रूंचा हल्ला आलेला पाहून सर्व इंग्रज या घराच्या आश्रयानें राहूं लागले व राजनिष्ठ शीख त्यांचें संरक्षण करूं लागले. आरा शहरीं कोणी लष्करी अधिकारी नव्हता. तेव्हां तेथील मॅजिस्ट्रेट व इंजिनिअर ह्या दोघांनीं आपल्यावर पुढारीपणाचें काम लादून घेतलें. जरूर उत्पन्न झाली म्हणजे कल्पनाशक्ति चांगलें काम करते. इंजिनिअरनें सर्व गच्च्यांवर वाळूचीं मोठमोठीं पोतीं रचून ठेवलीं व त्यांचे आडून हल्ला करणाऱ्या बंडवाल्यांवर गोळ्या चालविण्यास आपल्या शिपायांना सांगितलें. पुढें असा कांहीं प्रसंग येईल हें जाणूनच युरोपियन लोकांनीं या घरांत साखर, बिस्किटें, दारू व पीठ हीं सर्व भरून ठेविलीं होतीं. त्यामुळें खाण्यापिण्याची फारशी पंचाईत नव्हती. बंडवाल्यांनीं शहरांतील तुरुंग व खजिन्यांतील राहिलेला पैसा यांचा प्रथम समाचार घेतला व इंग्रजांच्या आश्रयस्थानाकडे आपली दृष्टि वळवली. मोकळ्या मैदानांतून बंडवाल्यांना लढावें लागत होतें व संरक्षित इमारतींतून इंग्रज व शीख लढत होते. त्यामुळें लढाईत यशाची माळ इंग्रजांचे गळ्यांत पडली. कारण कीं, बंडवाल्या शिपायांच्या गोळ्या वाळूच्या पोत्यांना लागत व इंग्रजांच्या गोळ्या मात्र बंडवाल्यांचे बळी घेत. निराशेचें शौर्य कांहीं और असतें. बंडवाल्यांच्या हातीं लागल्यास आपली चटणी उडून जाईल ही कल्पना इंग्रजांना व त्यांचें सहाय करणाऱ्या शीख शिपायांना विलक्षण स्फुरण उत्पन्न करीत होती. त्यांना माहीत नव्हतें कीं, आपल्याविरुद्ध लढणाऱ्या बंडवाल्यांचा नायक अजूनहि स्थिरचित्त झालेला नव्हता. नाहीं तर १६ इंग्रज व ५० शीख एवढ्या लहानशा संख्येला कुँवरसिंह विजयी होऊं देते ही गोष्ट शक्य नव्हती.

**कुँवरसिंहाची विमनस्कता:**—हिंदु धर्मांतील अत्यंत ओजस्वी पण प्रसंगविशेषीं अत्यंत हानिकारक ठरणारी अशी जर एकादी कल्पना असेल तर 'क्षमाशीलता'. क्षमा कोठें करावी यासंबंधीं अगदीं स्पष्ट निर्णय निरनिराळ्या जागीं आपणांस बघावयास मिळतात. प्रभु रामचंद्र एका प्रसंगीं असेच गडबडले होते. ताटका राक्षसी आपला अक्राळ विक्राळ जबडा पसरून चालून आली. बाण टाकावा तर स्त्रीहत्या होणार असली कल्पना रामचंद्रांच्या मनाला कष्टवूं लागली. परंतु विश्वामित्रांनीं त्यांना सांगितलें, " रामचंद्रा, स्त्रीजाति जर आपला वध करण्यास उद्युक्त झाली तर तीहि वधार्ह आहे." शब्द कानीं पडण्याचा अवकाश, रामचंद्रांनीं आपल्या बाणासहवर्तमान स्त्रीजातीबद्दलचें प्रेम बाहेर टाकलें व ताटका आपला अवतार संपविती झाली. " आततायी कोणीहि असो तो जर प्राणघातास उद्युक्त होत्साता चालून आला तर त्याला विचार न करतां ठार करावें " असा स्पष्ट दण्डक आपल्या शास्त्रकारांनीं आपल्यासमोर ठेविला आहे. परंतु दुर्दैवाचा फेरा आला म्हणजे भलत्या वेळीं भलते विचार सुचूं लागतात. कोठल्याहि प्रसंगीं संदेहाची उत्पत्ति कार्यनाश केल्याशिवाय राहत नाहीं. असलाच संदेह— साहेबजातीविषयीं घृणा— या प्रसंगीं कुँवरसिंहांच्या मनांत उत्पन्न झाली व उद्दिष्ट कार्यांत ते सफलता पावूं शकले नाहींत. अगदीं थोड्या दिवसांपूर्वीं ज्या मॅजिस्ट्रेटला आपण साहाय्य केलें त्याचेविरुद्ध आपण आतां लढणार व प्रसंगविशेषीं त्याचे व त्याच्या अनुचरांचे प्राणाहि घेणार ही कल्पना कुँवरसिंहांना जहराप्रमाणें बोचूं लागली व ठाम निश्चय ठरविण्यास त्यांना एक आठवडा तरी लागला असावा असें दिसतें. कारण, इंग्रज व शीख ज्या घरांत राहिले होते त्या घराचा नाश कुँवर-

सिंह करूं शकले नाहींत व अखेर मदत मिळून त्यांची सुटका झाली एवढेंच नव्हे; तर युद्धाचा डाव कुँवरसिंहांवर उलटला. इंग्रजांच्या आश्रयस्थानावर अशा तऱ्हेच्या मनःस्थितींत असतांच कुँवरसिंहांच्या लोकांनीं हल्ला चढविला.

## कुँवरसिंहांचा आरा येथील इंग्रजांवर पहिला हल्लाः —

आडोसा घेऊन राहिलेले इंग्रज व शीख एकीकडे व उघड्यावरून लढणारे बंडवाले दुसरीकडे अशा प्रसंगीं उघड्यावर लढणाऱ्या लोकांनाच मागें हटावें लागलें हें उघड आहे. बंडांत सगळ्या ठिकाणीं हीच तऱ्हा झाली. शिपायांनीं ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध बंड करावें व प्रत्यक्ष लढण्याचा प्रसंग आला म्हणजे मग जागें व्हावें अशी गंमत आपल्याला प्रत्येक ठिकाणीं बघावयास सांपडते. प्रस्तुत कालाच्या लढाया भारतकालीन नाहींत, कीं ज्यांत संख्याबलानें किंवा शक्तिबलानें विपक्षीयांना जिंकतां येईल! ज्याच्याजवळ युद्धसामुग्री अधिक तो यशस्वी असा हल्लींच्या लढाईचा नियम आहे. बंडवाल्यांना येवढी सारासार बुद्धि नव्हतीच. अविचाराचा कैफ चढल्यामुळें ते विद्रोही बनत व तो कैफ उतरला म्हणजे आपल्या असहायतेची कल्पना त्यांना येई. परंतु नंतर, आपण ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध बंड करणारांच्या रांगेंत सांपडल्यामुळें इंग्रजांच्या हातीं सांपडल्यास प्राणदण्ड होणारच म्हणून निकरानें लढून मरूं या असा कांहीं वीरवृत्तीचे शिपाई विचार करीत. पण कांहीं भीरु वृत्तीचे शिपायी पळून जाऊन आपला जीव वांचविण्याचा मार्ग काढीत. कुँवरसिंहांचे शिपाई भ्याड नव्हते. पण निष्कारण प्राण देण्याचीहि त्यांची तयारी नव्हती. अखेरीस त्या घराच्या आजूबाजूस लाकडाचे ओंडे पेटवून आग लावून देण्याची कल्पना निघाली व अमलांत पण

आणली गेली. परिणाम मात्र उलट झाला. वारा उलटा वाहूं लागला व इंग्रजांना त्रास होण्याचेऐवजीं बंडवाल्यांनाच मागें हटावें लागलें. वाऱ्याची आणि इंग्रजांची काय दोस्ती आहे कोणास ठाऊक ? जेव्हां जेव्हां शत्रु इंग्रजांवर चाल करून त्यांचा नाश करावयास इच्छितात तेव्हां तेव्हां वायुदेव इंग्रजांनाच सहाय करतो व त्यांच्या शत्रूंना पळावयास लावतो. अशा तऱ्हेनें इकडे बंडवाले अपयशी होत असतां दानापूरचे गोरे लोकहि स्वस्थ बसलेले नव्हते. त्यांनीं आरा शहरीं वेढल्या गेलेल्या आपल्या दोस्तांना सोडविण्याचें ठरविलें.

स्थळ प्रत
सं. नं.
ता.

**दानपुराहून कुमकेची रवानगी:—**

निमूटपणानें हत्यारें देण्याचें सोडून शिपाई बंड करून चालते झाले ही गोष्ट दानपूरच्या मुख्य अधिकाऱ्यास फार दुखविती झाली. शिपायांचीं हत्यारें काढून घेऊं नयेत म्हणून त्यानें फार खटपट केली होती. परंतु कसलाहि उपाय न होतां अखेरीचा मार्ग आपणांस स्वीकारावा लागला या कल्पनेनें तो कष्टी झाला. सैनिकांवर त्याचें प्रेम होतें. परंतु तो काय करणार ? पुरुष हा अर्थाचा दास असतो त्यामुळें ज्याचा पैसा आपण खातों त्याचें कार्य करणें आपणांस जरूर असतें. इ. स. १८५७ सालचें बंड पसरण्यास जीं कांहीं कारणें झालीं त्यांतील एक मुख्य कारण अधिकाऱ्यांची ही असली बावरलेली मनोवृत्ति असें सांगतां येईल. होऊं नये तें झालें, आतां पुढें काय असाहि प्रश्न त्याचेसमोर उभा राहिला व त्या प्रश्नाचें उत्तर आपल्या कल्पनेप्रमाणें त्यानें दिलें. दानापूर छावणीला दोन शहरें जवळ– पूर्व बाजूला पाटणा व पश्चिम बाजूला आरा. त्याची कल्पना कीं, बंडवाले सैनिक पाटणा

शहरीं जातील. म्हणून त्यानें ५०० गोरे शिपाई पाटणा येथें पाठविले व बाकी राहिलेले आरा शहरीं पाठविण्याचें ठरलें. याच वेळीं कांहीं युरोपियन मडमा कलकत्ता येथें पोंचविण्यासाठीं अलाहाबादेहून निघालेलें एक जहाज दानापुरास आलें. दानापुरची घटना ऐकून त्यांतील शिपायांनींहि 'आरा' येथें जाण्यास संमति दिली. पण दैवहत मनुष्य जेथें जातो तेथें अनर्थपरंपराहि जात असते. शोणनदी ओलांडून आरा शहरीं जावें लागतें म्हणून कांहीं सैनिक नावेंत बसवून नाव सोडली. दुर्भाग्यवशात् ती कांहीं अंतर चालून गेली नाहीं तोंच वाळूंत फसून बसली. लाइड् साहेब-दानापूरचे गोरे अधिकारी–सैनिकांनीं परत यावें अशा मताचे होते; पण टेलरसाहेबांचें मत तसें पडलें नाहीं. त्यांनीं पुन्हा प्रयत्न करण्यास सांगितलें व दुसरी नाव पहिल्या नावेचा उद्धार करून तिला पैलतीरीं न्यावयासाठीं सोडण्यांत आली. दोनाहि नावांत मिळून साधारण चारशें सैनिक आराकडे निघाले. या सेनेचें आधिपत्य कॅप्टन् डन्वर् या अधिकाऱ्याकडे होतें.

### गांगीची लढाई, ३० जुलै १८५७, कॅप्टन् डन्वर्‌चा पराभव आणि मृत्यु:—

दानापुराहून आरा येथील इंग्रजांना मदत करण्यास जी फौज निघाली तिला पहिली नाव रुतून बसल्यामुळें अपशकुन झाल्यासारखें झालें. कार्यसिद्धि व्हावयाची असली म्हणजे विलंब लागत नाहीं. उलट व्हावयाचें असलें म्हणजे अकल्पित अशीं लहान मोठीं विघ्नें यश:सिद्धीच्या मार्गांत येतात. पहिल्या नावेंत बसून जेव्हां गोरे शिपाई निघाले तेव्हां जो सेनापति योजिला गेला होता त्यानें निरुत्साह होऊन सेनापतिपदाचा त्याग केला व कॅप्टन् डन्वर् याला अगदीं आयत्या वेळीं सेनाध्यक्ष बनवण्यांत आलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८४५९

नदींतून उतरल्यानंतर आरा हें शहर किनाऱ्यापासून ६ मैल दूर राहतें. तरुणपणाचा जोर कांहीं और असतो. काळे शिपाई ते काय? त्यांना सहज चिरडून टाकूं अशा उमेदीनें डन्वर्नें आपल्या सैन्याला एकदम कूच करण्यास सांगितलें. इंग्रजी तरुण अधिकाऱ्यांचा अविचारी धाडशीपणा सगळीकडे सारखाच फळाला येतो असें दिसतें. सप्तवार्षिक युद्धाच्या आरंभीं फ्रेंचांना मदत करणाऱ्या रेड इंडियन लोकांविरुद्ध कर्नल ब्रॅडॉक् नांवाचा अधिकारी असाच चालून गेला होता. ब्रॅडॉक्नेंहि अशीच वल्गना केली होती कीं, रेड इंडियन्सची बिशाद काय? इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातांखालीं शिकून तयार झालेल्या कवायती फौजेच्या नुसत्या दर्शनानें थरकांप होऊन ते पळून जातील. मग समोरासमोर लढण्याची तर गोष्टच नको! पण तसें घडलें नाहीं. जंगलांतून कूच करीत असतांना एका अडचणीच्या जागीं गांठून झाडांतून दडून बसून तांबड्या इंडियनांनीं ब्रॅडॉक्ला आपल्या आकाशांतलि बापाचे भेटीस पाठवून दिलें. अगदीं तीच गोष्ट या ठिकाणीं घडून आली. रात्रीच्या वेळीं झाडांचे आड लपून बसलेल्या कुँवरसिंहांच्या शिपायांनीं डन्वर्चा मुडदा तर प्रथम पाडलाच; पण त्याच्याबरोबरच्या अंदाजी २०० शिपायांस मृत्युमुखीं ढकललें. गोळ्याच संपल्या म्हणून नाइलाज झाला. नाहीं तर ५० शिपाई देखील परत दानापुरास पोंचले नसते. अशा तऱ्हेनें पराभूत झालेली इंग्रज सेना दानापुराकडे परत निघाली.

**इंग्रजी सेनेचें पलायनः—**

अशा तऱ्हेनें कुँवरसिंहांच्या शिपायांकडून पराभूत झालेली इंग्रजी फौज परत दानापुरास निघाली. नदीवर नावा टाकण्यास त्या गोऱ्या शिपायांनीं नावाड्यांना सांगितलें व नावाड्यांनीं त्या

टाकल्या. शत्रु संकटांत सांपडला असतां त्याच्यावर घाव घालण्यांत भारतीयांना कधींच भूषण वाटत नाहीं. क्षमा व औदार्यवृत्ति यांनीं जन्मतःच परिपूर्ण असलेल्या आम्हांला शाळांच्या क्रमिक पुस्तकांतून आजच्या शाळांतून हॅनिबॉल्च्या औदार्याचे धडे दिले जातात. इतक्या लांबचीं उदाहरणें कशाला द्यावयाला पाहिजेत ? अखिल जगताला दिपवून टाकील अशी आमच्या भारतखंडांतील लहानांतल्या लहान रस्त्यांच्या बारक्यांतल्या बारीक कोपऱ्यांतून हॅनिबॉल्ची क्षमाशीलता भरून राहिलेली आहे ! जेत्यांनीं जितांना पूर्णपणें जिंकण्यासाठीं ज्या कांहीं युक्त्या योजावयाच्या असतात त्यांत जितांचीं अंतःकरणें जिंकणें हें एक अवघड कार्य करावयाचें असतें आणि म्हणूनच शाळांतील पाठ्य पुस्तकांतून परकीय शूरांचीं चरित्रें वर्णिलेलीं असतात. अशा करतां कीं, जित राष्ट्रांतील कोंवळ्या अर्भकांचे मनोभूमीवर तिकडील शूरांचीं चित्रें रंगावींत व त्यांच्या स्तुतीचे पाठ त्यांनीं गावेत. पहा बरें; आज आपण जर एकाद्या कोणत्याहि आंग्लविद्यालयीन विद्यार्थ्याला विचारलें कीं, जगांतील मोठा योद्धा कोणता ? तर तो चटकन् सांगेल, 'नेपोलियन'. परंतु आपल्या इकडील शिवाजीचें नांव तो हमखास विसरेल. हें परिस्थितीचें सत्यकथन आहे व तें क्षोभजनकहि आहे. परंतु आज तरी हें मोहपटल आमच्या डोळ्यांवर एवढें मोठें आवरण घालीत आहे कीं, तें लवकर दूर होण्याचीं चिन्हें फारशीं दिसत नाहींत. तरी पण निराशेनें तीं दूर करण्याचा शिक्षित अंतःकरणांनीं आपल्या जाज्वल्य स्फूर्तीनें प्रयत्न केल्यास तीं दूर होणें अशक्य मात्र नाहीं ! आनंदवनभुवनांत श्रीरामदासांनीं यत्नालाच देव म्हटलेलें आहे. असो. अंधारांत घाव न घालावा अशा उदात्त हेतूनें नावाड्यांनीं नावा दिल्यावर त्यांत ज्याला जी जागा सांपडली ती पकडून

राहिलेले कांहीं गोरे दानापुराजवळ आले. लांबून नावा दिसूं लागल्या तेव्हां दानापुरांत मुक्काम करून असलेल्यांना आशा वाटली कीं, आतां आपणांला आरामधील आपले बंधुजन दृष्टीस पडणार. पण सत्यस्थिति निराळी होती.

**पराभूत सेनेचें दानापुरांत पुनरागमन:—**

आरामधून मुक्त केलेले आपले भ्रातृजन आतां आपणांस भेटणार अशा उत्कंठेनें दानापुरांतील इंग्रज आरा मुक्कामाहून परत येत असलेल्या नावांकडे बघत होते. सुटका झालेले लोक आपल्याला भेटल्यावर आपण त्यांचें मोठें स्वागत करूं; त्यांना तेथें खावयास न मिळालेले पदार्थ देऊन त्यांना आपण सुखवूं व प्रभुकृपेनें त्यांची सुटका झाली म्हणून सर्व मिळून प्रभुप्रार्थना करूं; असले विचारतरंग दानापुरास असलेल्या इंग्रजांचे मनांत एकामागून एक उठत असावेत ! आणि ते तसे उठले नसतील तरच आश्चर्य. जगांत "मी व माझें" या बंधनकारक पदांतून कोण सुटला आहे ? आद्य शंकराचार्यांनीं आपल्या सुंदर धन्याष्टकांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, जगांत तेच खरे धन्य कीं, ज्यांनीं 'मम' व 'अहम्' हीं दोन बंधनकारक पदें सोडून, मान व अवमानाला सारखें मानलें आहे व आपण करीत असलेल्या क्रियेचा कर्ता कोणी तरी तिसराच जो आहे त्याचे चरणीं आपण करीत असलेलीं कर्मै अर्पण केलीं आहेत. एवढें धन्य होण्याचें भाग्य पश्चिम बाजूला सांपडावयाचें नाहीं. तें तसें सांपडावयाचें असतें तर तुझें तें माझें व माझें तें तर माझें आहेच अशा कोटिक्रमानें स्वार्थबुद्धीची पराकाष्ठा होऊन परप्रदेश जिंकण्याची अनावर दुर्वासना तिकडील लोकांना झाली नसती ! आत्म्याचा विकास तेथें होतो कीं, ज्या वातावरणांत इंद्रियजन्य विषयांची किंमत कवडी देखील होत नाहीं. पण इकडे बघावें तर

सोन्याच्या खाणींचा शोध लागला म्हटल्याबरोबर इंग्लंडमधून जें उड्डाण केलें जातें तें दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलेशिया येथपर्यंत पोंचतें. आशेच्या शतपाशांनीं बद्ध झालेले लोक कामक्रोधपरायण होऊन अन्यायानें मिळणाऱ्या अर्थाचा देखील संचय करण्यास सोडीत नाहींत. भारताच्या प्रस्तुत जेत्यांच्या पूर्वजांनीं भारताचें अपहरण करतांना असे कोणते दिग्विजय केले आहेत कीं, ज्यांत लांचलुचपतींचें पाप भरलेलें नाहीं? परंतु— गतकालाचा शोक फुकट असल्यामुळें तो न करावा हेंच खरें. आपलेपणाचे भावनेनें वाट बघणाऱ्या दानापुरस्थ इंग्रजांना शूरत्वाच्या वल्गना करीत आरा येथें गेलेल्या चारशें सैनिकांपैकीं फक्त पन्नास सैनिक धड अंगानें परत आलेले दिसले. हा देखावा पाहून एकच आकान्त झाला. तथापि इंग्रजांची चिकाटीच विलक्षण असते. ते धीर सोडीत नाहींत. त्यांनीं फिरून प्रयत्न करण्याचें निश्चित केलें.

**मॅंग्लस् व मॅक्डोनल्ड्—**

हे दोन गोरे अधिकारी या झटापटींत फार प्रामुख्यानें चमकले. हे फौजी अधिकारी नव्हते. मॅंग्लस् हा टेलरच्या हाताखालीं काम करीत असे व मॅक्डोनल्ड् हा आराचा मॅजिस्ट्रेट होता. तथापि शिकार करण्याच्या नेहमींच्या व्यवसायानें बंदुकीचें निशाण मारण्यांतहि त्यांचें हस्तलाघव प्रसंगविशेषीं दिसून येई. पराभूत सेना इकडेतिकडे पळून जात असतां येवढ्याच दोन मुलकी अधिकाऱ्यांचें धैर्य स्थिर होतें. सबंध दिवस अन्नपाण्यावांचून काम करून सुद्धां ते आपल्या कर्तव्यापासून च्युत झाले नाहींत. बंडवाल्या शिपायांच्या गोळ्यांनीं जखमी झालेल्या आपल्या कित्येक सोबत्यांना त्यांनीं पाठीवर वाहून नेण्याचें काम केलें व अखेरीस सहा मैलांचा प्रवास संपवून नावांपर्यंत त्यांना पोंचविलें. आपल्या प्राणांवर घेतलें

स्थळ प्रत

असतांहि दुसऱ्यांचें प्राणरक्षण करण्याची संयमी वृत्ति उदार पुरुषांचेच ठिकाणीं आढळते. इतरांचे ठिकाणीं नाहीं. अशा तऱ्हेचे संयमी पुरुष आपल्या जननींच्या कुशींना पवित्र करतात व कुलांचा महिमा वाढवितात. त्यांचीं चरित्रें अनुकरणीय बनतात व दिव्याच्या एका ज्योतीवर जशी दुसरी ज्योत लागावी व प्रकाशाचा विस्तार व्हावा त्याप्रमाणें असलीं उदाहरणें एकापासून दुसऱ्याला स्फुरण उत्पन्न करतात व ज्या देशांत असलीं नररत्नें पैदा होतात त्या देशांचें तीं नांवहि वाढवतात. सर्वत्र बंडाचा वडवानल आ पसरून ब्रिटिश जीवांचा स्वाहाकार करीत असतांहि जर ब्रिटिश राज्य शिरसलामत सुटलें असेल तर ते असल्या पुण्यकर्म्यांच्या पराक्रमामुळेंच असें म्हणण्यास थोडी सुद्धां दिक्कत वाटत नाहीं. असल्या पराक्रमांचें यशोधन कोणत्याहि परिस्थितींत आल्हादकारक व उत्साहवर्धक ठरतें आणि सहृदय अंतःकरणांत विचारांच्या लहरी उत्पन्न करतें. असल्या महात्म्यांच्या स्मृतींना आमचा नम्र प्रणाम असो ! आतां आरा येथील किल्लेकोटाचें वर्तमान पुन्हा पाहूं.

**आरा हाउसूचा वेढा—पुढें चालू:—**

तारीख २७ जुलै, १८५७ या दिवशीं इंग्रजी कोटाला—त्याला इतिहासांत 'आरा हाउस्' असें नांव मिळालें आहे—बंडवाल्यांचा वेढा पडला. मागें सांगितल्याप्रमाणें युद्धाला तोंड लागल्याबरोबर दोन्ही बाजूंचे सैनिक त्वेषानें लढले. तारीख २९ ची रात्र व तारीख ३० चा दिवस या दोनहि दिवशीं आराहाउस्मधील सैनिकांच्या कानांवर अगदीं जवळच चाललेल्या गोळीबाराचा ध्वनि येत होता व त्यांना आशाहि उत्पन्न होत होती. परंतु तो आवाज जसा दूर जाऊं लागला तशी ती आशा नष्ट झाली व त्यांनीं कयास केला कीं, आपल्या मदतीस आलेली

तुकडी पराभूत होऊन पळून जात आहे. तथापि त्यांनीं धीर सोडला नाहीं. स्वामिनिष्ठ शिखांनीं स्वामिसेवेंत कष्टांना मोजलें नाहीं. मनस्वी असे कार्यार्थी सुखदु:खाची थोडीच पर्वा करतात? ते सर्व प्रसंगांना धीरवृत्तीनें तोंड देतात. आरा येथील वेढ्यांत अर्काटच्या वेढ्याची पुनरावृत्ति निघाली. ज्याप्रमाणें क्लाइव्हच्या हिंदी सैन्यानें आपण स्वतां पेज खाऊन, तांदूळ गोऱ्या शिपायांना दिले व राजासाहेबाचे सैन्याविरुद्ध तग धरण्यास त्यांना मदत केली तीच गोष्ट आरा येथें घडली. कुँवरसिंहांच्या लोकांविरुद्ध शीख लोक लढले. स्वतां पावबिस्कुटांवर आपली भूक भागवून गोऱ्या शिपायांची मांसाहाराची इच्छाहि गोळ्यांच्या वर्षावांत बाहेर पडून रात्रीं इकडे तिकडे चरणाऱ्या बकऱ्या पकडून आणून त्यांनीं भागविली. आंतील पाणी संपलें असें दिसतांच या बहाद्दर शिपायांनीं एक दिवसाचे आंत १८ हात खोल असा आड खणून काढला व पाण्याची हांकाटी नाहींशी केली. इंग्रजहि स्वस्थ नव्हते. एक हल्ला फसला म्हणून निराश न होतां त्यांनीं दुसऱ्या हल्ल्याची तयारी चालविली व या वेळीं मात्र त्यांना यश आलें. त्या स्वारीची हकीगत थोडक्यांत देऊं.

**मेजर व्हिन्सेंट् आयर:—**

तारीख २५ जुलै सन १८५७, ज्या दिवशीं दानापुरास बंडाची आग भडकली त्याच दिवशीं कलकत्त्याहून अलाहाबादेस जलमार्गानें एक फौज चालली होती. त्या सेनेचा नायक मेजर व्हिन्सेंट् आयर नामक एक तोफखान्यावरील अधिकारी होता. इंग्रज विपत्तींत आहेत अशी बातमी लागल्यामुळें दानापुराच्या सेनापतीजवळ त्यानें "मदतीची अपेक्षा आहे कीं काय?" अशी विचारणा केली. नास्तिपक्षीं उत्तर आल्याकारणानें गंगामार्गानें

तो पुढें सरकला. तारीख २८ जुलै रोजीं त्याचा मुक्काम गाझीपूर येथें असतां आरा हाउसमध्यें अडकून पडलेल्या इंग्रजांची बातमी त्यास लागली. अफगाणिस्तान, ग्वालेर व ब्रह्मदेश अशा निरनिराळ्या ठिकाणीं त्याची नोकरी झाली असल्याकारणानें देशाटनाला आनुषंगिक अशी समयज्ञता व चातुर्य त्याचे अंगीं प्राप्त झालें होतें. वास्तविक रीतीनें त्याला सरळ अलाहाबादेस जावयास पाहिजे होते. परंतु आज्ञाभंगाचें पातक पत्करूनहि त्यानें वाटेंत मुक्काम करण्याचें ठरविलें. गाझीपूरच्या अधिकाऱ्यांच्या परवानगीनें आरा हाउस्मधील बंदिस्त बंधूंचें बंधविमोचन करण्यास तो कटिबद्ध झाला. गाझीपुरासहि बंडाचा संभव असल्यामुळें त्या ठिकाणीं दोन तोफा व एक गोरा अधिकारी ठेवून आयरनें आगबोटीनें बक्सारचा मुक्काम गांठला. बक्सार येथें कॅप्टन् ल एस्ट्रेंज् ह्या अधिकाऱ्यापाशीं पांचव्या फ्युजीलिअर पलटणींतील १५४ शिपाई असल्याचें त्याला आढळलें. त्याची व आपली तुकडी एकत्र करून व्हिन्सेंट् आराचे बाजूस निघाला. लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट या वेळीं अशी घडली कीं, एस्ट्रेंज्नें मदत करण्याचे कबूल करण्याचे आधीं, "या बाबतींत जर वरिष्ठांकडून कानउघडणी झाली तर त्याला सर्वस्वीं जबाबदार तूं आहेस" अशी स्पष्ट लेखी कबुली आयरकडून घेतली.

**आयरचें मार्गक्रमणः—**

दोन्ही तुकड्यांचा मिलाफ झाल्यानंतर बक्सार येथें कांहीं शिपाई ठेवून तारीख ३१ जुलै रोजीं आयर एकंदर २२० शिपाई व तीन तोफा घेऊन बक्सारहून निघाला. २८ मैल चालून गेल्यावर शहापूर मुक्कामीं त्याला कॅप्टन् डनूवरचे अपयशाची बातमी लागली. "डनूवरनें माझ्या येण्याची वाट पाहिली असती तर पश्चिम बाजूनें

माझें सैन्य व पूर्वबाजूनें त्याचें सैन्य अशा दुहेरी कात्रींत बंडवाले छान पकडले गेले असते. पण त्याचें आतां काय ?" अशा तऱ्हेचें पत्र त्यानें जनरल लाइड् यास दानापूर मुक्कामीं पाठविलें व आपण स्वतः आपल्या स्वतःचे योजनेप्रमाणें वागण्यास आयर सिद्ध झाला. तिकडे कुँवरसिंहाहि स्वस्थ नव्हता. आयरच्या सैन्याला तोंड देण्याची त्यानें आपल्याकडून शिकस्तीची तयारी केली. त्या वृद्ध सेनानायकाला तीन ठिकाणीं सैन्याची व्यवस्था करावयाची होती. आरा हाउसचा वेढा चालविणें, दानापूरच्या बाजूची टेहळणी ठेवणें व या नवीन शत्रूचा प्रतिकार करणें अशा तीन कामांत त्या रजपूत सेनाग्रणीचें चित्त व्यग्र झालें होतें. निसर्गाचीहि मदत कुँवरसिंहांना या वेळीं होती; पाऊस पडल्यामुळें बक्सार व आरा या दोन ठिकाणांतील भूप्रदेश चिखलानें भरून गेला होता. त्यामुळें इंग्रजांना सैन्याची हालचाल सुलभतेनें करणें शक्य नव्हतें. तशांतच गांगीच्या लढाईत नुकत्याच मिळालेल्या विजयानें कुँवरसिंहांचे सैनिकहि आनंदांत होते. तारीख १ ऑगस्ट रोजीं बलौती मुक्कामीं आयरच्या मार्गावरील पूल कुँवरसिंहांनीं पाडून ठेवला. तथापि आयरनें नवा जुजबी पूल बनवून तारीख २ ऑगस्ट रोजीं कुँवरसिंहांच्या मुख्य सैन्याची गांठ गजराजगंज-नामक गांवीं घेतली. सकाळच्या प्रहरीं कुँवरसिंहांचें सैन्य व आयरचें सैन्य समोरासमोर उभें ठाकलें. गजराजगंज येथें स्वातंत्र्याचे पुजारी व दमननीतीचे पक्षपाती यांची लढाई जुंपली.

**गजराजगंज येथील लढाईः—**

पाण्यानें भरून वाहत असलेल्या शेतांतून जमीन तुडवीत इंग्रजी सेना येत होती. कुँवरसिंहांचे लोक एका आंबराईत एकत्र झाले होते. आंब्याच्या झाडांच्या आश्रयानें विद्रोही सैन्यानें आपली

बंदुकांची मारागिरी प्रतिपक्षावर चालवली. आयरनें मागच्या अनुभवानें शहाणे होऊन आपली फौज बंदुकांचे मारगिरीचे टप्प्यांतून दूर नेली व आपल्या तोफांना बत्ती देण्याचा हुकूम दिला. एकत्रित असलेल्या विद्रोह्यांचें पटापट बलिदान होऊं लागलें. उगाच प्राणहानि करण्यापेक्षां आयरच्या सैन्याच्या दोन्ही बगलां-वर हल्ला करणें बरें असें वाटून कुँवरसिंहांनीं आपल्या सैन्याला बरेंच पांगून टाकलें. परंतु तोफांची मारगिरी चुकविली तर एन्फील्ड् बंदुकांच्या तोंडांत त्याच्या सैनिकांस पडावें लागलें. हल्लींच्या युद्धांत जयश्री वीरपुरुषांवर तितकी फिदा होत नाहीं जितकी सुसज्ज सेनानींवर होते. तोड्याच्या बंदुकांचा पाड नवीन पद्धतीच्या बंदुकांपुढें कसा लागणार ? त्यांचा टप्पा फार लांब असल्याकारणानें आयरच्या बगलांचा तर पराभव झाला नाहींच उलट तोफांच्या धडाक्यानें आधींच जेरीस आलेली कुँवरसिंहांची मधली फळी मात्र पार फुटली; व सर्व ठिकाणीं विद्रोही सेना पराजित झाली. कुँवरसिंह व्यवस्थेनें मागें हटूं लागला व आयर पाठलाग करूं लागला. आयरला अंगावर घेत घेत जवळ जवळ २ मैल कुँवरसिंह मागें हटला व पार्श्वभागीं असलेल्या एका लहानशा नदीचा पूल, इंग्रजी सेना पोंचण्याच्या आंत, ओलांडून तो पूलहि त्यानें तोडून टाकला. अशा तऱ्हेनें पाठलागाचा तात्पुरता बंदोबस्त करून कुँवरसिंहांनीं नदीच्या परतीरावरील बिबीगंज गांवाचा आश्रय घेतला.

**बिबीगंजची लढाई:—**

नदीपार होण्याचा आपला मार्ग खुंटल्याचें पाहून आयरनें रेल्वे-पुलाकडे जाण्याचें ठरविलें. कुँवरसिंहानें आयरचा मानस तत्काळ

जाणला व आयरची सेना पुलाजवळ जाऊन पोंचण्याच्या आधींच कुँवरसिंहाचें सैनिक त्या पुलाजवळ जाऊन पोंचले. इतकेंच नव्हे तर पुलाजवळील आम्र वृक्षांच्या एका राईच्या आश्रयानें त्यांनीं चालून येणाऱ्या गोऱ्या फौजेवर गोळ्यांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. परंतु, पुन्हा एकदां जुन्या तोडच्याच्या बंदुका नवीन शस्त्रसामुग्रीशीं झगडतांना अपयशी ठरल्या. आयरनें तोफांची मारगिरी चालू केली व त्या रणयज्ञांत विद्रोही सैनिकांच्या पुन्हा एकदां आहुति पडण्यास सुरुवात झाली. एकदां लढाईचा सोक्षमोक्ष करून घेण्याचें कुँवरसिंहाच्या शूर वीरांनीं ठरविलें व आश्रयस्थान सोडून त्यांनीं नीट तोफांवरच चालून घेतलें. कठीण प्रसंग जाणून आयरनें संगिनीच्या हल्ल्याचा हुकूम दिला. मारूं अथवा मरूं अशा निश्चयानें चालून येणाऱ्या गोऱ्या सैनिकांपुढें बंडवाल्यांनीं हार खाल्ली व पळून जाऊन जीव बचावण्याचा मार्ग त्यांनीं पत्करला. आरा शहर तसेंच सोडून कुँवरसिंहाची जगदीशपूर राजधानी लढवण्याचा बंडवाल्यांनीं विचार केला व निरनिराळ्या मार्गांनीं बिबीगंजचे पराभूत बंडखोर जगदीशपूर येथें एकत्र जमले. तिकडे आयरनें आरा शहराकडे कूच केलें. परंतु त्याच दिवशीं—ता. २ ऑगस्ट १८५७ रोजीं—तो आरा येथें पोंहचूं शकला नाहीं. कारण आरापासून चार मैलांवर एक नाला पुरानें भरून वाहत असल्यामुळें तो ओलांडण्यास पूल बनविणें भाग पडलें. नव्या बनत असलेल्या East India Railway चें सामान उपयोगांत आणून आयरनें एक तात्पुरता पूल बनविला व मोठ्या उत्साहानें आरा शहराकडे त्यानें कूच केलें. ता. २७ जुलै ते ता. ३ ऑगस्ट या सबंध आठवडाभर वेढा सहन करणाऱ्या आरा हाउसमधील इंग्रजांची आयरच्या फौजेनें सुटका केली.

**आरा शहरीं इंग्रजांनीं काय पाहिलें ? :—**

आरा शहर बंडखोरांच्या हातीं गेल्याचें वृत्त ऐकल्याबरोबर सर्वत्र एकच कोलाहल माजला. आतां बंडवाल्यांच्या अंगवळणीं पडलेले नेहमींचे अत्याचार घडून आरा शहरांत भयानक हत्याकांड केलें जाणार अशी भीति सर्वत्र पसरली. परंतु तसें कांहींहि घडून आलें नाहीं. खजिन्यांतील रोकड ताब्यांत घेणें व बंदिखान्यांतील बंदींना मोकळे करणें यांपेक्षां अधिक क्रान्तिदर्शक कृत्यें कुँवर-सिंहानें करूं दिलीं नाहींत. सत्तेच्या धुंदींत अविचाराचा तमाशा जगास दाखविणारा कुँवरसिंह नव्हता. खरें पाहूं गेल्यास 'आरा हाउस'मधील इंग्रजांचा विजय कुँवरसिंहाच्या उदारपणामुळेंच इंग्रजांना मिळवितां आला. 'आरा हाउस' लढविण्यांत शीख शिपायांनींच भाग घेतला होता. टाळ्या वाजवून त्यांना उत्तेजन देण्यापलीकडे इंग्रजांनीं फारसें अधिक काम केलें नसावें. समोर युद्धास उभा राहिलेला विपक्षी चुकत असला तरी स्वकीय आहे ह्या खुळचट भावनेनेंच कुँवरसिंह घेरला गेला होता. नाहीं तर २००० सशस्त्र सैनिकांना ७५ लोकांना आठ दिवसांच्या मुदतींत जिंकणें अशक्य नव्हतें. असो ! वेढ्यांत सांपडलेल्या इंग्रजी सहाय-कांशींच कुँवरसिंह उदारतेनें वागला एवढेंच नाहीं तर आरा शहर ताब्यांत आल्यावर तेथील ख्रिस्ती प्रजेवर व इंग्रजांचे बंगाली नोकरांवरहि त्यानें अत्याचार केला नाहीं. कांहीं बंगाली इसमांना पकडून त्याचेपुढें आणण्यांत आलें. आतां धडगत नाहीं अशा कल्पनेनें हात जोडून ते लोक कुँवरसिंहापुढें उभे राहिले. परंतु, धीरवृत्तीच्या त्या क्षत्रियानें त्यांना कांहींहि इजा न करतां सोडून दिलें व हत्तीवर बसवून त्यांना त्यांच्या देशांत पाठवून देण्याची व्यवस्था केली. कुँवरसिंहाच्या नुसत्या नांवाचा येवढा

डंका वाजत होता कीं, ता. २७ जुलै ते ३ ऑगस्ट या सबंध आठवडाभर इंग्रजी सलतनत नुसत्या आरा शहरांतूनच उठली नाहीं तर आजूबाजूच्या गांवांतूनहि त्यांचा अंमल नाहींसा झाला. एकंदरींत, आरा शहरांत इंग्रजांनीं पाऊल ठेविल्याबरोबर त्यांना शांततेचें साम्राज्य पसरलेलें दिसलें.

**आरा शहरीं इंग्रजांनीं काय केलें ?:—**

आरा शहरांत आल्याबरोबर इंग्रजांनीं 'आरा हाउस'ची मुक्तता केली. शीख सैनिकांना तर येवढा आनंद झाला कीं, ज्या घराचे संरक्षणासाठीं त्यांनीं आपल्या जीविताकडेहि पाहिलें नव्हतें त्या घराला विजयाचें स्मारक म्हणून 'फत्तेगड' असें नांव ठेवण्याची त्यांनीं परवानगी मागितली व ती त्यांना देण्यांतहि आली. ही फत्ते—म्हणजे 'विजय' कोणीं मिळविला ? कशासाठीं मिळविला ? व यांत कोणतें इहपरलोकहित शिखांनीं साधलें ? या प्रश्नांचीं उत्तरें सुचतच नाहींत. पण उगाच शोक करून काय उपाय ? परकी राजसत्ता दृढमूल झाली म्हणजे स्वकीयांशीं लढाया करणें हें पाप आहे असें जित राष्ट्रांतील सैनिक समजूंच शकत नाहींत. गुलामगिरीच्या बेडींतहि अशीं कांहीं अद्‌भुतरम्य रहस्यें आहेत ! आपल्या भाईबन्दांच्या सुटकेनंतर आयरनें हातीं सांपडलेल्या विपक्षीयांची वाट लाविली. कुँवरसिंहानें हातीं क्षमाशस्त्र धरलें होतें आणि एका आठवड्यांत शांतिसाम्राज्याची स्थापना केली होती. याच्या अगदीं उलट आयर वागला. हातीं लागलेल्या जखमी व कैदी बंडवाल्यांना त्यानें फांसावर लटकावलें व आरा शहरांतील लोकांचीं हत्यारें त्यानें काढून घेतलीं. हें सर्व कृत्य करण्यास त्यालाहि एक आठवडा लागला.

तारीख २६ जुलै १८५७ ते तारीख २ ऑगस्ट १८५७ व तारीख ३ ऑगस्ट १८५७ ते तारीख १० ऑगस्ट १८५७ या

दोन सप्ताहांत आरा शहरवासियांना दोन चित्रें दिसलीं. 'हें चित्र पाहा आणि हें चित्र पाहा' असाहि ध्वनि त्यांच्या कानांत कोणी कर्णपिशाच्च त्या वेळीं गुणगुणलें असेल! गुण्यागोविंदानें राहून एक आठवडा राज्य करणारा राजपुरुष पराभूत होतो व हडेलहप्पी अधिकार चालवणारी राज्यसंस्था एकाच आठवडयांत आपलें साम्राज्य पुन्हा भक्कम पायावर बसवित्ये या दृश्यांतील रहस्य एवढेंच असूं शकेल, कीं कलिकालाचा उदय भारतभूमीवर झाला आहे! एका आठवडयांत आपली विसकटलेली घडी पुन्हा बसवून आयर जगदीशपुराकडे निघाला.

**आयर्चें जगदीशपूरकडे कूचः—**

आरा शहर पुन्हा हातीं घेऊनच आयर् स्वस्थ बसला नाहीं. त्याला कुँवरसिंहाचें भय वाटत होतेंच. दानापूरच्या इंग्रजांनींहि हातपाय हालविण्याचें ठरविलें. ता. ७ ऑगष्ट, १८५७ रोजीं २०० गोरे शिपाई आयर्च्या मदतीस धाडण्यांत आले. आणखी १।२ दिवसांत आरा शहरांतील इंग्रजी अधिकाऱ्यांनीं स्वतः खटपट करून १०० शीख शिपाई मिळवले. वेढ्यांतून सुटलेले ५० लोक शिवाय होतेच. एकूण आयरच्या हाताखालीं ५०० च्या जवळपास संख्याबल जमा झालेंच. याशिवाय एक मोठें सहायहि त्यास मिळूं लागलें व तेंच सहाय या वेळीं फार प्रभावशाली ठरलें. घराबरोबर घराचे वांसे फिरतात! कालचक्र उलट फिरूं लागलें म्हणजे मित्रहि शत्रु बनतात व उपकाराची फेड अपकारानें होऊं लागते. कालगतीचा महिमा अतर्क्य आहे. कुँवरसिंहाच्या हालचालींची बातमी इंग्रजांना पोंचविणारे हस्तकहि याच वेळीं इंग्रजांना मिळूं लागले. जोडयांत दबा धरून बसलेला विंचू आपल्या नांगीनें पायाला दंश करतो व सर्व शरीर विषयुक्त करून अखेरीस

मनुष्यप्राण्याचा संहार करतो; तद्वत्च हे कानाशीं लागणारे टेहळ्ये स्वकीयांना प्राणघातक ठरतात. 'कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ' या न्यायानें घरांत फूट झाली कीं, घर भंगण्यास उशीर लागत नाहीं. कुँवरसिंहाच्या हालचालींची वार्ता आयरला घरबसल्या मिळूं लागली व त्यामुळें जगदीशपुरावर चढाई करण्याचें काम सुकर झालें. जगदीशपूरचा बंदोबस्त भक्कम होता. कुँवरसिंहहि आपल्या विश्वस्त अनुचरांसह आपल्या छातीचा कोट करून लढावयास सिद्ध होता. परंतु फितुरीच्या सुरुंगांनीं पोखरलेल्या कोणत्या ठिकाणानें आजपर्यंत शत्रूविरुद्ध यशस्वी रीतीनें टिकाव धरला आहे बरें? भरतपूरच्या कोटांचें उदाहरण आपण कधीं तरी विसरूं शकूं काय? असो! आयर तारीख ११ ऑगस्ट, १८५७ रोजीं कुँवर-सिंहाच्या राजधानीवर हल्ला करण्यास निघाला. पाउसकाळाचे दिवस असल्याकारणानें त्याला तो हल्ला तितक्या नेटानें करतां आला नाहीं कीं, जितकी त्याची स्वतःची अपेक्षा होती.

**तोळानारायणपूर व दुलौर येथील लढायाः—**

तारीख २ ऑगस्ट १८५७ रोजीं गजराजगंज व बिबीगंज ह्या ठिकाणीं जें घडलें त्याचीच आवृत्ति तारीख १२ ऑगस्ट १८५७ रोजीं तोळानारायणपूर व दुलौर या ठिकाणीं निघाली. पहिल्या ठिकाणच्या लढाईचा मान कॅप्टन् पीटरसन् नामक सेनापतीकडे गेला. पीटरसन् हा अधिकारी कॅप्टन् डन्वरच्या तुकडींतील असल्याकारणानें मागच्या अपमानाचें उट्टें काढण्याकरितां तो अगदीं आतुर झाला होता. आयरची परवानगी घेऊन त्यानें आपल्या-समोरच्या सैनिकांवर इतक्या त्वेषानें हल्ला केला, कीं शत्रूंची फळी फुटून ते मागें हटले. कुँवरसिंहानें दुसरी तुकडी दुलौर नामक खेड्यांत ठेवून दिली होती. तोफांच्या भडिमारानें तिचाहि

निकाल लावून आयर जगदीशपूरमध्यें प्रवेश करण्यास सिद्ध झाला. ह्या दोन लढायांसंबंधीं एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या प्रसंगीं विप्लवकारी सेनांचें आधिपत्य कुँवरसिंहाचा धाकटा भाऊ अमरसिंह याजकडे होतें. हें अमरसिंहाचें युद्धस्थानीं पहिलें पदारोपण होय. मागें सांगितलेल्या हकीकतीवरून वाचकांचे लक्षांत आलें असेलच कीं, गोऱ्या फौजेचें कार्य फितुरीमुळें फार सुकर झालें होतें. डुमरांव राजवंशांतील जहागिरदारच या वेळीं इंग्रजांना सहाय होता. त्याला प्रतिपक्षीयांत दाखल झालेला बघून अमरसिंहाचें तरुण रक्त इतकें उसळलें कीं, त्याच्या नरडीचा घोट घेण्याची तो इच्छा करूं लागला. आपल्या घोड्याला वायु-वेगानें त्याच्या हत्तीवर घालून आपल्या तलवारीची फेक शत्रूच्या अनुरोधानें त्यानें केली. परंतु त्या तलवारीनें हत्तीवरील पीलवानाचें मात्र नाक कापलें गेलें. कित्येक दिवसपर्यंत तो पीलवान 'नाक-काटा' पीलवान म्हणून प्रसिद्ध होता व आपल्या कापल्या गेलेल्या नाकानें जगाला बंधुद्रोहाचें प्रायाश्चित्त काय मिळतें तें दर्शवीत होता. दुलौर येथील लढाई संपल्यावर क्रान्तिकारी सैनिक जग-दीशपुरांत शिरले. आयरहि पाठलाग करीत आला. जगदीश-पुरांत इंग्रजांचा अगदीं अनपेक्षित अशा सुलभतेनें प्रवेश झाला. कारण कुँवरसिंह तेथून अगोदरच निघून गेला होता.

**इंग्रजांचा जगदीशपुरांत प्रवेशः—**

दुलौरपासून जगदीशपूर १॥-२ मैल आहे. इंग्रजांची विजयिनी सेना शत्रु आटोक्यांत आला असें पाहून हर्षोन्मादानें मत्त बनली. तिचा विवेक नष्ट झाला. हातांत सांपडतील त्या विद्रोही सैनिकांना रस्त्यांवरील उंच उंच झाडांना टांगून तसेच लटकत ठेवण्याचा

अघोरी क्रम गोऱ्या सैनिकांनीं सुरू केला. किती तरी जिवंत जखमी शिपाई अशा रीतीनें झाडांना बांधलेल्या स्थितींत तडफडून मेले असतील! पण त्या गोष्टीची आयरला अगर त्याच्या सैनिकांना काय पर्वा? त्यांना आपल्या जातभाईच्या राज्यस्थापनेकरितां हिंदवी लोकांवर जरब बसवायची होती. आसुरी कृत्यांवर जयाचा पडदा पडला म्हणजे त्या कृत्यांना वाचा फुटत नसते. कारण इंग्रजी भाषेंत एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं, प्रेम व युद्ध या दोन विषयांत सर्वच न्याय्य आहे. दुलौर व जगदीशपूर या दोन स्थानांतील अंतर काटल्यावर आयरनें एकदम शहरावर हल्ला केला परंतु कुँवरसिंहाच्या महालांत जे ५० शिपाई राहिले होते त्यांखेरीज कोणीहि बंडवाला इंग्रजांना बघावयास मिळाला नाहीं. कुँवरसिंह व अमरसिंह या दोन्ही भावांनीं मिळून आधींच ठरवून ठेविलें होतें कीं, आपलीं मस्तकें आपण जाणून बुजून बंडाच्या उखळींत घातलीं; त्यांवर इंग्रज सूडाचें मुसळ केव्हां तरी निश्चयेंकरून घाव घालणार; अशी परिस्थिति निश्चित ठरल्यावर आपल्या बायकापोरांना उगाचच परिणाम भोगावयास लागूं नये. आणि याच संकेतानुरूप अमरसिंहानें सेनाधिपत्य स्वीकारलें व वडील दादा बायकामुलांना घेऊन जगदीशपुरांतून आपल्या सासुरवाडीला निघून गेले. अर्थातच जगदीशपुरांत विद्रोही लोकांकडून इंग्रजी सैन्याला प्रतिकार करण्यांत आला नाहीं. आयतेंच रान मोकळें सांपडल्यावर हे गोरे पाहुणे फारच शेफारले व त्यांनीं जगदीशपुरावर सूड घेण्यास आरंभ केला—

**जगदीशपुरावर सूडः—**

कुँवरसिंहानें हातावर तुरी ठेवून जगदीशपुराहून प्रयाण केल्याचें पाहून आयरचा क्रोधानल फारच भडकला. पहिल्या सपाट्यास

कुँवरसिंहाच्या महालांत सांपडलेल्या ५० सैनिकांना झाडांवर लटकावण्यांत आलें व नंतर लुटीला सुरुवात करण्यांत आली. कुँवरसिंहानें आपल्या इतमामाला साजेल असा एक सुंदर दुमजली वाडा बांधला होता. तो वाडा जमिनीच्या पृष्ठभागापासून ३० फूट उंचीचा बांधला होता; व ती इमारत प्रेक्षणीय बनविण्यांत आली होती. वरच्या बाजूला सुंदर गच्ची केलेली असून त्या गच्चीवरून आसमंतात् नजर फेंकली असतां मोठा मनोहर देखावा दिसे. खालून वर गच्चीपर्यंत चढण्यास एक भक्कम जिना बनविला होता व इमारतींत प्रवेश होण्यास एक लहानसा रस्ता करविण्यांत आला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सुंदर फुलझाडें लावण्यांत आलीं होतीं व इमारतीच्या आवाराचे तोंडाशीं एक 'लाल दरवाजा' नामक प्रवेशद्वार होतें. लाल दरवाजाचे वरचे बाजूस नौबतखाना होता व विशेषप्रसंगीं त्या नौबतखान्यांत कर्णमधुर वाद्यें वाजवण्याची व्यवस्था केली होती. लाल दरवाजाचे दोन्ही बाजूंना दोन पिंजरे ठेविले असत व त्यांत दोन वाघ असत. कुँवरसिंहाची शिकारीची हौस प्रसिद्धच आहे व त्या प्रसिद्धीला अनुरूप अशीच ही वाघांची व्यवस्था होती. अशा या सुंदर वाड्यांत कुँवरसिंहाचा खास महाल होता. या प्रसंगीं वाड्यांत, वेढा पडल्यास सैन्याला उपयोगीं पडावें म्हणून, खूप धान्य भरून ठेवण्यांत आलें होतें. आयरनें प्रथम धान्य लुटविलें व जेथून कुँवरसिंहाचा जयध्वनि गर्जत असे तो नौबतखाना व कुँवरसिंहाचा खास महाल हे वाड्याचे दोन मुख्य भाग पाडून टाकविले. तेथून आयरची दृष्टि कुँवरसिंहाच्या उपास्यदेवतेचें अधिष्ठान बनलेल्या शिवमंदिराकडे वळली.

**कुँवरसिंहाचें शिवमंदिरः—**

बंडाच्या पूर्वीं ५।६ वर्षांचीच ती गोष्ट! शिवप्रिय माघ महिन्याचा एक शुक्रवार! त्या दिवशीं, मोठ्या उत्साहानें कुँवरसिंहानें जगदीशपुरांत एका नव्या शिवमंदिराचा संस्थापनोत्सव चालविला होता. मंदिराच्या मजबुतीकडे विशेष लक्ष देण्यांत आलें होतें. तें बांधण्यासाठीं उपयोगांत आणलेला चुनाहि फार परिश्रमानें तयार करण्यांत आला होता. आंतील मूर्तींच्या सौंदर्याचें वर्णन कुँवरसिंहाच्या दरबारीं असलेल्या राम कवीनें 'कुँवरविलास' नामक ग्रन्थांत फारच बहारीनें केलें आहे. तो म्हणतो, "पूर्व दिशेला श्रीजगन्नाथजींची मूर्ति विराजते, पश्चिम बाजूला रासक्रीडारत असा राधेश्याम भूषवितो, उत्तराधिपति भगवान् श्रीरामचंद्र आहेत. दक्षिणबाजूच मोकळी वाटत होती तेथें व्यालयुक्त भगवान् श्रीशंकर शोभूं लागले. एकदां त्या मूर्तींकडे नुसतें बघितलें, कीं त्या मूर्तींच्या ध्यानांतच भक्ताचें मन तल्लीन होतें व तो देहभान विसरतो." असल्या त्या मंदिराला निर्माण करण्यांत कुँवरसिंहाला काय काय कष्ट करावे लागले असतील याची पूर्ण कल्पना साधारण माणसास येणार नाहीं. मोठ्या धामधुमीनें संस्थापनेचा उत्सव साजरा करण्यांत आला. ब्राह्मणांना व साधूंना मोठ्या मोठ्या देणग्या मिळाल्या व भोजनप्रसंगीं हजारों माणसांना अन्नदान करण्यांत आलें. अंदाजी एक लाख समाज तेथें जमला असावा. आणखी कांहीं वर्षें गेलीं असतीं तर त्या मंदिराभोंवतीं प्रतिवर्षीं सांवत्सरिक असा मेळा भरविण्याचा कुँवरसिंहाचा विचार होता. परंतु "मनसा चिन्तितं कार्यम्" या पदापुढें "दैवमन्यत्र चिन्तयेत्" असलें पद येण्याची प्रथाच पडलेली असल्याकारणानें इ. स. १८५२ सालीं बांधलेलें हें मंदिर इ. स. १८५७ मध्येंच

नष्ट होण्याचा त्याचा योग ठरला होता. आयरची पापदृष्टि कुँवरसिंहाच्या शिवमन्दिराकडे वळली व त्याचा विध्वंस करण्याचा हुकूम देण्यांत आला.

ग्रंथ संग्रहालय स्थल प्रत ता. ठाणे.

**कुँवरसिंहाच्या शिवालयाचा विध्वंस:—**

तारीख १५ ऑगष्ट इ. स. १८५७ हा दिवस जगदीशपूरच्या रहिवाशांच्या स्मरणांतून कधींहि गेला नसेल. अभूतपूर्व असा एक देखावा त्यांच्या दृष्टीस पडला व त्यांच्या अंत:करणांना त्यानें दुभंग केलें ! कुँवरसिंहाच्या आवडीचे विषय बनून राहिलेलीं सर्व स्थानें त्या दिवशीं हादरलीं व भूभागांत पेरून ठेविलेल्या सुरुंगांनीं तीं तुटून पडलीं. कुँवरसिंहाच्या प्रिय शिवालयाखालींहि एक जबर सुरुंग उडाला व तें देवालय तुटून पडलें. हजारों मजुरांचे परिश्रमानें बांधिलेलें लाखों अंत:करणांचें विश्रामधाम निमिषार्धात खंडित झालें व आयरचे डोळे किंचित् निवाले. देवालयांची पवित्रता सूडाच्या कल्पनेनें भारलेल्या शत्रूंच्या हृदयाला कधींहि कंप उत्पन्न करूं शकत नाहीं. ते दुरात्मे वेडावलेल्या मन:स्थितींत असतात व 'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला ।' या सर्वांना परिचित असलेल्या कवितेप्रमाणें इकडे तिकडे भुतांसारखे संचार करीत असतात. पर्शियावर स्वारी करून तेथील राजधानीला आग लावून विजयानंद प्रदर्शनादाखल दारूनें झिंगलेला ज्यूलिअस् सीझर कोणाला माहीत नाहीं ! नुसत्या पाशवी शक्तीच्या जोरावर विजय मिळवून जेते शेफारून जातात व जयोत्साह करतात. परंतु, इतिहास अशा जेत्यांना कधींहि चांगलें शिफारसपत्र देत नाहीं. राष्ट्राराष्ट्रांच्या चुरशींत लढाया उत्पन्न होऊन शूर शिपायांच्या रणकंदनांत सैनिकांचे बळी पडावेत हें न्याय्य आहे. परंतु त्या चुरशीच्या निमित्तानें माणुसकीचेहि खून

पडतात ही गोष्ट देवाघरीं रुजू नाहीं व माणसाचे दरबारांतहि ती गोष्ट अगदीं हिणकस ठरते. वैर कोठपर्यंत असावें ? त्याचें कारण नष्ट होईपर्यंत. परंतु, दीर्घद्वेषी मानवदेहधारी सैतान वैराच्या भावनांनीं भारले जाऊन क्रूरकर्मे बनतात व आपली कुप्रसिद्धि इतिहासाच्या विस्तृत पटावर आपल्या क्रूर कर्मांच्या अदृश्य लेखणीनें अशी कांहीं रंगवून ठेवितात कीं, ती कधींहि, कोणाकडूनहि कितीहि प्रयत्न केला तरी विसरली जात नाहीं. आयरला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानेंहि चांगलें म्हटलें नाहीं.

**सर कॉलिन् कँबेल्चें या प्रकरणीं मत:—**

जगदीशपूर-विजयाची बातमी सरसेनापतींच्या कानीं पोंचली. सर कॉलिन् कँबेल् नुकताच हिंदुस्तानांत येऊन पोंचला होता. त्यामुळें त्याच्या मनांत इतर युरोपियन अधिकाऱ्यांसारखी बंडवाल्यांविषयीं तीव्र चीड उत्पन्न झालेली नव्हती. त्यामुळें आयरची त्याचे शौर्याबद्दल मुक्तकण्ठानें स्तुति करीत असतांहि त्यानें जगदीशपुराच्या शिवालयाचा विध्वंस केल्याबद्दल आयरला दोषच दिला. त्याचेच शब्दांत या बाबतींतलें मत लिहिणें अधिक सोईचें होईल असें वाटतें म्हणून तें जसेंच्या तसेंच लिहीत आहे. "आयरच्या शौर्याची अशा बिकट अवस्थेंत तारीफ करावीशी वाटते. तथापि त्यानें जगदीशपूर येथील हिंदु देवालयाचा जो नाश केला त्याबद्दल मात्र माझी नापसंती मला खेदपूर्वक नमूद करावीशी वाटते. कदाचित् आयरला आपलें कर्तव्य म्हणून जरी तें कृत्य करावेंसें वाटलें असेल तरी सुद्धां त्यानें केलेला हा प्रकार मला संमत नाहीं." खुद्द आयरलाहि हा प्रकार झाल्यानंतर कांहींशी लाज वाटली असावी असें वाटतें. कारण असें कीं, या प्रकरणीं त्यानेंहि आपल्यातर्फे खुलाशादाखल आपली कैफियत

सादर केली आहे. तो म्हणतो कीं, " मीं पाडलेलें मंदिर प्राचीन नव्हतें व त्यामुळें तें तितकें महत्त्वाचें नाहीं. जगन्नाथपुरीसारखीं मंदिरें पाडण्यांत हिंदूंच्या धर्मभावना दुखविल्यासारखें होईल. कुँवरसिंहाचें शिव-मंदिर हें त्याचा वैयक्तिक बडेजाव वाढविण्यास कारण होत असे व हीच गोष्ट लक्षांत ठेवून मीं तें देऊळ सुरुंगानें उडविण्यास सांगितलें. कारण, ज्या योगें शत्रूची मानखंडना होईल असें प्रत्येक कृत्य आणीबाणीच्या प्रसंगीं करावें लागतें. त्यामुळें त्याची इभ्रत कमी होते व त्याच्या अनुयायांच्या मनांतील त्याजबद्दलच आदर कमी होतो ! ! " हिंदूंच्या धर्मभावना कशानें दुखविल्या जातात हें ठरविण्यास प्रत्येक हिंदी वाचक समर्थ असल्यामुळें आयरच्या विधानाचा इन्कार करण्याचें काम वाचकांवर सोंपवलेलेंच अधिक बरें ! आयर अशा प्रकारें जगदीशपूर जिंकून परत आपल्या नियोजित कामास निघाला.

**गोऱ्या फौजेचें जगदीशपुराहून निर्गमनः—**

हातीं घेतलेलें काम यशस्वी तऱ्हेनें पुरें झालेलें बघून आयर आणि इतर मंडळी आपापल्या कामाला परत फिरली. आयर अलाहाबादकडे रवाना झाला, दानापुराचे शिपाई दानापुरास परत फिरले. परंतु, गांगीच्या लढाईंत डन्बर व त्याची सेना ज्या वीरानें परास्त केली तो हातीं न सांपडल्यामुळें इंग्रजांची फार मोठी निराशा झाली. जगदीशपुराजवळ जितौर नामक कुँवरसिंहाचें विश्रामस्थान होतें. त्या गांवाहूनच कुँवरसिंह शिकारीकरतां जात असे. त्या ठिकाणीं तरी कुँवरसिंह सांपडेल अशा समजुतीनें ल एस्ट्रेंज् तेथें जाऊन आला. परंतु कुँवरसिंह सांपडला नाहीं. तेथेंहि कुँवरसिंहाचा बंगला होताच. तोहि गोऱ्या फौजेनें पाडून टाकला. कुँवरसिंहाचे सहायक बनलेल्या इतर सुहृदांचीं

घरेंहि भस्मसात् करण्यांत आलीं. हें सर्व झालें पण कुँवरसिंहानें इंग्रजांचें हातावर जी तुरी दिली ती दिलीच. अमरसिंहाहि आपल्या भावाला जाऊन मिळाला व जगदीशपुराच्या दक्षिणबाजूस असलेल्या ससूराम पहाडांतून इंग्रजांशीं टक्कर देण्याचा ह्या वीर बंधूंनीं निश्चय केला. जातां जातां आयरनें सर्वत्र दवंडी पिटवून जाहीर केलें कीं, कुँवरसिंहांचें डोकें आणून देणारास पंचवीस हजार रुपये इनाम मिळेल. आयर अलाहाबादला गेला व दानापुराचे शिपाई दानापुरास परत फिरले. परंतु, जातां जातां त्यांनीं रस्त्यांतील गांवांवर इतके अत्याचार केले कीं, त्या बाजूच्या एका विशिष्ट भागाला अजूनहि 'सन ५७ का पराह' असें म्हणतात. 'पराह' म्हणजे 'पलायन'. गोऱ्यांनीं यावें व गांवांतील प्रजेनें त्यांच्या भीतीनें पळून जावें या प्रकाराला 'पराह' म्हणतात. मार्गांत सर्व गोरी मंडळी दारूच्या धुंदींत असत. त्याशिवाय निर्बल प्रजेवर अत्याचार करण्यास जोर कसा येणार ? दानापुरांत गेल्यावर तर गोऱ्यांनीं या सर्व क्रौर्यावर कळस चढविण्याकरतांच कीं काय तेथील राजनिष्ठ पलटणींपैकींच कित्येकांना पकडून फांसावर लटकावून दिलें व कुँवरसिंहावर सूड उगवण्याची आपली हौस पुरवून घेतली.

**कुँवरसिंहाच्या नांवाचा प्रभाव:—**

कुँवरसिंह इंग्रजांसमोर दंड ठोकून उभा राहिला असें कळल्या-बरोबर पश्चिम बिहारमध्येंच खळबळ उडाली येवढेंच नाहीं तर शेंकडों मैल दूर असलेल्या आसाम व जबलपूर या प्रांतांपर्यंत बंड-वाल्यांना स्फुरण उत्पन्न झालें. देशाकरितां प्राणत्याग करावयाची इच्छा मनुष्यमात्राचे ठिकाणीं अत्यल्प अशा प्रमाणांत कां होईना पण असतेच. परंतु, प्राणदान करावयाचे विचारांबरोबरच प्राण

रक्षणाचेहि विचार मनुष्याचे मनांत चालतच असतात. प्राण ही चीज काय अशी आहे कीं, वाटेल तेव्हां व वाटेल त्या प्रमाणांत मिळूं शकेल ? तात्पर्य येवढेंच कीं, प्राणार्पण ज्या कार्याकरतां अगर ज्या व्यक्तीकरतां करावयाचें तें कार्य तितकें उज्ज्वल व ती व्यक्ति तितकी आदरणीय असावी लागते. कुँवरसिंहाच्या नांवांत तें तेज होतें. त्या नांवाच्या जादूनें भारलें जाऊन ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांतच नव्हे तर आणखी कित्येक महिने तरी आपण कुँवरसिंहाच्या झेंड्याखालीं लढूं शकूं या इच्छेनें कित्येक पलटणींनीं बंडें केलीं. येवढेंच नव्हे तर त्याच्या पुण्य नांवाचें स्मरण करून गोऱ्यांचे तोफांवर आपले देहहि ठेविले. राणी दुर्गावतीमुळें प्रसिद्धि पावलेल्या गोंडवनांत त्या काळीं शंकरशहा नामक राजा राज्य करीत होता. इ. स. १८५७ च्या सप्टेंबर महिन्यांत त्यानें कुँवरसिंहाचें यश ऐकून बंडाच्या खाईत आपल्या पुत्रासहित उडी घातली. परंतु गोऱ्यांच्या सावधगिरीमुळें त्याला इतर बंडवाल्यांचें सहाय मिळूं शकलें नाहीं व ता. १८ सप्टेंबर १८५७ या दिवशीं शरिरावरील प्रत्येक केस पिकलेल्या या वृद्धाला त्याच्या पुत्रासहवर्तमान तोफांच्या तोंडांशीं बांधून उडवून देण्यांत आलें. तरुणांस लाजवील अशा धीर वृत्तीला म्हातारा शंकरशाह मृत्युमुखीं पडला. पार्थिव शरिराचा चुराडा करणाऱ्या तोफेच्या तोंडाचें त्याला यत्किंचितहि भय वाटलें नाहीं. कारण त्याची खात्री होती कीं, कुँवरसिंहासारख्या तेजस्वी पुरुषानें अंगिकारलेलें काम कधींहि अन्याय्य असणार नाहीं. इंग्रजहि कुँवरसिंहाला फार भीत असत.

### कुँवरसिंहाचा दरारा:—

आयरनें जगदीशपुरावर घेतलेल्या भयंकर सूडामुळें कुँवरसिंह

आपलें देहभान विसरला. ज्या देवालयांत बसून देवांचाहि देव जो महादेव त्याचें अर्चन करतांना देहभान विसरून जावें तें खंडित झाल्यामुळें त्या भग्न शिवालयाच्या स्मृतीनें त्याचें शरीर जळूं लागलें. आयरची कृति आर्यांना शोभणारी खास नव्हती यांत शंकाच नाहीं. तथापि त्यानें केलेलें कृत्य सूडाच्या भावनेनें केलें होतें व त्यामुळें कुँवरसिंहाच्या अनुयायांच्या उरांत इंग्रजांचें नांव ऐकल्या-बरोबर धडकी भरेल अशीहि त्याची कल्पना होती हें आपण वाचलेंच आहे. पण ही कल्पना चुकीची ठरली. आयर-च्या राक्षसी कृत्यानें कुँवरसिंहाचे अनुयायी त्याला सोडून तर गेलेच नाहींत. उलट प्रत्येक मुक्कामावर समुद्राकडे जाणाऱ्या गंगेला जशा अनेक उपनद्या मिळाव्यात त्याप्रमाणें त्याच्या सैन्याला अनेक बिहारी वीर येऊन मिळूं लागले व त्याच्या अनुयायांच्या उरांत धडकी भरूं लागण्याऐवजीं इंग्रजांच्या अंत:करणांत मात्र भय उत्पन्न झालें. एकदां अशी गंमत झाली कीं, कुँवरसिंहाचे साथीदार, सिगौली येथील बंडवाले, जोनपूरवर चालून जात होते. जोनपूर शहर बनारसेहून ३५ मैल आहे. बनारस शहरीं त्या वेळीं केवळ ३०० इंग्रज होते. खंदक खणून त्यांचे आश्रयानें राहण्याचें ठरलें व खंदकांचें कामहि सुरू झालें. “शत्रु आले!” अशी भुमका उठल्याबरोबर कामकऱ्यांनीं आपल्या कुदळी टाकून दिल्या व प्राणरक्षणार्थ ते वाट फुटेल त्या दिशेला पळून गेले. गोरे लोक हत्यारें घेण्याच्या तयारीस लागले. गोलंदाज तोफांच्या बाजूला सिद्ध झाले व ह्या गडबडीचा फायदा घेऊन तुरुंगांतील कैदी पळून जाण्याच्या मार्गाला लागले. वास्तविक खरी हकीगत अशी होती कीं, मेघगर्जना होत होत्या. त्या गडगडाटाचा अर्थ बंडखोरांच्या तोफांचा आवाज असा करण्यांत आला व सगळा

गोंधळ माजला. या प्रकारावरून कोण कोणास भीत होतें तें वाचकांनींच ठरवावें. ससूरामच्या पहाडांत काय चाललें होतें तें आतां पाहूं या.

**ससूरामच्या पहाडांतील संस्मरणीय बैठकः—**

जगदीशपुराहून निघून आलेल्या सेना पूर्वसंकेतानुरूप ससूरामच्या पहाडांत पोंचल्या. कुँवरसिंह एका खुर्चीवर बसून म्हातारपणची सखी जी गुडगुडी तिच्या सेवनांत नुकत्याच होऊन गेलेल्या क्रान्तीचीं चित्रें आपल्या मनाच्या चक्षूंनीं बघून हृदयाच्या अदृश्य फलकावर रेखाटीत होता. आज कित्येक वर्षें ज्या राजधानींत निर्वेध राज्यसुख अनुभवलें ती आज रिपुपददलित होत्साती स्थानभ्रष्ट झालेल्या चिरपरिचित अशा मालकाचें स्मरण करीत असावी असें त्याला भासलें. आपला सुंदर बंगला, तें पवित्र शिवालय, तें आल्हादक असें जितौऱ्याचें मृगयानिवासस्थान व त्या सुहृदांच्या इमारती हीं सर्व ठिकाणें त्याला मोठ्यानें हांका मारूं लागलीं. आम्हीं हा प्रियविरह कसा सहन करावा ? असा आर्तस्वर त्याला त्या भीषण अशा शांत वातावरणांत ऐकूं येऊं लागला. प्रेमविव्हल होऊन त्या वृद्धाच्या नेत्रांतून मोठाले दोन मौक्तिकसदृश असे अश्रु टपकतांना कुंवरसिंहाच्या अनुचरांना दिसले. कुँवरसिंह हा सिंह होता तर अमरसिंह, रणदलनसिंह व हरेकृष्णसिंह हे रणपुंगव सिंहाचे छावे होते. एकमुखानें ते विचारते झाले, "दादाजी ! आम्ही असतांना आपल्या डोळ्यांतून अश्रुसिंचन व्हावें हा काय प्रकार आहे ? दौलत गेली म्हणून काय झालें ? आम्ही असा पराक्रम करून दाखवूं कीं, आपल्या अंतःकरणाला अजूनहि सुख होईल." "कुँवरसिंह म्हणाला, मला गेलेल्या राज्याचें वाईट वाटत नाहीं; वंशक्षयाचीहि मला पर्वा नाहीं. परंतु, गेल्या लढायांत गोरे सैनिक

ज्या हटातटानें प्राणांचीहि पर्वा न बाळगतां लढले तसे आपले सैनिक लढले नाहींत असें पाहून मला वाईट वाटलें व डोळ्यांतून अश्रुपात झाला ! हरकत नाहीं. आतां या कुँवरसिंहाचा पराक्रम तुम्हांला दिसेल." असें म्हणून कुँवरसिंह आपले विचार ठरवूं लागला.

**कुँवरसिंहाचा निश्चयः—**

समरभूमीवर प्रत्यक्ष जें दृश्य कुँवरसिंहानें पाहिलें त्यावरून त्याची खात्री होऊन चुकली कीं, गोऱ्यांचें संख्याबल अधिक नसलें तरी ते आपल्या शस्त्रांच्या जोरावर विद्रोही सैन्याला भारी ठरतात व पराभवानें हिंदी अंतःकरणें हतोत्साह होतात. ही परिस्थिति लक्षांत आणून 'अशुभस्य कालहरणम्' या न्यायानें त्यानें गोऱ्यांशीं हातघाईची लढाई कांहीं कालपर्यंत तरी करावयाची नाहीं असें ठरविलें. जो खरा सेनानायक असतो त्यालाच आपल्या अनुयायांचें वैगुण्य फार लवकर कळतें. कांहीं काळ गेल्यानंतर आपल्यासमोर असलेल्या शत्रूची युद्धपद्धतिहि समजण्यास बरें पडतें व त्याच्याच पद्धतीनें त्याच्याशीं युद्धप्रसंग करून प्रसंगविशेषीं त्याचा पराभव देखील करतां येतो, अशा विचारसरणीनें प्रेरित होऊन कुँवर-सिंहानें कांहीं काळ डोंगरांत दडी मारून चोरट्या हल्ल्यांनीं शत्रूंस बेजार करण्याचें ठरविलें. गनिमी काव्याची युद्धपद्धति आज कित्येक प्रसंगीं तरी भारतवर्षांत यशस्वी ठरली आहे. महाराष्ट्रीयांस तर शिवाजीमहाराजांच्या चरित्रानें त्या पद्धतीची उपयुक्तता फार पटली आहे. समरयश शत्रूच्या हातांतून हिरावून घेण्यास या पद्धतीसारखा रामबाण उपाय नाहीं व याच उपायाचा अवलंब कुँवरसिंहानें केला. ससूराम व कैमूर या पहाडांच्या आश्रयानें राहून त्यानें स्वातंत्र्याची ध्वजा फडकत ठेवण्याचें ठरविलें व आपले

विचार प्रत्यक्ष आचरणांतहि आणण्यास त्यानें प्रत्यक्ष सुरुवात केली. गोऱ्यांना या बाजूचें रणक्षेत्र फारसें माहीत नव्हतें. कुँवरसिंहाच्या शिपायांचा तो मुलूख जन्मस्थानच असल्यामुळें त्यांनीं गोऱ्या शिपायांना बोटांवर नाचविल्यासारखें झुलविलें. इकडून तिकडे, तिकडून इकडे, असें करतांना इंग्रजांचें बेहद्द हाल झाले व त्यांचे कित्येक सैनिक नुसत्या येरझारांतच ख्रिस्तवासी झाले. केवळ शिपाई मेले येवढ्यांतच कुँवरसिंहाच्या यशाचें मोजमाप होत नाहीं. त्याच्या यशांत आणखी किती तरी महत्त्वाच्या गोष्टी समाविष्ट होत्या.

**कुँवरसिंहाच्या बंडानें काय उत्पात केले ? :--**

कुँवरसिंहाच्या बंडाचें महत्त्व शालेय इतिहासलेखकांना कां पटलेलें नाहीं कोणास ठाऊक ? कोणतींहि पुस्तकें उघडून पहा. कुँवरसिंहाचा नामनिर्देशहि केलेला आपणांस दिसत नाहीं. याचें कारण बहुतकरून आमची आकुंचित दृष्टि हेंच असावें. नानासाहेब, तात्या टोपे, झांशीची लक्ष्मीबाई वगैरे महाराष्ट्रीय नांवें घेतलीं कीं, वडिलांचें ऋण आम्हीं फेडिलें असें आमच्या इकडील लेखकांस वाटत असावें. नाहीं म्हणावयास प्रो० बेहेरे यांच्या बंडाच्या पुस्तकांत मात्र ह्या बंडाचा त्रोटक उल्लेख केला आहे. असली ही संकुचित दृष्टि इतिहासलेखनांत मुळींच कामाची नाहीं; परंतु तसें घडत नाहीं. वास्तविक रीतीनें बंडाच्या इतिहासांत दानापुरच्या उठावाचें महत्त्व मीरत येथील उत्पाताच्या खालोखाल आहे. कारण कीं, त्या योगें पूर्व-पश्चिम ४०० मैल व उत्तर-दक्षिण १५० मैल येवढ्या मोठ्या टापूंत व कमींत कमी दोन कोटि लोकांच्या मनांत अशांततेचा उद्भव झाला. गंगा-यमुना या नद्यांमधील दुआब, रोहिलखंड व पूर्व-पश्चिम बिहार ह्या प्रदेशांतून कांहीं काळ कंपनी सरकारचें राज्य उखडलें गेलें व कोणींहि

उठावें व गोऱ्याला लुटावें अशी दीन स्थिति राज्यकर्त्या इंग्रजांची झाली. या बंडाचा सर्वांत मोठा परिणाम म्हणजे कलकत्ता ते अलाहाबाद या शहरांतील दळणवळणाच्या सर्व मार्गांत मोठी धोंड पडली व दिल्ली, कानपूर, लखनौ व अलाहाबाद येथील बंडवाल्यांना कांहीं काळ तरी औट घटकेच्या स्वराज्याचा उपभोग घ्यावयास मिळाला. कलकत्त्याकडील रस्ता जर अशा रीतीनें आडवला गेला नसता तर आयरसारखे शूर शिपाई फार लवकर बंडाच्या मुख्य केंद्रांकडे पोंचले असते व बंडाचा उपशम फार लवकर झाला असता. परंतु कुंवरसिंहाच्या समरकौशल्यानें आयरसारखे किरकोळ अधिकारीच नाहींत तर बड्या लाटांसारखीं मोठमोठीं धेंडेंहि दिपून गेलीं असें आपणास लवकरच दिसेल.

**जगदीशपूर येथील पराभवानंतरः—**

जगदीशपूर येथील पराभवानंतर कुँवरसिंहानें आपल्या आडोशाच्या आश्रयस्थानांत बसून इंग्रजी सैन्याला चिमटे काढण्याचें ठरविलें हें आपण पाहिलेंच आहे. पण याहीपेक्षां अधिक महत्त्वाची एक गोष्ट कुँवरसिंह करीत होता. आपल्या जगदीशपुराकडील 'भोजपुरी' लोक ज्या ज्या ठिकाणीं नोकरीस होते त्या त्या पलटणींत अस्वस्थता उत्पन्न करण्याचें काम त्यानें सुरू केलें. ह्या भोजपुरी लोकांच्या स्वामिनिष्ठेबद्दल इंग्रज ग्रंथकारांनीं देखील मुक्तकंठानें स्तुति केली आहे. येवढें मोठें बक्षिस कुँवरसिंहाचें डोकें आणून देणारास द्यावयाचें ठरलें असतांना देखील एकहि भोजपुरी निमकहराम ठरला नाहीं. नाहीं तर आमचा महाराष्ट्र ! फितुरी तर त्याच्या पांचवीला पुजलेली दिसते ! जी वीरप्रसू महाराष्ट्रभू शिवाजीसारख्या स्वराज्यसंस्थापकाला प्रसवली तिनेंच सूर्याजी पिसाळासारख्यांना जन्म दिला हा केवढा चमत्कार वाटतो ! पण

हें असें आहे खरें! खडकीच्या लढाईत एल्फिन्स्टन् हातांत सांपडला असतांना त्याला कोणीं वाट दिली? कोरेगांवच्या लढाईत समरभूमीवर इंग्रज पुरे लोळण्याचा रंग आला असतां त्यांच्यासाठीं कोणीं आपले जीव धोक्यांत घातले? रायगड लढविला जात असतां दारूचें कोठार अमुक ठिकाणीं आहे असें कोणीं दाखवून दिलें? हीं सर्व पापकर्मे आमच्यांतील फितुरांनीं केलीं व बदल्यांत काय मिळविलें? तर दास्यशृंखला! झाल्या गोष्टी होऊन गेल्या. त्याचें आतां काय? परंतु असले विचार आले म्हणजे वाईट वाटतें म्हणून चार शब्द लेखणींतून बाहेर पडल्याशिवाय राहत नाहींत. दानापुराच्या घटनेनंतर बऱ्हाणपूर, रामपूर, भागलपूर, हजारीबाग, रावणी, मोंगिर व गया या जवळच्या ठिकाणीं व आसाम आणि जबलपूर ह्या दूरच्या प्रदेशांत बंडाची धग पेटविण्याचें श्रेय कुँवरसिंहानें घेतलें. कंपनीच्या अंमलदारांनीं बिकट परिस्थिति जाणून गंगेच्या खोऱ्यांत, रोहिलखंडांत व आसपासच्या सर्व अस्वस्थ भागांत लष्करी कायदा पुकारला.

**लष्करी अमलाचा पुकारा व कुँवरसिंहाच्या हालचालीः--**

अशा तऱ्हेनें ब्रिटिश सत्तेविरुद्ध उघड रीतीनें बंडखोर ठरून कुँवरसिंहाच्या डोक्याला किंमतसुद्धां लागली. तिकडे जहागिरीवर गाढवांचे नांगर फिरले व जर कोणीं त्याला मदत करण्यास तयार होण्याचें धैर्य केलें तर लष्करी कायद्याचा आश्रय घेऊन त्याला फांसावर लटकावण्याचीहि सिद्धता झाली. अशा सर्व विपन्नावस्थेंत एक गोष्ट मात्र त्याचे फार पथ्यावर पडली. टेलर कमिशनरला याच वेळीं त्याचे जागेवरून बदलण्यांत आलें. कारण त्याचीं कृत्यें कलकत्त्यास पसंत पडलीं नाहींत. कलकत्त्याच्या अधिकाऱ्यांची प्रामाणिक समजूत होती कीं, कुँवरसिंहासारखा मोहरा पाटण्याच्या

कमिशनरच्या फाजील संशयी स्वभावामुळें कंपनी सरकारचे हातचा गेला. कोणी म्हणतात कीं, तेथील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचें व टेलरचें वांकडें होतें. कांहीं का असेना, टेलरला अधिकारभ्रष्ट करून दुसरीकडे बदलण्यांत आलें व त्याच्या जागीं अलेंझो मनी व मिस्तर सॅम्युअल्स् नामक अधिकाऱ्यांच्या नेमणुका एकामागून एक करण्यांत आल्या. या नव्या अधिकाऱ्यांना कुँवरसिंहानें अशाहि बिकट परिस्थितींत बोटांवर नाचविलें. आपल्या ठिकाणांचा त्यानें कधींहि पत्ता लागूं दिला नाहीं व बसल्या ठिकाणावरून नवीन नवीन सहचर मिळवण्याच्या कामीं तो लागला. जगदीशपुरच्या पराभवानंतर केवळ २ दिवसांनीं बऱ्हाणपुरच्या ५ व्या इरेग्युलर पलटणीनें बंड केलें. सप्टेंबरच्या १६ व १८ तारखांना मध्यप्रांतांत नागोद व जबलपूर येथें ५० व ५२ नंबरच्या नेटिव्ह पलटणींनीं अनुक्रमें बंडें केलीं. इंग्रजी फौजा कुँवरसिंहाचे पाठीवर होत्याच.

**सन १८५७ चा जुलै-ऑगस्टः—**

सत्तावन सालच्या शिपाईयुद्धाच्या अनेक कथा लिहिल्या गेल्या आहेत. त्यांत 'चेंबर्स हिस्टरी ऑफ् दि सीपॉय वॉर' नामक एक पुस्तक आहे त्यांत स्पष्ट लिहिलें आहे, कीं जुलै-ऑगस्ट या महिन्यांत आपल्या चरित्र-नायकाच्या दराऱ्यानें बिहार प्रांताच्या बहुतेक सर्व मोठमोठ्या शहरांतून एकहि युरोपियन शिल्लक राहिला नाहीं. कलकत्त्याचा लेफ्टनंट गव्हर्नर हॅलिडे याजवर पत्रें व तारा यांचा एकसारखा पाऊस पडत होता. सर्वांतून एकच ध्वनि ऐकूं येई. "आमचे मदतीस **गोरी** फौज पाठवून द्या, आम्ही संकटांत आहों." बरें झालें, याच वेळीं इराणांतून गोरी फौज कलकत्त्यास येऊन पोंचली व तिच्यांतून कांहीं लोक

तरी अशांततेच्या क्षेत्रांत पाठवितां आले. इतिहासकार स्वतःच या काळांतील परिस्थितीबद्दल काय म्हणतात ते त्यांचेच शब्दांत लिहूं. "ऑगस्ट महिन्याचा शेवट जवळ जवळ येऊं लागला तसतसा हॅलिडे साहेबांचा तारा व पत्रें यांचा व्याप वाढूं लागला. शिरगोटी व वणोडा येथें एकहि गोरा शिल्लक नव्हता. रामगडच्या फौजेनें रांची येथें बंड केलें त्याचा परिणाम पुरुलिया व इतर जवळच्या ठिकाणीं झाला. आतां जर कांहीं गोरी फौज त्या प्रांतांत पाठविली गेली नाहीं तर प्रसंग कठीण होईल अशी जाणीव हॅलिडे साहेबानें कॅनिंगला दिली. नशिबानें याच वेळीं कांहीं गोरी फौज दाखल झाली होती. ऑगस्ट संपला. कुँवरसिंह बुंदेलखंडांतील बंडवाल्यांशीं साहचर्य करण्याचे दृष्टीनें त्या प्रांताकडे कूच करीत होता. सिगौलीचे बंडवाले अयोध्या प्रांताकडे चाल करीत होते. रामगड येथील बंडवाले कुँवरसिंहाला मिळण्यासाठीं शोण नदीच्या बाजूला वाढत होते. आणि ठिकठिकाणीं लहान लहान जहागिरदार— या बंडांनीं उत्तेजित होऊन ?—गोऱ्यांना लुटण्याची संधि बघत होते. एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे सर्वत्र राजसत्तेचा लोप झाला होता व अराजकतेचें साम्राज्य पसरलें होतें."

**कुँवरसिंहाचे आसामांतील हितचिंतक :—**

आसामांतील पहिली आसाम पलटण याच सुमारास बंड करून उठली. पलटणींतील अधिकारी शिपाई दानापुरांतील ४० व्या पलटणींतील शिपायांचे नातेवाईक होते. तिकडची हकीगत ऐकल्याबरोबर आसामांतील एका लहानशा राजाला आपला पुढारी करून

आसामांतील शिपायांनीं बंडाचें निशाण रोविलें. या बंडाचा बंदोबस्त मोठ्या काळजीनें करण्यांत आला. कारण, बंडाची ज्वाला सरहद्दीपर्यंत येणें ब्रिटिशांचे दृष्टीनें अत्यंत अनिष्ट होतें. ब्रह्म-देशाशीं नुकतेंच युद्ध होऊन गेलें होतें व तेथें का युद्धाची ज्वाला पुन्हा पेटली कीं, इंग्रजी राजसत्तेचा हिंदुस्तानांत अस्त व्हावयास मुळींच अवकाश लागला नसता. हें बंड उद्भवलें अशी नुसती कुणकुण लागल्याबरोबर कर्नल जेंकिन्स् व कॅप्टन् लावथर या दोन सेनानायकांबरोबर तोफखाना व फौज देऊन पाठवण्यांत आलें. सैन्याची निवड फार हुशारीनें करण्यांत आली होती. दोनहि तुकडयांत मिळून एकहि हिंदुस्तानी शिपाई नव्हता. एक तुकडी तर सबंध गुरख्यांची होती व दुसऱ्या तुकडींत मुद्दाम निवड करून हिंदुस्तानी शिपाई घेतला जाणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली होती. रात्रीच्या वेळीं राजाचे ठिकाणावर हल्ला करण्यांत आला. हल्ला करणाऱ्या सैन्याच्या हालचाली अगदीं गुप्त ठेवण्यांत आल्या होत्या. फार काय सांगावें, वर्तमानपत्रकर्त्यांना देखील ह्या सैन्याच्या हालचालींची बातमी गुप्त ठेवण्याबद्दल ताकीद देण्यांत आली होती. बंडवाल्या पलटणींपैकीं हिंदुस्तानी नसलेल्या शिपायांना कटांत सामील करून घेण्यांत आलें. रात्रीच्या शान्त वातावरणांत राजा व बंडवाले शिपाई स्वतंत्रतेचीं सुखस्वप्नें बघत असतांच सर्वांना गिरफदार करण्यांत आलें व दिवस उजाडतांच राजा व प्रधान यांच्या घरांच्या झडत्या घेण्यांत आल्या. राजद्रोही कागदपत्रें फारशीं मिळालीं नाहींत तथापि सायंकाळच्या सुमारास त्या सर्वांना कैद करून कलकत्त्याच्या बाजूनें हालवण्यांत आलें. आसामांतील बंड फसलें पण राम-गढाच्या बंडवाल्यांविरुद्ध बंडवाल्यांना तितकें यश आलें नाहीं.

स्थळ प्रत

## कुँवरसिंहाचे रामगढ व देवगढ येथील दोस्त:—

रामगढ येथील पायदळ फौजेनें ता. ३१ जुलै रोजीं बंड केल्याचें आपण वाचलेंच आहे. ऑगस्ट महिना केवळ इकडेतिकडे करण्यांत गेला. कारण, तिकडे कुँवरसिंहाचा ठाम बेत ठरत होता. अखेरीस सप्टेंबरच्या ११ व्या तारखेस फौजेंतील शिपायांनीं हालचाल करण्यास सुरुवात केली. प्रथम जवळच असलेल्या दोरुंडा नामक ठिकाणावर त्यांनीं हल्ला केला; व तेथें सांपडलेली लूट घेऊन तिखू घाटानें उतरून पालामाऊ जिल्ह्यांतून कुँवरसिंहास जाऊन मिळण्याचें त्यांनीं ठरविलें. छत्रा या ठिकाणीं त्यांची व इंग्रजी फौजेची गांठ पडली. अटीतटीची लढाई झाली परंतु इंग्रजांचा बागनेटांचा हल्ला बंडवाल्यांना सहन करतां आला नाहीं व त्यांचा पराभव झाला. रामगढच्या बंडवाल्यांपेक्षां देवगढ येथील ३२ व्या पलटणीला चांगलें यश मिळालें. ज्या मेजर इंग्लिश नांवाच्या सेनापतीनें रामगढच्या शिपायांवर विजय मिळविला होता त्याच सेनापतीला ह्या नवीन बंडवाल्यांवर पाठविण्यांत आलें. देवगढ येथील पलटणीनें ता. ९ ऑक्टोबर रोजीं बंड केलें होतें. बागनेटांपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून त्यांनीं आपल्या दोन तुकड्या केल्या व पहिल्या तुकडीनें तर गोऱ्या शिपायांना मोठ्या हुशारीनें चकवून शोण नदी ओलांडली व कुँवरसिंहाच्या सैन्याला जाऊन ती तुकडी मिळाली. दुसऱ्या तुकडीला मात्र इंग्रजांनीं नोवाडा या ठिकाणाजवळ गांठलें; परंतु चांदण्या रात्रीचा फायदा घेऊन शिपायांनीं आपली चाल कायम ठेवली व इंग्रजांना चुकविलें. शोणनदी पार केल्यानंतर बंडवाल्यांचा पाठलाग झाला नाहीं व इंग्रज शिपाई कंटाळून अथवा कुँवरसिंहाशीं तोंड देण्याचें

चुकवून गयेला परत गेले. तिकडे कुँवरसिंहानें रेवा संस्थानाकडे आपला मोर्चा हलवण्याचें निश्चित केलें.

**कुँवरसिंहाचें रेवा संस्थानकडे कूचः—**

इंग्रजी इतिहासकार लिहितात कीं, जगदीशपूर पडल्यानंतर काय करावें हें कुँवरसिंहास सुचेना, असें वाटतें. या बाबतींत स्पष्टपणें नमूद करणें जरूर आहे कीं, कुँवरसिंहासारखा सेनानी असल्या क्षुद्र पराभवांनीं गांगरून जाणारा नव्हता. केवळ आपल्या अनुयायांवरच अवलंबून राहिलें तर भागत नाहीं, नुसत्या हाणामारीच्या युद्धांत त्यांच्या बाहुबलाचा उपयोग. पण गोळागोळीच्या लढाईत त्यांना फुकट मरावें लागतें हें कुँवरसिंहानें पाहिलें होतें आणि म्हणून ससराम ते रोहठसगड ह्या दुर्गम टापूंत राहून मिळतील तेवढे इंग्रजी शिस्त जाणणारे सैनिक मिळविण्याचाच उद्योग कुँवरसिंहानें केला व त्यांत त्याला यशहि आलें. टाइम्स् पत्राचा संपादक तर, घाबरून लिहूं लागला कीं, "कुँवरसिंहांजवळ ब्रिटिशांच्या हिंदुस्तानांतील हिंदी फौजेपैकीं जवळ जवळ पंचमांश हिंदी सैन्य एकवटलें आहे. अशा स्थितींत जर त्यानें कलकत्त्याच्या वाटेवरील राणीगंज स्टेशन ताब्यांत घेतलें तर कसें होईल ?" आणि ही भीति वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. परंतु कुँवरसिंह चतुर सेनानी होता. त्यानें पाहिलें कीं, गोऱ्या सैन्याशीं गांठ होतां होईल तोंवर घालूंच नये. त्याला निरनिराळ्या ठिकाणीं बंडें उत्पन्न करून अडकवून ठेवावें म्हणजे झालें व याच दृष्टीनें हजारीबाग, रायगढ, देवगढ, आसाम, चितगांव व डाक्का या ठिकाणीं त्यानें बंडाची उठावणी केली व आपण स्वतां रेवा संस्थानाकडे कूच केलें. नकाशांत बघितल्याबरोबर कुँवरसिंहाच्या ह्या हालचालींतील रहस्य लक्षांत येण्यासारखें आहे. गोऱ्या

फौजेचा कलकत्त्याहून वाहणारा प्रवाह तिकडेच थोपविण्याचें काम इतर बंडवाल्यांवर सोंपवून दक्षिणेंतून बंडवाल्यांविरुद्ध येणारी मदत त्यानें बंद करण्याचें ठरविलें व ह्याच हेतूनें रेवा संस्थानाकडे कुँवरसिंहानें आपला मोर्चा फिरविला. परंतु, तेथें त्याला रेवा संस्थानचा पोलिटिकल एजंट् लेफ्टनंट ऑस्बोर्न हा प्रबळ प्रतिस्पर्धि भेटला.

**लेफ्टनंट् ऑस्बोर्न्:—**

बंडाच्या क्षुब्ध वातावरणांत डोकें शांत ठेवणारे जे कांहीं थोडे इंग्रज त्या वेळीं होते त्यांत लेफ्टनंट् ऑस्बोर्नची गणना करणें आवश्यक आहे. आजूबाजूला बंडाची धग लागलेली पाहून त्यानें रेवाच्या संस्थानिकाला अगदीं आपल्या मुठींत ठेविलें. रेवा हें फारसें मोठें शहर नसलें तरी सैन्याच्या हालचालीचे दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे ही गोष्ट कुँवरसिंहाप्रमाणें ऑस्बोर्न् यानेंहि जाणिली; व ज्यासाठीं कुँवरसिंह धडपडत होता तें ध्येय ओळखून त्यानें कुँवरसिंहाला यश येऊं दिलें नाहीं. कुँवरसिंहाच्या मनांत जबलपूर ते बनारस या मार्गानें दक्षिणेंतून येणारी मदत तोडावयाचें होतें ही गोष्ट ओळखून रेवा शहराच्या दक्षिण बाजूस असलेलें उमापट्टण हें गांव हस्तगत करून ठेविलें. उमापट्टणाहून नागोद, जबलपूर व सागर ह्या शहरीं रस्ते जात होते. केंद्रबिंदूच इंग्रजांचे हातीं राहिल्यामुळें या सर्व ठिकाणीं बंडें करूनहि कुँवरसिंहाला आपला हेतु साधतां आला नाहीं. त्याचप्रमाणें बनारस, मिर्झापूर व चुनार या बाजूचा संबंध तोडण्यासाठीं कत्रा खिंडींत ११०० सैनिक ५ तोफांसह ठेवण्यांत आले. तसेंच वायव्य बाजूला बंडवाल्यांनीं जोर न करावा म्हणून बांदा येथेंहि ७०० सैनिक पाठविण्यांत आले. जाहीर रीतीनें घोषणा करण्यांत आली कीं,

" रेवा नरेशांनीं आपली फौज इंग्रजांचे दिमतीस दिली आहे त्याबद्दल इंग्रज सरकार त्यांचे फार आभारी आहेत व त्या बहाद्दर सैन्यांतील जे कोणी विशेष शौर्य दाखवतील त्यांना बक्षिसेंहि देण्यांत येतील." रेवा नरेशाचें सैन्य बंडवाल्यांचा मोड करून पुन्हा रेवा नरेशाचे तिजोरींतील बक्षिसें मिळवणार व बंडाचा मोड झाल्यावर इंग्रजी सत्ता मात्र हिंदुस्तानांत चिरस्थायी होणार हें चित्र मनापुढें आल्याबरोबर कसें तरी वाटतें. पण रेवा नरेशांची राजनिष्ठा पहिल्या प्रतीची ठरली हें मात्र खरें.

**कुँवरसिंह रेवाकडे कां गेले ? तेथें काय घडलें ? :—**

रेवाकडे जाण्याचा कुँवरसिंहाचा हेतु राजकीय तर होताच; पण त्यांत आणखीहि एक हेतु होता. कुँवरसिंह ज्याप्रमाणें उच्च कुलांतील रजपूत घराण्यांत उत्पन्न झाला होता त्याचप्रमाणें रेवा नरेशहि रजपूत खानदानींत जन्माला आले होते. हा संबंध लक्षांत घेऊन रेवा संस्थानिकांना कुँवरसिंहानें निरोप पाठविला कीं, तुम्ही मला येऊन मिळा म्हणजे बंडाला चांगली मदत होईल व इंग्रजी सत्तेचा पाया गंगा-यमुनांच्या दक्षिण भागांतून तरी पूर्णपणें उखडून टाकतां येईल." आपणांस ठाऊकच आहे कीं, रेवा संस्थान जरी लहान होतें तरी तें फारच नाक्याच्या ठिकाणावर वसलें असल्याकारणानें वर्तुलमध्य ताब्यांत असल्याशिवाय परिघाचा जसा उपयोग होत नाहीं तशी बंडवाल्यांची परिस्थिति झाली होती. सप्टेंबर महिन्यांत रेवा संस्थानिकांना आपल्या बाजूस फोडण्याचे शक्य ते प्रयत्न कुँवरसिंहानें करून पाहिले; परंतु ते सर्व व्यर्थ गेले. ऑस्बोर्नसाहेबानें रेवा नरेशाला इतकें भारून ठेविलें होतें कीं, कुँवरसिंहाचें आपल्याशीं असलेलें नातेंहि तो विसरला व " माझ्याकडून आपणांस मुळींच मदत मिळणार नाहीं " असा

निर्वाणीचा निरोप कुँवरसिंहास त्यानें पाठविला. निराशेनें कुँवरसिंहाला आपले सर्वच बेत बदलावे लागले. तथापि तेवढ्यां-तल्या तेवढ्यांत नागोद व जबलपूर येथील हिंदी शिपायांना क्रान्तीची उठावणी देण्यास कुँवरसिंह विसरला नाहीं. ऑस्बोर्न रेवा-नरेशांवर बहोत खूष झाला. रेवा संस्थानासारखीं आज किती तरी संस्थानें हिंदुस्तानांत आहेत. नकाशावरील पिवळ्या व तांबड्या रंगांचें साहचर्य अभ्यासू विद्यार्थ्याला काय बरें धडा शिकवील? याचें उत्तर वाचकांनीं आपल्याच बुद्धीनें काय तें देऊन घ्यावें.

**ऑस्बोर्न्चें यशस्वी कार्यः—**

ऑस्बोर्न्नें रेवा संस्थानांत इंग्रजी सत्ता कायम राखून फार मोठें कार्य साधलें. रेवा संस्थानिकाप्रमाणेंच नागोद येथील संस्थानिका-लाहि ऑस्बोर्ननें आपल्या वश करून ठेवलें. आपल्या विश्वस्त अनु-चरांकडून त्यानें सैन्याची एक तुकडी तयार करविली व त्या तुकडीचें सैनापत्य कर्नल हाइन्ड् या अधिकाऱ्याकडे सोंप-विण्यांत आलें. नोव्हेंबर व दिजंबर हे दोन महिने या नवीन तयार केलेल्या सैन्याला शिक्षण देण्यांत गेले. सैनिकांनीं लढाईच्या हालचाली कशा कराव्यात, छावण्या कशा बनवाव्यात, लढाईच्या वेळीं कूच कसें करावें, नवीन शस्त्रांचा उपयोग कसा करावा या सर्व गोष्टी त्यांना पढविण्यांत आल्या व रेवा शहरांतून या सैन्यानें आपला पाय काढला. त्यांचें मुख्य काम दक्षिणेकडील रस्ता मोकळा ठेवण्याचें होतें. तें त्या शिपायांनीं तर केलेंच; परंतु या-पेक्षां अधिक काम म्हणजे कांहीं लहान सहान विजयहि त्या सैन्यानें मिळविले. १८५७ च्या दिजंबर महिन्यापासून १८५८ च्या फेब्रुआरीपर्यंत या सैन्यानें सहा किल्ले, चाळीस साध्या तोफा, दोन यांत्रिक तोफा व दोन निशाणें काबीज केलीं. या फौजेचें सर्वांत

महत्त्वाचें काम म्हणजे ब्रिटिशांची मुलकी सत्ताहि या प्रदेशांत पुनः स्थापन करणें हें होतें व तेंहि तिनें चांगलें बजाविलें. ठिकठिकाणचे उध्वस्त झालेले डाक-बंगले व पोलीसठाणीं परत वसविण्यांत आलीं व इंग्रजी सत्तेचा उखडून टाकला गेलेला पाया परत बसविण्यांत आला. खुद्द गव्हर्नर जनरलनें ऑस्बोर्न् व हाइन्ड् या जोडीचे आभार मानले व त्यांच्या कार्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. इतिहासकार हर्षभरित होऊन म्हणतो, "इतर सर्व पांडे व सिंग इंग्रजांविरुद्ध उठावणी करीत असतां रेवा व नागोद येथील दीनबंधु पांडे, शिवगोविंद पांडे, देवीसिंग, विश्वेश्वरसिंग व असेच इतर सिंग व पांडे इंग्रजांकडून लढले हें सांगतांना फार आनंद वाटतो. त्यांची स्वामिभक्ति अनुपम होती यांत शंकाच नाहीं." खरेंच ! अशा स्वामिभक्तीला तोड दुसरीकडे नाहींच सांपडावयाची !

**कुँवरसिंहाचें काल्पीकडे कूचः—**

रेवा संस्थानांत उठावणी करण्याचें साधलें नाहीं असें पाहून कुँवरसिंहानें तो नाद सोडून दिला. दिल्लीपतनाची बातमीहि याच वेळीं येऊन दाखल झाली. तेव्हां काल्पी व बांदा या शहरांचे रोखानें कुँवरसिंह निघाला. सप्टेंबर व ऑक्टोबर या दोनहि महिन्यांत या वृद्ध सेनाग्रणीच्या धास्तीनें जबलपूर, हुशंगाबाद, नरसिंगपूर, मंडला, व दमोह वगैरे सर्व मोठ्या शहरांतून गोऱ्या लोकांनीं आपलें तोंड लपविलें. नाहीं म्हणावयास रेवा संस्थान मात्र इंग्रजांच्या बाजूचें राहिलें. त्याची हकीगत आतांच सांगण्यांत आली आहे. मध्य हिंदुस्तानांतील मुख्य इंग्रज अधिकारी मेजर अर्स्किन् तारा पाठवून दमला; परंतु लखनौच्या वेढ्यांत इंग्रज अडकले होते. त्यांना सोडविल्याशिवाय दुसरें कांहींहि काम हातीं घ्यावयाचें नाहीं असा जबाब कॅनिंग्कडून आर्स्किन्‌ला मिळाला.

ग्वालिअरच्या सेनेनें याच सुमाराला नानासाहेब पेशव्यांचें आधिपत्य मानलें होतें व नानासाहेब याच समयाला काल्पीकडे चाल करून येत होते. कुँवरसिंहाचें याच वेळीं काल्पीकडे प्रयाण उगाच निर्हेतुक दृष्टीनें झालेलें नसावें. याच वेळीं कुँवरसिंहाच्या बिहारी वीरांची ग्वालिअरच्या मराठी मर्दांशीं सांगड घालण्यांत आली असती तर सबंध बुंदेलखंड पेटण्यास मुळींच उशीर लागला नसता. बुंदेलखंडांतून नर्मदेकडे कूच केलें असतें तर ऑस्बोर्न साहेबाला चिलटासारखें चिरडून टाकतां आलें असतें. पण काय? हें सर्व स्वप्न ठरलें! असें म्हणतात कीं, नाना, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई व कुँवरसिंह यांच्या गांठीभेटीहि झाल्या. परंतु कुँवरसिंहाची कल्पना अमलांत मात्र आली नाहीं; व कुँवरसिंहाला पुन्हा एकदां आपला बेत बदलावा लागला.

**कुँवरसिंह दबा धरून बसतो:—**

इ. स. १८५७ चे नवंबर व डिजंबर या दोन महिन्यांत कानपूर शहराकडे सर्वांचें लक्ष वेधलें होतें. बंडवाल्यांच्या ग्वालेरी सैन्यानें जनरल विंडहॅम् या सेनानीचा कानपूर मुक्कामीं पराभव केला होता व ब्रिटिश सत्तेला लागलेला हा डाग धुऊन काढणें प्राप्त झालें होतें. मोठमोठे ब्रिटिश सेनानी त्या कामास लागले व तारीख ६ डिजंबर रोजीं झालेल्या अपमानाचा सूड घेण्यांत आला आणि कानपूर पुन्हा इंग्रजांचे हातीं आलें. यापुढील सर्व लढायांतील फौजांचे आंकडे हजारांनीं मोजतां येऊं लागले; कारण आतां खुद्द सर सेनापति कॉलिन् कॅंबेल् रणक्षेत्रांत जातीनें उतरले होते व गव्हर्नर जनरल् साहेब आपली राजधानी सोडून युद्धचमत्कार बघण्यासाठीं व युक्तीच्या चार गोष्टी सांगण्यासाठीं अलाहाबाद् येथें मुक्कामास आले होते. कानपुराहून गोऱ्या सैन्यानें आपली

दृष्टि लखनौकडे फेंकिली. ३१००० गोऱ्या सैन्यानिशीं कँबेल्-साहेबानें लखनौवर हल्ला केला व तें शहर १५ दिवसांच्या लढाई-नंतर इंग्रजांच्या हातीं आलें. अयोध्या प्रांतांतील बंडवाल्यांनीं जेवढा त्रास इंग्रजांना दिला तेवढा दुसरा कोणीहि दिला नसेल. साहजिकच आहे कीं, या कालांत कुँवरसिंहाला दबा धरून बसणेंच प्राप्त होतें. मोठ्या नगाऱ्याच्या आवाजापुढें पिपाणीचा आवाज कधींहि ऐकूं येत नाहीं! एवंच, १८५७ नवंबर ते १८५८ मार्च-पर्यंत कुँवरसिंहाच्या हालचाली गुप्तपणें चालल्या होत्या. तथापि त्यानें या कालांत गंगा-यमुना दुआब ओलांडून अयोध्या प्रांता-पर्यंत मुक्काम गांठला होता हें आपणांस दिसून येईल. तारीख २१ मार्च, सन १८५८ रोजीं लखनौ शहर इंग्रजांच्या हस्तगत झालें. ब्रिटिश सिंह आतां कोठें स्वस्थ बसण्याचा विचार करीत आहे तों दुसऱ्याच दिवशीं बिहारी सिंहाची गर्जना ऐकूं आली.

**तारीख २२ मार्च सन १८५८:—**

बाबू कुँवरसिंह ऑक्टोबर १८५७ ते मार्च १८५८ या मुदतींत कोठें होता याचा थांग इंग्रजी इतिहासकारांना लागत नाहीं असें त्यांचे लेखांवरून वाचावयास मिळतें. आणि त्या वृद्ध रजपुताचा पत्ता लागणें तरी कोठें उचित होतें? संपत्काळीं सर्व सखेसोयरे मिळून येतात; परंतु विपत्तीच्या प्रसंगीं मदत करणारे थोडेच. नाना पेशवे, तात्या टोपी, बहादुरशहा वगैरे बंडाच्या नेत्यांचा पराभव झाल्यामुळें बंडवाल्यांचा जो पहिला उत्साह होता तो थंडा पडत चालला होता. येवढेंच नव्हे, तर ब्रिटिश राज्यकर्त्यांना पुढाऱ्यांच्या बातम्या पुरवणारी जातहि याच वेळीं अधिक पैदा होऊं लागली होती. दुर्जनांपासून जितकें दूर असावें तेवढें बरें. त्यांचा उपसर्ग अतिशय हानिकारक असतो. खलभुजंगांचा विचित्र

वधक्रम सुभाषितांतून वर्णिलेलाच आहे. एकाच्या कानाशीं लागावें व दुसऱ्याचा प्राण घ्यावा. असा तो वधक्रम असतो. पंचवीस हजार रुपयांचें आमिष पुष्कळांना ओढूं लागलें व कुँवरसिंहाच्या हालचालींची खास बातमी देणारे बातमीदार कुँवरसिंहाच्या पाळतीवर डोळ्यांत तेल घालून तयार राहूं लागले. पण धन्य त्या कुँवरसिंहाची कीं, सगळ्याच्या हातांवर त्यानें तुरी दिल्या. तथापि इंग्रजी इतिहासावरूनच अनुमानाचे सहायानें कुँवरसिंह कोठून कोठें गेले असतील हें ठरवितां येईल. नोव्हेंबरांत ते बुंदेलखंडांत असले पाहिजेत ( मंडेश्वर येथील लढाई—२४ नोव्हेंबर ). डिसेंबरांतहि ते तेथेंच होते ( मैहारी व संबळपूर येथील लढाया—ता. २८, ३०, डिसेंबर ). जानेवारी, फेब्रुवारी सन १८५८ मध्यें त्यांनीं गंगा-यमुना दुआबांतून आपला मार्ग आक्रमून ते मार्चच्या १७ तारखेस आझमगढपासून २५ मैलांवर प्रकट होऊन त्यांनीं अत्रौलिआ या ठिकाणावर हल्ला करून तें ठिकाण काबीज केलें. अशा तऱ्हेनें कुँवरसिंह मार्च महिन्यांत पूर्व अयोध्या प्रांतांत आलेले पाहून आझमगढाहून इंग्रजी फौज रवाना झाली व तारीख २२ मार्च सन १८५८ रोजीं इंग्रज व कुँवरसिंहाची विद्रोही सेना यांची अत्रौलिआ येथें गांठ पडली.

**अत्रौलिआची लढाई**—पहिली झटापटः—

आझमगढ येथील मॅजिस्ट्रेट मिस्तर डेव्हिस यांनीं कुँवरसिंहाच्या अत्रौलिआ येथील हालचालींची बातमी कोसीला येथें छावणी करून राहिलेल्या कर्नल मिल्मन् यास कळविली. लखनौच्या हल्ल्यांत ३१००० गोरें सैन्य एकवटलेलें असल्यामुळें मिल्मन्-जवळ ब्रिटिश व मद्रासी असे दोन्ही सैनिक मिळून २६० लोक व दोन तोफा होत्या. २१ तारखेस मिल्मनला कुँवरसिंहाच्या

अत्रौलिआ येथील हालचालींची बातमी मिळाली. २२ तारखेच्या सूर्योदयाचे वेळीं मिलमन्‌चे दृष्टीला, आंबराईच्या आश्रयानें कुँवर-सिंहाचे विश्वस्त अनुयायी विश्रांति घेत असलेले, पडले. तेच हे दानापूरचे बदमाष शिपाई कीं, ज्यांनीं कॅप्टन् डन्वरच्या सैनि-कांना अशाच एका आंबराईच्या आश्रयानें अंधारांत धोका दिला होता. क्रोधानें मनुष्याचे मनावर एकदां का पगडा बसविला कीं, विचार सुटतो व अविचारी मनुष्य जें कांहीं करतो त्यांत यशापेक्षां अपयशाची भीतीच अधिक असते, अशी सत्य परिस्थिति आहे. तरी पण मिलमन्‌च्या दृष्टीला ते दानापूरचे बंडखोर दिसल्याबरोबर राग आला हें मात्र खरें. ३७ वी मद्रासी पायदळ पलटण व कर्नल कंबर्लेज् याचे हाताखालचें घोडदळ यांनीं समोर दिसलेल्या शिपायांवर एकदम हल्ला केला व तोफांना बत्ती दिली. एकदम आलेल्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यास बंडवाले शिपाई समर्थ झाले नाहींत. त्यांनीं कांहीं वेळ दम धरून कच खाल्ली व मागें पळ काढला. संपलें ! बंडवाल्यांचा पुरा मोड झाला. आतां सबंध दिवसाच्या चालीनें दमलेल्या शिपायांना विश्रांति देणें जरूर आहे असें समजून मिलमन्‌नें शिपायांना आपापले गाशे पसरून सकाळ-ची न्याहारी करण्याचा हुकूम दिला. आम्रवृक्षाच्या शीतल छायेंत आतां स्वस्थ जेवण करावें म्हणून शिपाई बसतात तोंच जासूद ताजी बातमी घेऊन आला.

**अत्रौलिआची लढाई--दुसरी झटापट :--**

जासुदानें निरोप आणला होता कीं, मिलमन्‌नें ज्यांच्या परा-भव केला होता ते मूठभर लोक कुँवरसिंहाच्या केवळ आघाडीचें सैन्य होतें. मुख्य सैन्य तर अत्रौलिआच्या गढीच्या आश्रयानें सुव्यवस्थित व सुसज्ज असें लढाईच्या तयारीनें उभें होतें व मुख्य

सैन्याला मदत करणारे दुसरे मित्र अत्रौलिआच्या आसपास असलेल्या असंख्य आमरायांमधून व उसांच्या शेतांतून छपून बसलेले होते. आपलें सकाळचें काम हें दिवसाचें संपूर्ण काम नव्हतें, तो कामाचा केवळ आरंभ होता अशी कल्पना आल्याबरोबर मिल्मननें आपल्या सैन्याला पुन्हा एकदां कूच करण्याचा हुकूम दिला. ब्रिटिश सैन्य पुन्हा एकदां शत्रूवर चाल करून आलें. परंतु या वेळचा प्रकार मात्र सकाळच्या उलट झाला. शत्रुसैन्याबरोबर लढण्याची गोष्ट तर राहोच; पण त्याचेकडे बघण्याचीहि हिंमत मिल्मन्च्या सैनिकांना या वेळीं झाली नाहीं. कारण जिकडे दृष्टि फेकावी तिकडे शत्रूचे सैनिकच दिसूं लागले. एखाद्या नदीचा प्रचंड लोंढा समोर येत आहे असें पाहून तीराजवळ असलेला कोणता शहाणा पोहणार त्यांत उडी घालून परतीर गांठण्याचा प्रयत्न करील? कुँवरसिंहाची अपरंपार सेना पाहून मिल्मन्चा ऊर दडपून गेला व आतां पलायन केलें नाहीं तर चारी बाजूंनीं वेढलें जाऊन एकहि शिपाई जिवंत राहणार नाहीं अशी मिल्मन्ची खात्री झाली व चारी बाजूंनीं संपूर्ण वेढलें जाण्याचे आंत आपल्या मुख्य छावणीच्या बाजूनें कूच करून जीव वांचविण्याचा मिल्मन्नें निश्चय केला. सकाळीं विजयी झालेलें सैन्य दुपारीं पाठ फिरवून अपयशाचें गांठोडें उराशीं बांधून कोलिसाच्या बाजूनें मागें हटूं लागलें.

**कुँवरसिंहाची मिल्मन् मृगयाः—**

जगांत कांहीं लोक असे असतात कीं, त्यांचें वय वाढतें पण अक्कल मात्र वाढत नाहीं; ते अनुभवानें शहाणपण शिकत नाहींत. अशा मनुष्यांना परमेश्वर बुद्धि तरी कां देतो कोणास ठाऊक? कुँवरसिंह असला अक्कलहीन वयोवृद्ध मनुष्य नव्हता. त्याची

पाउणशें वर्षांचेवर असलेली उमर फुकट गेली नव्हती. त्यानें आपल्यास मिळालेल्या फुरसतीचा यथायोग्य उपयोग केला होता. कुँवरसिंहाच्या मतानें इंग्रजांशीं समोरासमोर लढाई करणें म्हणजे मृत्यूला आमंत्रण करण्यासारखें ठरलें. परंतु कार्यनाश होऊं नये म्हणून त्यानें इंग्रजांशीं लढण्याची एक नवीन युक्ति योजली व ती अत्रौलिआ मुक्कामापासून त्यानें अमलांतहि आणली. इंग्रजी फौजेच्या तोंडावर उगाच कांहीं तरी सैन्य ठेवून आपल्या मुख्य सैन्याच्या संख्याबलाचा अगर उद्देशाचाहि त्यानें शत्रूस थांग लागूं द्यावयाचा नाहीं असें ठरविलें. या आघाडीच्या टोळीला इंग्रजी ग्रंथकारांनीं Screen —पडदा— असें म्हटलें आहे. लष्करी भाषेंतील हा पडदा मराठी भाषेच्या संसारांत कसा आणावा हें समजत नसल्यामुळें आपण या सैन्याला 'आघाडीचें विलोभन सैन्य' असें जरा बोजड पण स्पष्टार्थबोधक असें नांव देऊं या. या फसव्या सैन्यांत देखील अत्यंत शूर लोकांची योजना करावी लागत असे. हे शूर वीर आपल्या प्राणांहूनाहि प्रिय असलेल्या मालकाकरितां आपल्या प्राणांचें दान करून धन्याचें उद्दिष्ट साधीत. आमच्या इकडील बाजी प्रभूंचें बलिदान आमच्या भावनांना थरारून सोडतें व आमच्या अंतःकरणांना कंपायमान करतें. कुँवरसिंहाच्या फौजेंत असले बाजी प्रभू एक-दोनच नाहीं, तर शेंकड्यांनीं मोजण्याइतके होते. धन्य ते चाकर व धन्य तो मालक! आम्हा भाटांनीं त्यांचीं केवळ स्तुतिस्तोत्रेंच गावींत!!

**कुँवरसिंहाची मिल्मन् मृगया**—पुढें चालू :—

२२ मार्च, १८५७ च्या सकाळीं आघाडीचें विलोभन सैन्य बळी देऊन मिन्मन्ला घेऱ्यांत धरण्याचें कुँवरसिंहांनीं ठरविलें. तो डाव ओळखून मिल्मन् मागें सरला व कुँवरसिंहांनीं पाठलागाला

आरंभ केला. कोसीला येथील छावणीपर्यंत पोंचण्यास जो अवधि मिल्मनूला लागला त्या अवधींत त्याचे पुष्कळ शिपाई कुँवरसिंहा-कडील शिपायांच्या निशाणबाजीमुळें जाया झाले होते. एकटा-दुकटा शिपाई मागें राहिला कीं, तेवढाच टिपून मारावा, शिस्तींत चाललेल्या सैन्याचे मुळींच वाटे जाऊं नये असा हुकूम कुँवर-सिंहानें आपल्या सैनिकांस देऊन ठेविला होता. कुँवरसिंहाच्या मृगयापटुत्वाची थोडीशी चमक त्याचे शिपायांचेहि अंगीं होतीच. फुलाच्या संगतींत मातीलाहि वास लागतोच ना ? तोच न्याय येथें घडून आला. आतां कोसीला छावणींत नक्कीच विश्रांति घ्यावी असें ठरवून आपल्या घोडदळाला कुँवरसिंहाच्या शिपायांवर त्यानें हल्ला करावयास सांगितलें. थोडीशी चकमक उडाली; परंतु याच वेळीं कोणी तरी बातमी दिली कीं, कुँवरसिंहाच्या मदतीस आणखी ५००० सैन्य येत आहे. आधींच कुँवरसिंहाकडील सैन्यबलाच्या पराक्रमानें घाबरलेल्या मिल्मनूच्या स्वारांना येवढी बातमी पुरली. त्यांच्यांतील सर्व विराट पुत्र "त्यांत मरेनाचि शिरतां कांटच्यांवर घालितां चिरे पट कीं" ही मोरोपंतांची उक्ति आठवल्याप्रमाणें हतोत्साह होऊन पुन्हा एकदां 'यः पलायते स जीवति' या न्यायाला अनुसरून जिवंत राहण्याकरतां पळून गेले व गोऱ्या सैन्याचा इंग्रजी तळ कुँवरसिंहाचे हातीं आला. त्यांत किती तरी युद्धो-पयोगी सामान विद्रोही सैनिकांचे हातीं लागलें ! मिल्मन् कोसीला सोडून आझमगढ मार्गें मागें हटला.

**मुक्काम आझमगढः—**

इतिहासाची पुनरावृत्ति होत असते असें म्हणतात. तें इतरत्र बघावयास मिळेल न मिळेल सांगतां येत नाहीं. आझमगढ-जवळील घटनेंत मात्र ती आवृत्ति तंतोतंत बघावयास मिळाली

हें मात्र खरें. कुँवरसिंहानें मागें जसें डन्वरला पराभूत केलें व बाकीच्या सैन्याला आरा येथील आरा हाउसमध्यें वेढिलें तीच गत मिल्मनूच्या सैन्याची झाली. अत्रौलिआ येथील अपजयानंतर कुँवरसिंहानें मिल्मनूला तसाच रेटीत रेटीत आझमगढापर्यंत आणला ही गोष्ट आपणांस अवगत झालीच आहे. आराचीच आवृत्ति आझमगढ येथें निघाली. फरक येवढाच कीं, ही सुधारून वाढवलेली आवृत्ति होती. आरा या ठिकाणीं कांहीं दशकांनीं मोजतां येणारीं सैन्यबळें होतीं; तर आझमगढ मुक्कामीं शेंकड्यांनीं व हजारांनीं मोजतां येईल असें सैन्यबल उभय पक्षांकडे सिद्ध होतें. आरा येथें केवळ एकाच इंजिनिअराच्या अकलेनें इंग्रजांचें आश्रय-स्थान बनविलें गेलें होतें; तर आझमगड येथें कित्येक हुशार इंजिनिअरांच्या अकलेचे खंदक आपणांस बघावयास मिळाले असते. आझमगढाच्या तुरुंगासभोंवतीं मोठमोठे खंदक खणले गेले व खंदकांचे पाठीमागें सैन्यरक्षणाकरितां तटबंदीहि उभारली गेली. या भक्कम तटबंदीवर चालून न जातां कुँवरसिंहानें आझमगढ हें शहर आपल्या ताब्यांत घेतलें व तें आपल्या हालचालींचें मुख्य स्थान बनवून आझमगढाच्या संरक्षित अशा इंग्रजी आश्रयस्थानास पूर्णपणें घेरून टाकण्याचा कुँवरसिंहानें संकल्प केला. तिकडे इंग्रजहि स्वस्थ नव्हते. त्यांना ही नवी आपत्ति कशी निवारावी याचा विचार करणें भाग झालें.

**अलाहाबाद व लखनौ येथील इंग्रजांची धांवाधांव:—**

आपल्या अनुभवाला नेहमीं येतें कीं, चांगल्यापेक्षां वाईट बातम्यांचा प्रसार फारच झपाट्यानें होत असतो. तारीख २२ रोजीं अत्रौलिआची झटापट झाली व इंग्रजांना अपयश घेऊन मागें परतावें लागलें ही बातमी हां-हां म्हणतां चोहोंकडे पसरली.

गाझीपूर व बनारस येथें तारीख २४, अलाहाबादेस तारीख २६ व लखनौ येथें तारीख २८ रोजीं हा समाचार मिळाला. तशांतच बाजारगप्पांचाहि खूप सुळसुळाट झाला. कोणी म्हणूं लागले कीं, कुँवरसिंह बनारस घेणार, कोणी बातमी आणली कीं, कुँवरसिंहाचें समाधान नुसत्या बनारसेनेंच होणारें नव्हतें. तो थेट अलाहाबाद् येथपर्यंत येऊन गव्हर्नर जनरलशींच झटापट करण्याच्या बेतांत आहे, कोणी कांहीं, कोणी कांहीं, एकना, दोन. हजारों अफवा उठूं लागल्या व कुँवरसिंहाचा यशोदुंदुभि चारी दिशांना गर्जूं लागला. लष्करी हालचालींचें दृष्टीनें एक गोष्ट मात्र इंग्रजांस फार अनिष्ट होणारी होती ती अशी कीं, जर कुँवरसिंहाचा खरोखरच बनारस शहरावर ताबा झाला असता तर लखनौ, अलाहाबाद वगैरे पश्चिम बाजूच्या सर्व मुख्य शहरांचे कलकत्त्याशीं दळणवळण संपूर्ण तुटलें असतें व इंग्रजांनीं केलेली येवढी सर्व उठाठेव फुकट गेली असती. परंतु कॅंबेल् व कॅनिंग् ही जोडी अशी दडपून जाणारी नव्हती. तसेंच गाझीपूर व बनारस येथीलहि इंग्रज स्वस्थ बसून नव्हते. बातमी मिळाल्या-बरोबर बनारसच्या इंग्रजी अधिकाऱ्यांनीं तेथें असलेल्या ६ गोऱ्या सैनिकांना एकदम आझमगढास जाण्याचा हुकूम दिला. त्या वेळीं आझमगढच्या बाजूकडील इंग्रजी सेनेचा—मुख्य सेनेचा-नायक कर्नेल् डेम्स् हाहि गाझीपुराहून १२० पायदळ सैन्य घेऊन निघाला व अलाहाबादेहून लॉर्ड मार्ककर आणि लखनौहून सर एडवर्ड लुगार्ड हे खंदे सेनानायक कुँवरसिंहावर हल्ला करण्यास निघाले.

**धन्य कुँवरसिंह ! ! :—**

एकदां एका कविवर्यांना शंका उत्पन्न झाली कीं, काव्यरस व अमृतरस यांच्यांत अधिक गोड पदार्थ कोणता, पण ती शंका त्यांना सुटली नाहीं. ते म्हणाले, अमृतरस चाखणारे देवलोक स्वर्गांत राहतात व काव्यरसपान करणारे कविजन भूलोकावर वस्ती करतात, तेव्हां शंकासमाधान होणें शक्य नाहीं. तशा प्रकारचीच एक शंका कुँवरसिंहासारख्या वीर पुरुषांचीं चरित्रें लिहितांना मनांत उभी ठाकते. आपणांस वाटतें कीं, समराङ्गणीं सन्मुख उभा असलेला शत्रु आपल्या नरड्याचा नक्की घोट घेणार हें माहीत असून सुद्धां हे नरपुंगव ज्या अतुल यशाची सिद्धि करण्यासाठीं जय पावण्यास अशक्य अशाहि संगरास दंड ठोकून तयार होतात तें यश इहलोकीच्या कोणत्याहि सुखापेक्षां अधिक सुखकर असेल काय ? ध्येयवाद सुखकर कीं, जडवाद सुखकर ? उपरिनिर्दिष्ट अशा मूढ कवीला अनुसरून आपणाहि म्हणतों कीं, आपणांस हें कोडें सोडवतां येणार नाहीं. परंतु, इतिहासाचें अवलोकन केल्यास ह्या प्रश्नांतील कोडें सुलभतेनें सुटतें. आजपर्यंत जड संसार फार यशस्वी रीतीनें करून आपला मृण्मय देह टाकून जीवितयात्रा ज्यांनीं खलास केली आहे अशा किती जणांचीं चरित्रें इतिहासांत सांपडतात तें पहा व स्वधर्मरक्षण, स्वातंत्र्यरक्षण अशा ध्येयांसाठीं प्राणदान केलेल्यांचीं किती चरित्रें इतिहासांत ग्रथित आहेत तेंहि पहा. आपणांस आढळून येईल कीं, ध्येयपूर्तीसाठीं जीवित समर्पिलेल्यांचीं चरित्रें इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिलेलीं आहेत. असल्या वीरांची वाखाणणी शत्रु करतात मग मित्र करतील यांत नवल नाहीं. टॉम्सन् नामक साहेबानें एक अगदीं त्रोटक असा हिंदुस्तानचा इतिहास लिहिलेला आहे. त्यांतहि कुँवरसिंहासार-

ख्यांना स्थान आहे यावरूनच त्याची खरी योग्यता समजून येईल. धन्य त्या कुँवरासिंहाची कीं, सर्व विद्रोही रथी महारथी पतन झालेले अगर पराभूत झालेले पाहून सुद्धां अखेरचा संग्राम करण्यासाठीं इंग्रजांविरुद्ध लढण्यास केवळ स्वदेश व स्वधर्म यांच्या रक्षणासाठीं त्यानें पुन्हा हत्यार उचललें !

**आझमगडचा वेढा—डेम्सूचें सेनापतित्व—पहिली चकमक:—**

आपलीं संस्कृत सुभाषितें आपल्या सहज सुंदरतेनें मनाला मोह पाडतात यांत संदेह नाहीं. एका सुभाषितांत लिहिलें आहे कीं, स्त्रियांचीं चरित्रें व पुरुषांचें नशीब या बाबतींत माणसांनीं काय तर प्रत्यक्ष परमेश्वरानें सुद्धां भविष्य वर्तविण्याच्या भानगडींत न पडावें ! कांहीं कांहीं वस्तूंचें वार्तिक वर्तविणें देखील असेंच कठीण असतें. तो शनवार वाडा, तो सिंहगड, ती प्रतापगडची अलंकाररहित श्रीभवानी, तें निष्प्रभ सोमनाथ मंदिर—काय सांगतात हीं इतिहास प्रसिद्ध स्थळें ? तीं म्हणतात, 'कालाय तस्मै नमः'. त्याच कालाच्या चक्रानें उलट खाल्ल्यामुळें आझमगढ येथील हिंदी प्रजेला बंदिवासांत ठेवण्यासाठीं जो जेलखाना बांधला गेला होता त्याच जेलखान्यांत मिल्मनूच्या पराभूत सेनेला बंदिवान होऊन राहावें लागलें होतें हें चरित्र आपण अवलोकन केलेंच आहे. इंग्रजांच्या या दुर्दशेनें चिडून जाऊन गाझीपुराहून डेम्स् साहेब निघाला व त्यानें एकदम आझमगढ मुक्काम गांठला. मिल्मनूच्या पराभवानें चिडून जाऊन डेम्सनें आझमगढ येथें पोंचल्याबरोबर कुँवरसिंहाच्या फौजेवर हल्ला चढविला. अजून त्याला कळलें नव्हतें कीं, अनुभवानें कुँवरसिंह शहाणपण शिकला होता. हंसकाकीयोपाख्यानांतील काक पक्ष्याप्रमाणें सर्व प्रकारचीं उड्डाणें डेम्स साहेबानें उडून पाहिलीं पण तीं सर्व व्यर्थ गेलीं व लखनौचीच

आवृत्ति आझमगढाला घडूं लागली. लखनौ येथें अशींच दोन इंग्रजी सैन्यें लखनौचा वेढा काढण्यासाठीं आलीं होतीं व स्वतांच वेढ्यांत अडकलीं होतीं. प्रथमच्या चकमकींत डेम्सला अपयश येऊन त्याला आझमगढ येथील तटबंदीचा आश्रय घ्यावा लागला.

**लॉर्ड मार्ककरचें रणक्षेत्रांत पदार्पणः—**

गाझीपुराहून डेम्ससाहेब कुमकेस म्हणून निघाला व आझमगढच्या वेढ्यांत अडकला हें आपण आतांच पाहिलें. त्यानंतर लॉर्ड मार्ककर ह्या प्रसिद्ध सेनानीची कुँवरसिंहाशीं गांठ पडली. लॉर्ड मार्ककर हें एक बडें प्रस्थ होतें. त्याला केवळ हिंदुस्थानांतीलच नव्हे तर इतर देशांतील युद्धांचीहि चांगली माहिती होती. नुकत्याच झालेल्या क्रिमिअन् युद्धांत त्यानें रणचण्डीचें आवाहन केलें होतें व रशिअन् फौजांचा पराभव करण्यांत मार्ककरचें प्रमुख अंग होतें. कॅनिंग् साहेबाच्या तो खास विश्वासांतील असा अधिकारी होता व म्हणूनच अलाहाबादेहून त्याला चांगला कानमंत्र शिकवून कॅनिंग्नें कुँवरसिंहावर पाठविलें होतें. लॉर्ड म्हणजे खानदानींतील लोक. मोठ्या कामाखेरीज मोठ्या माणसांना कधींहि त्रास दिला जात नाहीं. याच न्यायास अनुसरून या वेळीं कुँवरसिंहाविरुद्ध सर व लॉर्ड या पदव्यांनीं विभूषित अशा सेनानायकांची योजना झाली होती. कुँवरसिंहानें उत्पन्न केलेलें संकटहि तसेंच होतें. समजा कीं, आझमगढ येथील फौजांना हरवून जर कुँवरसिंहानें गाझीपूर व बनारस हीं ३०।४० कोसांवर असलेलीं शहरें आक्रमण केलीं असतीं तर बंडाच्या नाटकाच्या पहिल्या अंकासच पुन्हा सुरुवात करणें भाग होतें. कारण पहा कीं, कलकत्ता व अलाहाबाद हा दुवा बनारसवरील आक्रमणानें पूर्णपणें तुटला असता व बंडवाले पुन्हा उत्तेजित होऊन कुँवरसिंहाच्या निशाणा-

५५७

खालीं जमून ताज्या दमानें इंग्रजांच्या मानगुटीस बसले असते. दैववशात् तसें घडून आलें नाहीं ही गोष्ट निराळी. तथापि तसाच कांहीं प्रसंग घडून आला असता तर कॅनिंग् व कँबेल् हीं दोन मुख्य मोहरीं कुँवरसिंहाच्या शहांत सांपडून कोंडलीं जाण्याचा संभव होता. प्रसंगाची किंमत जाणून मार्ककरनें आज्ञा होतां क्षणींच गव्हर्नर जनरलचें कार्य करण्याचें ठरविलें; व सांपडलें तें घोडदळ, पायदळ व तोफखाना घेऊन तो कुँवरसिंहाला गांठून आझमगढाचा वेढा सोडविण्यासाठीं मोठ्या त्वरेनें निघाला. आझमगढापासून केवळ ८ मैलांवर असलेल्या सर्साना नामक गांवीं मार्ककर व कुँवरसिंह यांची गांठ पडली.

**सर्साना येथील संग्रामः—**

इंग्रज इतिहासकार लिहितो कीं, लॉर्ड् मार्ककरच्या सन्मुख दानापुराचे 'सुप्रसिद्ध' विद्रोही शिपाई कुँवरसिंहानें उभे केले होते. आणि त्यांत कांहीं चूकहि नव्हती. कारण पहा कीं, मैत्री किंवा संग्राम हे दोनहि प्रकार तुल्यबल अशा पक्षांतच फार योग्य तऱ्हेनें होऊं शकतात. युद्धसंबंधीं 'कर्ण' हा शब्द उपयोजिला म्हणजे 'अर्जुन' असाच प्रतिध्वनि हवेंतून येऊन आपल्या कर्णपथावर आदळतो. 'रामाचें' असा वाक्याला आरंभ झाला म्हणजे 'रावणाशीं' असा दुसरा शब्द पुढें येऊन 'युद्ध झालें' या क्रियापदानें तें वाक्य पुरें होतें. तशीच स्थिति या ठिकाणीं झाली. क्रिमिआसारख्या ठिकाणाहून गाजून आलेल्या सेनापतीच्या तोंडावर दानापुराच्या कसलेल्या पलटणीसारखी पलटण न टाकावी तर मग काय काल भरती झालेलें बाजारबुणगें टाकावें ? कुँवरसिंहानें जें केलें तें फार योग्य केलें. विद्रोही सेनेचें आधिपत्य एका अनुभवी सुभेदाराकडे सोंपविण्यांत आलें होतें. मार्ककरच्या आघा-

डीला आघाडी भिडवून बंडवाल्यांनीं लढाई सुरू केली. क्षणार्धांत बंडवाल्यांचा मोड होऊन त्यांची आघाडी पांगली गेली व आझमगढाचा मार्ग मोकळा झाला. मॅलेसन् लिहितो कीं, मार्ककर यानें हा मोठा विजय मिळविला. परंतु मॅलेसन् हें विसरतो कीं, विद्रोही-सैन्याच्या डाव्या व उजव्या बगलेनें उलट तोंड करून मॉर्ककरच्या पिछाडीवर असा जोराचा हल्ला केला कीं, दम न खातां मार्ककरला आझमगढाचा रस्ता गांठणें भाग झालें. तथापि ह्या पिछाडीचें संरक्षण करण्यांत कॅप्टन् जोन्स् हा सेनानी मार्ककरला बळी द्यावा लागला; आणि आझमगढाला आल्यावर सुद्धां त्याला तें शहर तर घेतां आलें नाहींच पण जसा डेम्स् येऊन अडकून बसला तोच प्रसंग त्यालाहि पत्करावा लागला. सर्वांना येथील लढाईत इंग्रजांचा हा असा मोठा विजय झाला व दुसरी इंग्रजी सेना आझमगढ शहराची सुटका करण्यासाठीं म्हणून आली व अडकून बसली. यांना घेरण्याचें काम कांहीं विश्वस्त अनुचरांवर सोंपवून कुँवरसिंह आपल्या कसलेल्या वीरांसहवर्तमान आझमगढ सोडून निघाला.

**कुँवरसिंहानें आझमगढ कां लढविलें नाहीं ?—**

या वेळीं ब्रिटिश फौज ज्या प्रसंगांत होती त्या प्रसंगाला अनुलक्षून एका इंग्रज ग्रंथकारानें कुँवरसिंहाला दोष दिला आहे. मिल्मन्ला आझमगढपर्यंत हटूं देणें, मार्ककरलाहि इतक्या सुलभतेनें सोडून देणें व बनारसचा कबजा न घेणें या गोष्टी करण्यांत कुँवरसिंहासारखा सेनानी फार चुकला असें मॅलेसन्चें मत आहे. सर्व मनुष्यांना अगदीं सुकर अशा ज्या कांहीं गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यांतच दुसऱ्यांना पंडितपणा करून उपदेश करणें हीहि एक गोष्ट आहे. जर अमक्यानें अमुक केलें असतें तर तमुक झालें असतें

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थल

असें म्हणण्यासारखी गाढवपणाची दुसरी कोणतीहि चूक इतिहासकार करूं शकणार नाहीं. जर वॉटर्लू शहरीं इंग्रजांचा पराभव झाला असता तर आज आम्ही हिंदी लोक कदाचित् फ्रेंच पुस्तकें वाचीत असतों अशा तऱ्हेचीं विधानें करण्यांत काय फायदा? साध्यासुध्या इतिहासशास्त्राला हीं असलीं 'जरतरी' आभूषणें मुळींच शोभत नाहींत. तथापि मॅलेसन्नें पूर्वपक्ष केलेला आहे तेव्हां आपण त्याचें आपल्या अल्पमतीप्रमाणें खंडण करूं या. कुँवरसिंह खात्रीनें येवढा अक्कलशून्य नव्हता कीं, त्याला इंग्रज इतिहासकाराइतकी कल्पना नसेल. तथापि वादाला हा मुद्दा गैरलागू ठरेल म्हणून तो सोडून आपण त्या वेळच्या परिस्थितीचें अवलोकन करूं या. कुँवरसिंहाजवळ इंग्रज इतिहासकारांच्या कथनाप्रमाणेंच १२००० फौज होती व तिच्यांतहि लखनौहून पराभव पावून परतलेले असेच पुष्कळ शिपाई होते. समजा कीं, कुँवरसिंहानें आझमगढ, अगर गाझीपूर अगर बनारस कोणतेंहि शहर लढविण्याचें ठरविलें असतें तर तें चुकलें असतें. कारण त्याच्या बोकांडीं कॅंबेल्‌ची ३१००० फौज एकदम येऊन बसली असती व ज्याच्यापुढें एकदां कच खाल्ली होती त्याचेच समोर लढण्यास हिंदी फौज तर कधींच तयार झाली नसती. दुसरें असें कीं, घरें-दारें, बायकापोरें सोडून दानापुरचे सैनिक आज ९ महिने कुँवरसिंहाबरोबर भटकत होते. तिसरें असें कीं, कुँवरसिंहालाहि स्वतःच्या घराचा विध्वंस झाल्याचें शल्य बोचतच होतें. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां कुँवरसिंह एका ठिकाणीं बसून राहिला नाहीं हें त्यानें बरेंच केलें असें म्हणावें लागतें.

**आझमगढचा वेढा—चवथा अंक—पहिला प्रवेशः—**

अत्रौलिआच्या लढाईपासून मिल्मन्‌ची कोंडी होईपर्यंत आझम-

गढच्या वेढ्याचा पहिला अंक संपतो. गाझीपुराहून आझमगढास पोंचून कुँवरसिंहाची हकालपट्टी करण्यांत डेम्सूला अपयश येतें हा ह्या वेढ्याचा दुसरा अंक ठरतो. लॉर्ड मार्ककरच्या बनारसेहून कूचाला आरंभ झाल्यापासून सर्सान्याच्या झटापटीनंतर त्यालाहि आझमगढाच्या वेढ्यांत कोंडिलें जाण्यापर्यंत तिसऱ्या अंकाचा शेवट होतो व चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशाचें मुख्य पात्र सर एडवर्ड लुगार्ड हें ठरतें. अलाहाबादेहून ज्याप्रमाणें कॅनिंग्ला कुँवरसिंहानें केलेल्या अत्रौलिआ येथील उत्पाताच्या महत्त्वाचें आकलन झालें तीच गोष्ट सर सेनापति सर कॉलिन कँबेल् यांचे बाबतींत घडून आली. त्यानें लखनौहून सर एडवर्ड लुगार्ड या सेनापतीला एक चांगली भक्कम सेना देऊन कुँवरसिंहावर पाठविलें. ज्या अत्रौलिआ मुक्कामीं इंग्रजांना पराभवाचा कटु अनुभव आला होता त्याच रस्त्यानें लुगार्डनें जाण्याचें ठरविलें. परंतु प्रत्यक्ष घटना तशी घडावयाची नव्हती. कुँवरसिंहाच्या फौजेनें गोमतीवरील पूल जाळून टाकला होता. त्यामुळें लुगार्डला सरळ चाल करून जातां येईना. अखेरीस जोनपूर मुक्काम कसाबसा त्यानें गांठला. तेथें महमद हुसेन नामक बंडवाला त्यास आडवा झाला. परंतु त्याचा लीलेनें पराभव करून लुगार्ड पुढें चाल करून जाऊं लागला. परंतु कुँवरसिंहाचा नवीन धडा सर्वच बंडवाले शिकूं लागले होते. लुगार्ड पुढें जातो तोंच पिछाडीवर हल्ला आला व जोनपूर हातचें जातें काय हा प्रश्न त्याचे डोळ्यांसमोर उभा राहिला. पुन्हा मागें पलटून त्याला एक लढाई करणें भाग झालें. त्याही लढाईत तो यश पावला. परंतु झालेल्या चकमकींत लेफ्टनंट जॉर्ज हॅव्हलॉक या तरुण व शूर कार्यकर्त्याचें बलिदान झालें. बंड मोडण्यास ज्या प्रमुख इंग्रजांनीं भाग घेतला त्यांतहि प्रसिद्ध असलेल्या सेनापति

हॅवलॉक्चा चार्ल्स हा पुतण्या. बंडखोरांना इंग्रजांनीं लखनौ येथें जी दीर्घकाल टक्कर दिली त्यांतहि तो होताच. इंग्रजांवर नवीन संकट आलेलें पाहून यानें स्वयंस्फूर्तीनें आझमगढाकडे जाणाऱ्या फौजेंत आपलें नांव दाखल केलें व समरभूमीवर पराक्रम करून तो चिरंजीव झाला. स्वदेशासाठीं जीवितदान करणारीं रत्नें नेहमींच प्रकाशतील ! ! ता. १५ एप्रिल रोजीं लुगार्ड आझमगढाजवळ आला.

**आझमगडचा वेढा; चवथा अंक, २ रा प्रवेशः—**

जोनपूर येथून आझमगढावर लुगार्ड येऊं लागला. परंतु, आझमगढ शहरांत तमसा नदी उतरल्याशिवाय प्रवेश करतां येत नाहीं; व तमसेवरील पूल तर कुँवरसिंहाच्या लोकांनीं अडवून धरलेला. अशा स्थितींत पुन्हा एकदां युद्धप्रसंग करणें लुगार्डला भाग झालें. खरोखर पाहिलें असतां तमसेच्या पुलाचें हें संरक्षक सैन्य मागें सांगितलेलें फसवें सैन्य होतें. परंतु, त्याची मांडणी इतक्या कुशलतेनें केली गेली होती कीं, तें कुँवरसिंहाचें मुख्य सैन्यच दिसावें. १५ एप्रिल १८५८ हाहि दिवस बंडाच्या इतिहासांत संस्मरणीय ठरला. खुद्द इंग्रजी ग्रंथकारच या लढाईबद्दल काय म्हणतात तें पाहूं—"तमसा नदीवरील लढाईंत काळ्या पलटणींनीं असें दाखवून दिलें कीं, इंग्रजांनीं शिकवलेली युद्धकला त्यांनीं आपल्या पूर्ण अवगत केली होती." अशा तऱ्हेनें गुरूचीच विद्या गुरूस फलदायी करून इंग्रजांचे हल्ले बंडवाल्यांनीं नेटानें परतवले. वाटर्लूच्या लढाईंत जी चौमुखी रचना करून फ्रेंचाचे त्वेषाचे हल्ले वेलिंग्टन्च्या शिपायांनीं परतवले होते. तीच रचना शिपायांनीं उपयोगांत आणली. या रचनेंतील विशेष असा आहे कीं, कोठूनहि शत्रूंनीं हल्ला केल्यास लढाई करणाऱ्या

सैनिकांचें तोंडच त्यांच्या दृष्टीस पडावें. एवढा जोराचा प्रतिकार ज्या अर्थी होत आहे त्या अर्थी कुँवरसिंह प्राण पणाला लावून आझमगढ लढविणार असा लुगार्ड्नें तर्क केला. परंतु तो तर्क चुकला. आपल्या मुख्य सैन्यानिशीं तो गंगापार होण्याच्या मार्गाला लागला होता. तमसा नदीवरील पूल अडविणाऱ्या बहादुरांनीं इंग्रजांना इतका दीर्घकाल अडवून ठेविलें कीं, तेवढ्या अवधींत कुँवरसिंह १२ मैल दूर निघून गेला. याहि लढाईत इंग्रजांना एक मोठा बळी द्यावा लागलाच. तो म्हणजे गाझीपुरचा मॅजिस्ट्रेट मिस्तर व्हिनेब्लीस् होय. बंडाची आग प्रथम धगधगत असतां यानेंच गाझीपुराचें संरक्षण केलें होतें, इतकेंच नव्हे तर प्रसंगोपात्त बंडवाल्यांविरुद्ध लढून त्यांचा पराभवहि केला होता. मागें वर्णन केलेल्या मॅंग्लस् आदिकरून शूर मुलकी अधिकाऱ्यांचे मालिकेंतच याहि वीर पुरुषाला स्थान द्यावें लागेल.

**आझमगढाचा वेढा उठला:—**

आपले धनी आतां पुष्कळ दूर गेले असतील अशी खात्री झाल्याबरोबर उगाच जीव धोक्यांत न घालतां कुँवरसिंहाचे सैनिक तमसा नदीवरील पूल पार मोकळा सोडून गेले व तेहि अशा चतुराईनें कीं, त्यांच्यांतील एकहि शिपाई इंग्रजांचे हातीं लागला नाहीं अथवा थोडेंसें देखील युद्धसाहित्य त्यांना जिंकिता आलें नाहीं. लुगार्डला वाटलें कीं, आतां आझमगढांत कुँवरसिंह नक्की सांपडणार. पण तसें होणें नव्हतें. तमसा नदीवरील अटीतटीचा संग्राम ही आझमगढ लढविण्याची धडपड नव्हती तर ती इंग्रजांना फसविण्याची युक्ति होती. कुँवरसिंहानें आपली मुख्य फौज केव्हांच आझमगढाहून गंगेच्या रोखानें मार्गस्थ केली होती. लुगार्ड्नें पहिल्या प्रथम तुरुंगाच्या आश्रयानें राहिलेल्या आपल्या इतर

जातिबांधवाना मोकळें केलें व आझमगढ शहराचाहि ताबा घेतला. त्याच्या हुद्दा 'आझमगढ फील्ड् फोर्सचा सेनानायक असा असल्याकारणानें त्याला मुख्य ठिकाण सोडून जातां येईना. त्यामुळें त्याला कुँवरसिंहाचा पाठलाग करण्याची कामगिरी दुसऱ्या एका अधिकाऱ्यावर सोंपवावी लागली. कदाचित् तसें करण्यास तो उत्सुकाहि नसेल! कारण तमसा नदीवर आलेला अनुभव फारच कटु होता. आझमगढ येथें राहून तरी त्याला स्वस्थता मिळावयाची नव्हतीच. जवळच नरहरपूरचा राजा व गुलाम-हुसेन हे दोन बंडवाले आजूबाजूच्या मुलखांत उत्पात करीत होते. त्यांचा बंदोबस्त करण्याचें काम लुगार्ड्नें प्रथम पत्करलें व कुँवरसिंहाच्या पाठलागास ब्रिगेडिअर डग्लस् नामक अधिकाऱ्यास पाठविण्यांत आलें. अशा तऱ्हेनें कुँवरसिंह इंग्रजांच्या कैचींतून पूर्ण निसटला व गनिमी काव्याच्या लढाया लढून त्यानें इंग्रजांस जीव नकोसा करून सोडण्यास लावण्याचें ब्रीद पत्करलें. कुँवरसिंह आझमगढ सोडून गेला पण तो नक्की कोठें जाणार याची कल्पना इंग्रजांना होईना. सबब त्याला कोठें तरी गांठून त्याचा पुरा पराभव करण्याचें काम हातीं घ्यावें लागलें.

**ब्रिगेडिअर डग्लस् व कुँवरसिंहः—**

आझमगढ सोडल्यानंतर कुँवरसिंहानें आपल्या सेनेचे तीन भाग केले. त्यांतील एक भाग त्यानें गाझीपुराच्या बाजूस पाठविला व आपण स्वतः दोन भाग घेऊन जगदीशपुराकडे कूच केलें. अशाहि प्रसंगीं कुँवरसिंहानें गाझीपुराकडे सैनिक कां पाठविले असतील असा एक प्रश्न साहजिकच उद्भवतो. त्याचें उत्तर देणें प्राप्त आहे. कुँवरसिंहाला अजूनहि आशा होती कीं, इतर केंद्रें बंडवाल्यांच्या हातांतून गेलीं तरी झांशीची राणी मर्दपणानें शत्रूंशीं टक्कर देतच

होती व बांद्याचे नबाबहि इंग्रजांना शरण येण्याच्या मनःस्थितींत नव्हते. आपणांस आठवेल कीं, याच प्रदेशांतून कुँवरसिंह जगदीशपुरच्या पतनानंतर गेला होता. बंडाचे त्या प्रांतांतील मुख्य सेनापति तात्या टोपे याच सुमारास झांशीच्या रणशूर राणीला मदत म्हणून गेले होते. या सर्व गोष्टींवरून असेंच अनुमान काढणें, शक्य होतें, कीं त्या बाजूला तरी इंग्रजांचा पराजय होईल व तो तसा झाल्यास त्या बाजूनें आपणांस मदत मिळण्यास सुलभ पडेल. परंतु काशीचे इंग्रजहि स्वस्थ नव्हते. त्यांनीं ब्रिगेडिअर गॉर्डन् याच्या हाताखालीं कांहीं सेना देऊन गाझीपुरच्या बाजूला चालून येत असलेल्या कुँवरसिंहाच्या सैन्यविभागाची नाकेबंदी केली. दुर्दैवानें याच सुमारास तात्या टोपी, झांशीची राणी, व बांद्याचे नबाब यांचे अनुक्रमें ता. १ एप्रिल, २ एप्रिल व १९ एप्रिल या दिवशीं पराभव झाले व कुँवरसिंहाला केवळ आपल्याच पायांवर उभे राहण्याची पाळी आली. तरी पण शूर कुँवरसिंह डगमगला नाहीं. ब्रिगेडिअर डग्लसनें तर कुँवरसिंहाला नाहींसा करण्याचा विडाच उचलला होता कीं काय असें दिसलें. कारण त्यानें आपल्या सैन्याला यत्किंचितहि विश्रांति न देतां कुँवरसिंहाचा पाठलाग चालविला होता. त्याचा मुख्य उद्देश कुँवरसिंहाला गंगेपार होऊं न देण्याचा होता. कारण एकदां का कुँवरसिंह गंगेपार झाला कीं, पुन्हा बिहार प्रांतांत बंडाची आग भडकणार होती व सर व्हिन्सेंट आयरनें केलेल्या सगळ्या कामगिरीवर बोळा फिरणार होता, आणि तसें झालेंहि. तारीख १५ ते २० एप्रिल या पांच दिवसांत कुँवरसिंह पुढें व डग्लस मागें अशी शिवाशिवीची लढाई चालली होती.

सिंह जाळ्यांतून निसटला:—

डग्लसजअळ नं. ४ ची सबंध पायदळ पलटण, नं. ३७ चा कांहीं भाग, शीख घोडेस्वार, पंजाबी सॅपर्स, नऊ तोफा व वेढा घालण्यास लागणारें पुष्कळ साहित्य होतें. यावरून आपणांस दिसून येईल कीं, डग्लसनें आपली सेना फार हुशारीनें निवडली होती. चढाईच्या, तसेंच वेळ प्रसंगीं संरक्षणाच्या कामालाहि ती सेना तयार होती. तिजबरोबरची सॅपर्स् पलटण असें दर्शवीत होती कीं, प्रसंगीं कुँवरसिंह विजयी झाल्यास खंदक खणण्यासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहावयास नको. घोडदळ व वेढ्याचें सामान हीं डग्लसची विजयाकांक्षा दाखवीत होतीं. परंतु कुँवरसिंहाच्या समरकौशल्यानें डग्लसला विजयहि मिळवतां आला नाहीं व कुँवरसिंहाला कोंडूनहि टाकतां आलें नाहीं. कुँवरसिंहानें आरंभिलेल्या नवीन युक्तीनें तारीख १५ ते २० एप्रिल या मुदतींत रणशूर इंग्रजांशीं प्रत्यक्ष गांठ पडूनहि इंग्रजांना कुँवरसिंहाचें केसाइतकेंहि नुकसान करतां आलें नाहीं. फसव्या सैन्यानें आपली नोकरी इतक्या इमानदारीनें बजावली कीं, कुँवरसिंहाचें मुख्य सैन्य काय करीत आहे याची इंग्रजांना दादहि लागली नाहीं. ता. १७ रोजीं आझमगड येथें व नंतर घोली, नाग्रा व शिकंदरपूर येथें इंग्रजांनीं कुँवरसिंहाला पकडण्याचा प्रयत्न केला; पण काय, कुँवरसिंहानें सर्व ठिकाणीं इंग्रजांचे हातांवर तुरी दिल्या. तारीख २० रोजीं गाझीपुराजवळ बलिआ येथें कुँवरसिंह गंगा ओलांडणार अशी नक्की बातमी इंग्रजांना लागली. डग्लस्ला त्या भागांत मदत करण्यासाठीं कर्नल कंबर्लेज् जिवापाड मेहनत करीत होता. त्यानें कुँवरसिंहाला बलिआ येथून गंगापार होतां येऊं नये म्हणून गाझीपूर ते बलिआ या टापूंतील सर्व नावा बुडवून टाकल्या व स्वतः कुँवर-

सिंहाला अडवण्यास तो सिद्ध होऊन राहिला. परंतु बलिआपासून थोडयाच अंतरावर शिवपूर येथें डग्लसच्या लोकांना झुकांडी देऊन कुँवरसिंह आपल्या सर्व सैन्यानिशीं गंगापार झाला.

**अलौकिक शस्त्रक्रियाः—**

इंग्रजी फौजेचा सेनानायक डग्लस् याच्या कानांवर ती भयंकर बातमी जाऊन पोंचली कीं, कुँवरसिंह गंगापार झाला. गाझीपुरास गोर्डन्, बलिआ येथें कंबर्लेज् व स्वतः डोळ्यांत तेल घालून कुँवर-सिंहाच्या पाठीवर असूनहि कुँवरसिंह हातांतून निसटल्याचें पाहून डग्लस् क्रोधानें लाल झाला. दांतओठ खात खात त्यानें एकदम शिवपूर गांठलें व शिवभक्त कुँवरसिंहास कैलासनाथाजवळ पाठवावें या इराद्यानें त्यानें अजूनहि तोफांच्या आटोक्यांत असलेल्या कुँवर-सिंहावर अग्न्यस्त्राचा वर्षाव करण्यास सुरवात केली. मार्ग कंठ-ण्यास सुकर व्हावें म्हणून कुँवरसिंहाची स्वारी हत्तीवर आरूढ झाली होती व बाजूला रणदलनसिंह बसला होता. एका अग्नि-गोलकानें आपलें काम बजावलें ! गोळा बरोबर कुँवरसिंह व रणदलनसिंह यांना लागला. रणदलनसिंहाला पशुपतेश्वरदर्शन झालें व कुँवरसिंहाचा डावा हात निकामी झाला. जबर मारानें घायाळ होऊन कांहीं वेळ कुँवरसिंहाला मूर्च्छना आली. त्याला हत्तीवरून उतरविण्यांत आलें. कांहीं वेळ वारा घातल्यावर कुँवर-सिंह सावध झाला. परंतु, हाताची जखम फारच वेदना उत्पन्न करूं लागली. कुँवरसिंहाचे चरित्रकार म्हणतात कीं, त्यानें आपल्या उजव्या हातानें कमरेची तलवार उपसून तो दुखणारा हात तोडून टाकला व त्या तुटक्या हाताला गंगार्पण केलें. बंडाच्या हिंदी इतिहासकाराचें म्हणणें असें आहे कीं, त्यानें फार विनवणी केल्या-वरून एका नोकरानें तो हात तोडण्याचें कबूल केलें. कसें का

असेना, पाउणशेंच्या वर वयमान गेल्यानंतर अशा तऱ्हेची अलौकिक शस्त्रक्रिया करण्याचें अथवा करवून घेण्याचें धैर्य हलींच्या तरुणांत सांपडणार नाहीं मग वृद्धांची गोष्ट कशाला ! गंगाबाईला आजपर्यंत पुष्कळ तऱ्हेचीं उपायनें मिळालीं होतीं. परंतु अशा तऱ्हेची विलक्षण देणगी तिच्या वांट्याला कधींहि आली नसेल. जणूं काय मिळालेल्या देणगीनें गंगा संतुष्ट झाली म्हणूनच कुँवरसिंहाचें दुःख हलकें झालें व त्यानें पुन्हा एकदां जगदीशपुराकडे मोर्चा वळविला.

**जगदीशपूर सनाथ झालें:—**

तारीख २१ एप्रिल सन १८५८ रोजीं इंग्रजांच्या सगळ्या फौजांना झुकांडी देऊन कुँवरसिंह जगदीशपुरांत प्रवेश करता झाला. जुलै ते एप्रिल या नवमास कालांत कुँवरसिंहानें काय काय कष्ट भोगिले होते ! हजारों विश्वस्त अनुचरांना घेऊन रानावनांतून भटकावयाचें व तेंहि अज्ञातवासांत, ही गोष्ट फार कठीण आहे. परंतु ती गोष्ट कुँवरसिंहानें केली. जगदीशपुरांत असतांना बंडवाल्या पुढाऱ्यांचीं मोठमोठीं नांवें त्यानें ऐकिलीं होतीं व त्यांवर विश्वसून त्यानें जीव धोक्यांत घालून सुद्धां सगळ्यांच्या गांठीभेटी घेतल्या. या नऊ महिन्यांत कुँवरसिंह जगदीशपुराहून निघून जगदीशपुरासच पुन्हा प्राप्त झाला होता. येवढ्या कालांत त्यानें एक वर्तुलाकार असा प्रदेश आक्रमिला होता; जगदीशपूर ते रोठस, रोठस ते रेवा, रेव्याहून बांदा व काल्पी, काल्पीहून गंगा-यमुना दुआब, दुआबांतून पूर्व अयोध्या प्रांत व पूर्व अयोध्या प्रांतांत अत्रौलिआ येथें प्रगट होऊन इंग्रजांना चुकवून पुन्हा जगदीशपुरांत असें तें भ्रमण झालें होतें. जगदीशपुरांतून निघतांना दुर्दमनीय उत्साहानें कुँवरसिंहाचें जाणें झालें होतें. कारण कधींहि

म्हातारी न होणाऱ्या अशा आशेच्या पंखांवर आरूढ होऊन तो भराऱ्या मारीत होता. तात्या टोपी, नाना बंडवाले, अयोध्येचा मौलवी, फिरोझशहा व झांशीची बंडवाली राणी ही सर्व मंडळी त्याला बांधणाऱ्या आशेच्या दोराचे तंतु होते. ते सर्व तुटल्या-सारखे झाले व त्यामुळें गीताबाईनें शिकविलेल्या 'उद्धरेदात्मनात्मा-नम् ।' या तत्त्वावर विसंबून राहण्याची पाळी या वृद्ध रजपुतावर आली. तरीहि तो डगमगून गेला नाहीं. रबराच्या चेंडूला पाण्याच्या पृष्ठभागाखालीं जोरानें दाबून हात काढल्यावर तो जसा अतिशय जोरानें वर उसळतो तशीच स्थिति कुँवरसिंहाची झाली. आशेचा डोलारा कोसळून पडल्यामुळें तो निराश झाला नाहीं. दुसरें नाहीं तर नाहीं; आपलें तरी जतन करावें या उद्देशानें जगदीशपुरांत त्यानें पदार्पण केलें व बारा वर्षांच्या रामवियोगानंतर अयोध्येंत प्रभुरामचंद्रांचें आगमनानंतर ती पुरी जशी: शोभून दिसली तद्वतच जगदीशपुरीहि आपल्या प्रभूच्या पुनरागमनानें खुलूं लागली.

**भाऊ-भेट:—**

जगदीशपुरांत कुँवरसिंह येऊन प्राप्त झाल्याची बातमी अमर-सिंहाला कळली. मोठा भाऊ मार्गस्थ झाल्यानंतर बिहारमधील बंडाची ज्वाला धगधगत ठेवण्याचें काम धाकट्या भावावर सोंप-विण्यांत आलें होतें व तें त्यानें चांगल्या तऱ्हेनें बजावलेंहि होतें. त्याचें प्रत्यक्ष चिन्ह असें कीं, कुँवरसिंहानें पूर्व अयोध्या प्रांताला आग लावल्याबरोबर ज्याप्रमाणें "आझमगढ फील्ड् फोर्स्" नामक विशिष्ट सैन्यविभागाची तातडीनें योजना करण्यांत आली होती त्याप्रमाणेंच बिहारी विद्रोही शिपायांचें दमन करण्यासहि आरा हें प्रधान केंद्र कल्पून "आरा फील्ड् फोर्स्" नांवाचें एक

दल इंग्रजांनीं सुसज्ज ठेविलें होतें. कुँवरसिंह तेथें नसल्यामुळें त्या फौजेला साधारण शांतताच मिळाली होती, कारण रणांगणाला सरावलेले असे पुष्कळसे लोक कुँवरसिंहाबरोबर होते व त्यामुळें अमरसिंहाला केवळ नवीन भरती झालेल्या लोकांवर विसंबून राहावें लागत होतें. तथापि तो अगदीं स्वस्थ बसून नव्हता. त्यानें आपल्याविरुद्ध असलेल्या खटपट्या लोकांवर बारीक लक्ष ठेवलें होतें; व आपल्या अपयशाच्या कालीं कोण कोण लोक आपल्याशीं बेइमान होऊन इंग्रजांच्या आहारीं गेले होते याची त्यानें जंत्री करून ठेविली होती. कालहि योग्य आला. जगदीशपूर फिरून सनाथ झालें व बंडाचा— नव्हे स्वातंत्र्याचा– झेंडा फिरून एकदां जगदीशपुरावर फडकूं लागला. अमरसिंह व कुँवरसिंह एकमेकांना भेटले. तों काय ? कुँवरसिंहाची अवस्था गोळी लागल्यामुळें फारच बिकट झालेली त्याचे नजरेस आली. कुँवरसिंहाला आतां त्याच्याच भग्न झालेल्या वाड्यांत निजविण्यांत आलें होतें व सभोंवतीं चारी बाजूंना त्यानें उपकृत केलेल्या जनसमूहाचें भक्कम कडें पडलें होतें. आपल्या प्रभूची ती करुण अवस्था पाहून सर्व वातावरण शोकाकुल झालें. परंतु पुनः प्रस्थापित झालेल्या राज्याचें शासन करण्याचें काम करणें भाग होतें. कुँवरसिंह विवश असल्यामुळें त्याच्याच पुरस्काराखालीं अमरसिंहानें तें कठीण काम करण्यास आरंभ केला.

**जगदीशपुराचा नवीन बंदोबस्त:—**

वाङ्मयांत सर्वांना सारखेंच तल्लीन करणारें कांहीं असेल तर गोष्टींचा प्रांत, असें कोणीं म्हटल्यास फारसें चुकणार नाहीं. इसापनीतीपैकीं पशु व पक्षी यांच्या युद्धप्रसंगीं मी दोघांचाहि आहें

असें सांगणाऱ्या वटवाघुळाची गोष्ट सर्वांना परिचित अशीच आहे. मानवजातींतहि अशीं किती तरी वाघळें निर्माण होतात. तीं वारा वाहील तशी पाठ फिरवून आपलें जीवितसाफल्य मानीत असतात. जगदीशपूर इंग्रजांनीं घेतल्याबरोबर हीं वाघळाची जात त्याचेंच भजन-पूजन करण्यांत दंग झाली. येवढ्या पराक्रमी इंग्रजी सेनेपुढें कुँवरसिंहाचें काय चालणार अशा कल्पनेनें त्या लोकांनीं इंग्रजांचा पक्ष उचलला. परंतु त्यांना कल्पना नव्हती कीं, जयद्रथवधप्रसंगीं श्रीकृष्णानें आपल्या सुदर्शनानें एक घटका दिवस असूनाहि ज्याप्रमाणें आकाशस्थ सूर्यनारायणाचा अस्त केला होता त्याप्रमाणेंच कुँवरसिंहाचा भाग्यरवीहि नवमासांच्या भ्रमणानंतर पूर्ण अस्तास जाण्याचे पूर्वीं घटकाभर तरी तळपणार होता. त्यांच्या दुर्दैवानें त्यांना कुबुद्धि सुचली येवढें मात्र खरें ! आपल्या राजधानीचा बंदोबस्त करण्याचें काम बंधूच्या आज्ञेवरून हातीं घेतल्याबरोबर अमरसिंहानें ह्या अस्तनींतील विंचवांच्या नांग्या ठेंचून काढण्याचें ठरविलें. भराभर अमरसिंहाचे दूत जगदीशपुरांत फिरूं लागले व इंग्रजांचे कच्छपीं लागलेल्या सर्व देशद्रोह्यांना नेमकें उचलून त्यांना कठोर शिक्षा देण्यांत आल्या. त्या सर्वांतील प्रमुख अशा एका वैद्याला तर हत्तीच्या पायीं देण्यांत आलें असेंहि आपणांस वाचण्यास मिळतें. क्रांतिदेवीला असले बळी फार आवडत असावेत असें दिसतें. नाहीं तर सरकारच्या कर्मचारी लोकांना नेमके टिपून काढण्यांत क्रांतिदेवीचे भक्त एवढी खटपट करते ना. कसेंहि असो. जगदीशपुरावर पुन्हा एकदां कुँवरसिंहाचा अंमल प्रस्थापित झाला व त्याच्या यशोदुंदुभीनें सर्व दिशा निनादित केल्या. कुँवरसिंह जगदीशपूरचा स्वामी झाल्याबरोबर इंग्रजांना घोर विवंचना उत्पन्न झाली !

**सिंहाला पुन्हा जाळ्यांत धरण्याचा प्रयत्न:—**

कुँवरसिंह डग्लसला चुकवून आपल्या राजधानींत पुन्हा सुस्थित झाला ही बातमी वायुवेगानें सर्वत्र पसरली. आपणांस सांगितलेलें काम आपण दुय्यम अधिकाऱ्यावर सोंपविलें याची लाज वाटूनच कीं काय, स्वतां लुगार्ड आझमगढ येथील आपलें मुख्य ठाणें सोडून निघाला. डग्लस् देखील स्वस्थ नव्हताच. त्यानेंहि आपल्या फौजेनिशीं गंगा ओलांडली व जगदीशपुरावर आक्रमण करण्यास तो सिद्ध झाला. तारीख १ मे १८५८ रोजीं डग्लस् आरा मुक्कामीं येऊन पोंचला. त्याच्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या आधींच येऊन थडकल्या होत्या. खुद्द आरा मुक्कामीं रॅट्रे या अंमलदाराचे तालमींत तयार झालेले 'आरा हाउस्'चें संरक्षण करण्यांत भाग घेतलेल्या विश्वसनीय शीख शिपायांचेच भाऊबंद इंग्रज सांगतील तो हुकूम मानण्यास व देतील तें काम करण्यास तयार होते. खुद्द लुगार्डहि तारीख ३ मे रोजीं गंगापार होऊन आला. ही झाली उत्तर बाजूची हकीगत. कुंवरसिंहाला दक्षिणेकडूनहि पायबंद बसावा म्हणून कर्नल कर्फील्ड या अधिकाऱ्याला ससूरामच्या बाजूनें बोलावण्यांत आलें. पाटणा येथील कमिशनरनेंहि या कार्यास हातभार लावला. त्यानें गंगेवर 'पाटणा' याच नांवाचें गलबत एकसारखें फिरतें ठेविलें. अशा हेतूनें कीं, कुँवरसिंहाच्या मदतीस येणाऱ्या कोणाहि बंड-वाल्यास अडवितां यावें. जगदीशपुरावर चालून जावयाचे पूर्वी आरा शहराचाहि बंदोबस्त करण्याचें ठरलें. कारण, सर्वच सैन्य जगदीशपुरास पाठविल्यानंतर कदाचित् बंडवाले आरावर हल्ला करतील अशी इंग्रजांना भीति वाटूं लागली होती. त्या कामा-करितां ८४ नं. पायदळ पलटणीच्या दोन कंपन्या, मद्रासकडील रायफल पलटणींचे कांहीं शिपाई, शीख घोडेस्वार व दोन हलक्या

तोफा, येवढी सैन्यसामुग्री 'आरा फील्ड फोर्स्' चा सेनापति कॅप्टन ली ग्रँड् यानें आराच्या संरक्षणासाठीं ठेवली व ८ मे, सन १८५८ या दिवशीं जगदीशपुरावर हल्ला करण्यासाठीं एकत्रित झालेले सर्व इंग्रज सैनिक निघाले. परंतु, ली ग्रँड् ह्या सेनापतीलाहि, तारीख २३ एप्रिल रोजीं कुँवरसिंहाच्या रणविक्रमाची चमक बघावयास मिळाली होती ती हकीगत मनोरंजक असल्यामुळें प्रथम थोडीशी सांगणें अनाठायीं होणार नाहीं.

**ली ग्रँड्चा पराभव– कुँवरसिंहाचा अंतिम विजयः—**

कुँवरसिंह ता. २१ एप्रिल, सन १८५८ रोजीं जगदीशपुरांत पुन्हा दाखल झाला. ही बातमी 'आरा फील्ड् फोर्स्'चा मुख्य सेनापति कॅप्टन् ली ग्रँड् याला लागल्याबरोबर त्यानें कुँवरसिंहावर तुटून पडण्याचा बेत केला. त्याची कशी फजिती झाली तें इंग्रज ग्रंथकाराच्या लेखणींतून जसें लिहिलें गेलें आहे तसेंच लिहूं. तो म्हणतो, " ली ग्रँड्नें कुँवरसिंहाच्या आगमनाची वार्ता ऐकली व इंग्रजांच्या लहान लहान फौजांनीं बंडवाल्यांच्या मोठमोठ्या फौजांना पराभूत केल्याचें माहीत असल्यामुळें कुँवरसिंहाला जगदीशपुरांतून हुसकून लावण्यासाठीं तो लागलाच निघाला. जगदीशपुरापासून दोन मैल अंतरावर एका जंगलांत बंडवाल्यांचा तळ त्याला दिसला. त्यांची संख्या दोन हजारांपर्यंत असेल. ते हताश झालेले व तोफा नसलेले अशा स्थितींत होते. ता. २३ रोजीं सकाळीं ली ग्रँड्च्या लहानशा सैन्यानें आपल्याजवळच्या दोन हवित्झर तोफांनिशीं बंडवाल्यावर हल्ला केला. तोफांच्या गोळ्यांचा कांहींहि परिणाम बंडवाल्यांवर झाल्याचें दिसलें नाहीं. एकाएकीं एक बिगुलाचा आवाज ऐकूं आला त्यामुळें सर्वच घोटाळा उडून गेला. ली ग्रँडला आपण वेढलें जाऊं अशी भीति

वाटत होती म्हणून, किंवा त्या बिगुलानें दिलेल्या खुणेचा अर्थ न समजल्यामुळें म्हणून, त्याच्या सैन्याचा एवढा गोंधळ झाला कीं, त्या गोंधळांतून त्यांना काढणें अशक्य झालें. इंग्रजी सैन्य आपल्या तोफा व हत्ती मागें टाकून आरा येथें पळून जाऊं लागलें व बंडवाले त्याचा पाठलाग करूं लागले. या पाठलागांत कित्येक इंग्रज गोळीबारानें जखमी झाले तर कित्येक तलवारींच्या घावांनीं गतायुषी झाले. ३५ व्या पलटणीची फजिती तर विचारूंच नका. तिच्यांतील दोनतृतीयांश लोक जखमी अगर ठार झाले. जखमी झालेल्या लोकांत खुद्द ली ग्रँड् सेनापति होता. तसेंच लेफ्टनंट् मॅसे व डॉ. क्लार्क हे दोन इंग्रज अधिकारी मेलेल्यांच्या यादींत होते. ही दुर्दैवी घटना ली ग्रँडनें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूम न पाळल्यामुळें घडून आली असेंहि कांहींचें म्हणणें आहे."

**या प्रकरणांतील निष्कर्ष:—**

आपण काय लष्करी बाबतींबद्दल तज्ज्ञ आहोंत तर कोणाच्या जयापजयाची कारणमीमांसा लावावी ? आपण लष्करी बाबतींत तज्ज्ञ नाहीं हें खास. तरी पण कुँवरसिंह व ली ग्रँड् यांजमधील संग्रामांत कुँवरसिंहाला जो जय मिळाला त्याचीं कारणें शोधून काढणें आतांपर्यंत आपण वाचलेल्या इतिहासावरून कोणासहि शक्य आहे व त्याच दृष्टीनें आपण इंग्रजी इतिहासकारानें दिलेली कारण-परंपरा चुकीची आहे असें सिद्ध करणार आहोंत. इतिहासकार म्हणतात कीं, कुँवरसिंहाचें सैन्य विमनस्क दिसलें. खरें आहे; पण ती विमनस्कता इंग्रजी सैन्याच्या दर्शनानें आलेली नव्हती. आपला प्रभु अग्निगोलकानें विद्ध होऊन आसन्नमरण आहे ही चिंता त्या शूर बिहारी वीरांना ग्रासीत होती व त्यामुळें ते विमनस्क होते. आजपर्यंत बंडवाल्यांना पराभूत करणाऱ्या तोफा आतां निरुपयोगी

ठरल्या ह्याचें कारण येवढेंच, कीं इंग्रजांची युद्धनीति या समयापर्यंत कुँवरसिंहानें पूर्णपणें जाणली होती व सैन्याची व्यूहरचना त्यानें अशा कुशलतेनें केली होती कीं, तोफांच्या मारानें आपलें नुकसान यत्किंचितहि होऊं नये. ली ग्रँड मागें कां हटला याबद्दल इतिहासकार साशंक दिसतात. परंतु त्या साशंक मनोवृत्तींतच इंग्रजांच्या पराभवाचें स्पष्ट कारणहि सांगूं शकतात ही एक गंमत वाटते. कदाचित् आपण वेढिलें जाऊं अशी ली ग्रँडला भीति वाटली असावी असें त्यांनीं काढलेलें अनुमान 'कदाचित्' येवढ्या एका शब्दाखेरीज अगदीं बरोबर आहे. कारण अत्रौलिआ येथील लढाईपासून कुँवरसिंहानें आपली युद्धपद्धति पुरी बदलली होती हेंहि आपण पाहिलें आहे. आणखीहि एक कारण, जें इतिहासकार विसरल्यासारखें दिसतात तें असें कीं, प्रत्येक बिहारी वीराला त्या वेळीं जाणीव होती कीं, आज आपण जो संग्राम करीत आहों, तेवढा एकच संग्राम आपल्या मालकाला इहलोकीं बघावयास मिळणार, दुसरा नाहीं. तेव्हां त्या वीराच्या डोळ्यांचें पारणें फेडण्यासाठीं आज इतका समरचमत्कार दाखविणें योग्य होतें कीं, तसा आजपर्यंत कधींहि त्यानें पाहिला नसेल. तो तसा दाखविला गेला व जयोत्साहनिदर्शक अशा कर्कश परंतु मंगलदर्शक तुताऱ्या वाजूं लागल्या. त्याच तुताऱ्यांचा ध्वनि इंग्रजांना परत फिरण्याचा बिगूल वाटला असेल, दुसरें कांहीं नाहीं. सार गोष्ट येवढीच कीं, इंग्रजांचा अगदीं आसन्नमरण स्थितींतहि कुँवरसिंहानें पूर्ण पराभव केला व आपलें निशाण जगदीशपुरावर फडकत ठेवलें !

**कुँवरसिंहाचें सुरधामगमनः—**

तारीख २६ मे इ. स. १८५८ हा दिवस उजाडला !

जगदीशपुरावर स्वातंत्र्याचें निशाण फडकत होतें ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय

ली ग्रँडवर मिळविलेल्या विजयानें कुँवरसिंह आनंदांत होता !!

पण हा आनंद अल्पकाळ टिकणारा ठरला. गंगा ओलांडतांना लागलेल्या जखमेनंतर जी अलौकिक शस्त्रक्रिया केली गेली तिजमुळें व ली ग्रँडशीं झालेल्या युद्धामुळें कुँवरसिंहाच्या जखमेंतून अपरिमित रक्तस्राव झाला होता. तशांतच हर्षाच्या ऊर्मींनीं रक्ताला अधिक चालना मिळाली असावी. भयंकर ग्लानि येऊन कुँवरसिंहाचा प्राणपक्षी सर्व लोक बघत असतां त्याच्या देहपंजरांतून उडून गेला. शूराला साजेल असें स्वतंत्र भूमींतील मरण कुँवरसिंहाला लाभलें व आपलें चरित्र उज्ज्वल करून तो मरूनहि चिरंजीव झाला. कुँवरसिंहाच्या सर्व चरित्राचें सार एका सुंदर श्लोकांत देतां येईल. तो श्लोक असा:—

न सदश्वाः कशाघातं न सिंहा घनगर्जितम् ।
परैरङ्गुलिनिर्दिष्टं न सहन्ते मनस्विनः ॥

इतिहासाच्या अफाट क्षेत्रांत जी थोडीशीं वीर चरित्रें आढळतात त्यांत कुँवरसिंहाशीं थोडेंसें सम होईल असें एकच चरित्र सांपडतें. कानडा प्रांत इंग्रजांनीं ज्या वेळीं घेतला त्या वेळीं तेथील फ्रेंच सेनापति मॉंटकाम् ह्यालाहि असेंच वीरोचित मरण आलें. इंग्रज सेनापतीनें आब्राहामच्या टेकड्यांवरील लढाई जिंकून फ्रेंच राजधानी क्वेबेकूहि जिंकण्याचा सुमार आणला होता. जिकडे तिकडे युद्ध चमत्कार चालूच होता. तोफांचे गोळे सुटत होते व फ्रेंचांची फौज आपलें सर्व बळ एकवटून इंग्रजांना आडविण्याची शिकस्त करीत होती. मॉंटकाम् जखमी होऊन मृत्यूची वाट बघत होता. शेवटचा श्वास सोडतांना त्यानें प्रश्न विचारला—

" राजधानीवर कोणाचें निशाण फडकत आहे ? " अनुचरांनीं उत्तर केलें, " फ्रेंचांचें ! " मॉंटकाम् म्हणाला, " बरें तर, मग

मी सुखानें मरेन ! ” प्रिय हिंदमाते ! तुझ्या मुखाला स्वतंत्रतेचा उजळा देण्याकरितां आणखी किती बरें बलिदान करावें लागेल म्हणजे तूं प्रसन्न होशील ! तुझें तें काळें तोंड आम्हांला बघवत नाहीं आणि म्हणून आम्ही श्रीहरिपाशीं दीनपणें असें मागतों कीं, बंडाच्या राक्षसी मार्गांत कुँवरसिंहासारख्या अमित पराक्रमी पुरुषांचें बलिदान झालें. त्यांचे मार्ग चुकले म्हणून ते यशस्वी झाले नाहींत, तथापि आजकालच्या शान्तियुद्धांत लढणाऱ्या वीरांच्या मार्गाला तरी तूं आपला आशीर्वाद दे व आमच्या हिंदभूमीला स्वातंत्र्याचा मंगल तिलक लाव. त्याच वेळीं हे सर्व बलिदान झालेले वीर चिरकालीन स्वर्गसुख पावतील, तोंवर नाहीं !

**कुँवरसिंहाचें यशोगानः—**

कुँवरसिंह आपला पार्थिव देह टाकून सुरधामाप्रत जाता झाला. परंतु, त्यानें अशी कीर्ति मागें ठेविली आहे कीं, तिचें गान करण्यांत कोणालाहि कंटाळा येऊं नये. चंदनाला कितीहि घासलें तरी परिमलाशिवाय दुसरें काय सांपडणार ? उसाला कोठेंहि चावा घेतला तरी मधुर रसाशिवाय दुसरें काय मिळणार ? तशीच खऱ्या थोरांच्या चरित्राचें पान करण्याची माधुरी आहे. तीं चरित्रें कितीहि गाइलीं गेलीं तरी गाणारा कंटाळत नाहीं व ऐकणाराचे डोलहि थांबत नाहींत. तीं स्फूर्तियुक्त तर असतातच पण स्फूर्ति उत्पन्न करणारीहि असतात. असें असल्यामुळें त्यांना इतिहासांत प्रामुख्यानें स्थान मिळतें. कुँवरसिंहाचें इंग्रजांनीं अपरिमित नुकसान केलें होतें. हत्येला प्रतिहत्या, या न्यायानें जर तो वागला असता तर काय चुकलें असतें ? त्याला कोणी नांवें ठेविलीं असतीं ? तो चुकलाहि नसता व त्याला नांवेंहि ठेविलीं गेलीं नसतीं. परंतु आघाताला प्रत्याघात करणारा साधारण दर्जाचा

पुरुष ठरतो. त्याला पहिल्या प्रतीच्या वीर-चरितावलींत स्थान मिळत नाहीं. 'शठंप्रति शाठ्यम्' या न्यायाचा पुरस्कार करणारीं माणसें अधिकांत अधिक म्हणजे लोकमान्यत्व पावतात. परंतु, 'शठंप्रति सत्यम्' या न्यायाचा अवलंब करणारे महात्मे सर्व जगभर मान्यत्व मिळवितात. त्यांच्या कीर्तीला केवळ त्यांच्याच देशाची मर्यादा थांबवूं शकत नाहीं. तें प्रचुर यश एकदेशीय न ठरतां सप्तसमुद्रांना आक्रमितें आणि म्हणूनच कुँवरसिंहाचें नांव थॉमसन्च्या छोट्या इतिहासांतहि सांपडतें व मॅलेसन्सारखा बडा इतिहासकारहि त्याच्या मरणाचें वर्णन करतांना म्हणतो, "डग्लस् कुँवरसिंहाच्या राजधानीस पोंचण्यापूर्वीच तो कडवा योद्धा मरण पावला होता. त्याजवर झालेल्या अन्यायामुळें तो बंडांत खेंचला गेला होता; पण त्याच्या समजुतीप्रमाणें त्याजवर झालेल्या अन्यायांचें परिमार्जनहि त्यानें कोणालाहि अपेक्षा नसेल इतक्या पूर्णतेनें केलें होतें." आणखी अधिक शब्द आमचे-जवळ तरी कोठें आहेत कीं, त्यांचे सहायानें आम्ही कुँवरसिंहाच्या यशाचें वर्णन करूं ? कुँवरसिंह शत्रूंवरहि उपकार करणारा होता व दुसऱ्यानें पीडा केली असतांहि मागील अपकार मनांत न आणतां त्याजविषयीं कठोरता आपले अंगीं न बाणेल अशी काळजी घेणारा होता. दिव्याच्या उजेडानें सूर्य दाखवावा त्याप्रमाणें आमच्या कोत्या शब्दानीं कुँवरसिंहाचें यशोगान करण्याचा प्रकार होईल. सबब आपण येवढेंच म्हणूं कीं, त्याचें यश स्वयंसिद्ध आहे!

**कुँवरसिंहाचें कोमलत्वः--**

सर्व जगांतील संस्कृतींत ज्याची संस्कृति श्रेष्ठ असा भारतवर्ष नेहमीं परवश कां असावा असा प्रश्न कित्येक वेळां मनश्चक्षूंपुढें

उभा राहून मतीला कुंठित करूं बघतो. परंतु, किंचित् खोल विचार केल्यास त्या प्रश्नाचें उत्तर देतां येतें. आम्हां भारतवासियांत वीरपुरुषांची कमतरता नाहीं, आम्ही ज्ञानांत कोणाच्या मागें राहणार नाहीं, आमची कर्तृत्वशक्ति सर्वव्यापी आहे, आमच्यांत सर्वच स्पृहणीय गोष्टी संपूर्णत्वानें वास करीत आहेत. तरी पण आमच्या चांगुलपणाचा नेहमींच अतिरेक होत असल्यामुळें आम्ही आपलें नुकसान करून घेतों. कुँवरसिंहाच्याच बाबतींत पहा ना. आरा हाउसच्या वेढ्यांत व त्याच्या आयुष्यांतील अगदीं शेवटच्या युद्धप्रसंगांत देखील त्यानें शिखांच्या जीविताचें नुकसान होऊं नये अशी काळजी घेतली. इंग्रजांचा येवढा पराभव होऊन, इतके गोरे मारले जाऊन, शीख शिपाई किती मेले असें कोणीं विचारलें तर 'नऊ'. हें उत्तर ऐकून खऱ्या आर्यहृदयाची साक्ष पटते. ही कमालीची कोमलताच कार्यनाश करण्यास कारण होते. असल्याच शिखंडींच्या आड दडून सोडलेल्या अस्त्रांनीं कुँवरसिंहासारखे भीष्म विद्ध होतात. नाहीं तर मूठभर परकीय हिंदुस्तानवर राज्य करण्यास समर्थ होतील अशांतली गोष्ट नाहीं. असो. पण सत्यस्थिति मात्र अशी झाली कीं, कुँवरसिंहांनीं भलत्याच वेळीं परकीयांशीं एकरूप झालेल्या शिखांवर आत्मीयतेनें दया केली व आरंभापासून शेवटपर्यंत तीच आत्मीयता त्यांचे नाशास कारण झाली. तथापि जे खरे सत्त्वधीर लोक असतात ते आपापल्या परीनें ठरलेला मार्गच अवलंबितात व त्यांत मरण्यासहि सिद्ध होतात. कुँवरसिंहाचें वैर गोऱ्यांशीं होतें व त्यांनाच तेवढा मारण्याचा त्याचा निर्धार होता. आज नाहीं उद्यां, शीख सैनिक आपली चूक ओळखतील अशा खुळ्या कल्पनेनें भारला जाऊन त्यानें शत्रूवरहि दयाच केली. शिखांना तर त्यानें वांचविलेंच पण समरां-

गणाच्या बाहेर गोऱ्यांशीं देखील तो कधींहि क्रौर्यानें वागल्याचें आढळांत येत नाहीं.

**कुँवरसिंहाचें समरकौशल्यः—**

चारी बाजूंनीं शत्रुसैन्यें एकामागून एक हल्ले चढवीत असतां सर्वांची कोंडी फोडून आपलें इष्ट साध्य हस्तगत करण्यांत कुँवरसिंहानें जें समरकौशल्य दाखविलें त्यास बंडाच्या इतिहासांत तोड नाहीं. कुँवरसिंह हा एकटाच वीरपुरुष कीं, जो स्वकष्टार्जित स्वातंत्र्याच्या पवित्र वातावरणांत मृत्युमुखीं पडला. शत्रूची सैन्य-रचना कशी असल्यामुळें आपला पराभव होतो, कोणत्या बाजूनें आपली सेना लंगडी पडते, काय केलें असतां आपण विजयी होऊं असा चारी बाजूंनीं विचार करणारा हा एकटाच सेनानी बंड-वाल्यांच्या पक्षांत होता असें म्हटलें तरी चालेल. तात्या टोपे या सेनानायकानें इंग्रजांविरुद्ध एक जय मिळविला हें खरें; पण त्याचेच बरोबर त्यानें त्यांजविरुद्ध हार किती वेळां खाल्ली याचा विचार केल्यास तात्या टोपींचें रणकौशल्य कुँवरसिंहाच्या समरचातुर्याशीं तुलना केल्यास फिकें पडेल. मराठ्यांना ज्या लढण्याच्या पद्धतीनें विजय मिळवून दिला त्याच गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा अंगिकार तात्या टोपे व कुँवरसिंह यांनीं केला. फरक इतकाच कीं, तात्या टोपे हा पळपुट्या लढाईत यशस्वी ठरला आणि कुँवरसिंह मात्र समोरासमोर लढूनहि यशस्वी झाला. कुँवरसिंहाचें हिंदी चरित्रकार असें लिहितात कीं, झांशीच्या प्रसिद्ध लक्ष्मीबाईनें कुँवरसिंहाच्या पुरस्काराखालीं लढण्याची याचना केली होती. पण कुँवरसिंहाच्या शालीनतेनें त्या मागणीचा स्वीकार केला गेला नाहीं. नाना बंडवाले व त्याची प्रभावळ शत्रु जवळ आला असतां सुद्धां ब्राह्मणांच्या पंगती उडवीत असलेली पाहून दुःखित झालेल्या

लक्ष्मीबाईनें कुँवरसिंहाच्या अंगची चमक ओळखली असावी आणि म्हणूनच त्याच्या सेनापतित्वाखालीं लढण्याचा विचार केला असावा. गुणी लोकांची परीक्षा गुणवंतच करूं शकतो. गुणहीनांनीं ती परीक्षा काय करावी ? सारांश असा कीं, इंग्रजांना या देशांत कोणाच्याहि अंगीं न दिसलेलें समरकौशल्य कुँवरसिंहाच्या ठिकाणीं दिसलें आणि म्हणूनच ते त्याची एवढी प्रशंसा करतात. आपल्यासारख्या त्याच्या देशबांधवांचें काम त्याहूनहि अधिक आहे. तें इतकेंच कीं, त्याचें पावनस्मरण नेहमीं करावें व त्या स्मरणानें उत्तेजित होऊन त्यानें केलेल्या चुका न करतां आपल्याकडून बनेल ती देशसेवा करावी !

**कुँवरसिंहाच्या मृत्यूनंतरः—**

कुँवरसिंहाच्या मृत्यूनंतर सेनापतित्वाची माळ अमरसिंहाच्या गळ्यांत पडली. एकाद्या मोठ्या कुटुंबांतील जबाबदार व्यक्ती गत झाल्यानंतर त्या कुटुंबाचें ओझें उचलण्याची जबाबदारी एकाद्या कोंवळ्या बालकावर आल्याबरोबर जी चमत्कारिक अवस्था त्या बालमनाची होत असते तीच अवस्था अमरसिंहाच्या मनाची झाली. वडील भावानंतर समरचण्डीचें आवाहन भावाच्या पावलावर पाऊल टाकून करतां येईल कीं नाहीं या संशयांत तो पडला. तथापि ती माळ त्यानें आनंदानें गळ्यांत घालून घेतली. कालिमातेला बलिदान ठरलेल्या वध्य पशूची जास्वंदीच्या फुलांची माळ त्या पशूला जशी शोभविते, तशी ही बंडखोरांच्या सेनाधिपत्याची माळ त्याला शोभविती झाली असावी. कारण, त्या काळीं चाललेल्या प्रखर भीषणतेच्या रणयज्ञांत सर्वांची आहुति पडावयाचीच हें ठरल्यासारखेंच होतें. बंडाच्या नेतृत्वाची माळ ज्या गळ्यांत पडली त्या गळ्यांना फांसांत तरी अडकावें लागलें, नाहीं तर इतर

कोठल्या तरी प्रकारांनीं बळी पडावें लागलें ही आठवण झाल्यामुळें वध्य पशूच्या लाल माळेची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. कुँवरसिंह व अमरसिंह हे भाऊ खरेच. तथापि, वडील व धाकटा एवढा तरी फरक राहतोच. असें असल्यामुळें वडील भावाच्या सर्व कल्पनांचा फायदा मिळून सुद्धां अमरसिंहाला कांहीं भरीव तऱ्हेचें काम करतां आलें नाहीं. तरी पण तात्या टोपींची पळती लढाई अमरसिंहानें चालूच ठेविली; व बिहारी बंड मोडण्यास इ. स. १८५८ चा शेवट बघावा लागला. ह्या पळपुट्या लढाईनें इंग्रजांना कसें कंटाळून सोडलें याचा इतिहासहि मनोरम असल्या-मुळें तो थोडक्यांत सांगितल्याशिवाय आपल्या कथानकाची पूर्तता होणें नाहीं म्हणून त्याची माहिति देण्याचा यथामति प्रयत्न करीत आहे.

**अमरसिंहाचें सेनापतित्व:—**

अमरसिंहाच्या कामगिरीचें यशापयश त्याच्या विरुद्ध बाजूच्या सेनेला मिळालेल्या यशापयशावरून चांगलें समजावून देतां येईल. सर एडवर्ड् लुगार्ड हा त्याचेविरुद्ध लढण्याकरितां इंग्रजांचे बाजूनें नेमिला गेलेला सरसेनापति होता हें आपण पाहिलेंच आहे. त्याच्या सैन्याच्या हालचालींसंबंधानें लिहितांना इंग्रज इतिहासकार लिहितो कीं, “ सर एडवर्ड् लुगार्ड् याचे हाताखालील ‘आझमगढ फील्ड् फोर्स्’नें त्याचेविरुद्ध लढणाऱ्या बंडवाल्यांच्या सुसंघटित अशा जमावांची यशस्वी रीतीनें पांगापांग केली. परंतु, टोळ्या टोळ्यांनीं फिरून उपद्रव पोंचविणाऱ्या शत्रूंचा बंदोबस्त मात्र त्याला करतां आला नाहीं. त्याला जें थोडेंसें यश मिळालें तेंहि स्वल्प किंमतींत मिळालें नव्हतें. कारण, जंगलांतील लढाईबरोबरच तिकडील उन्हाच्या तडाक्यानेंहि कित्येक शिपायांना मृत्युमुखीं

पडावें लागलें व त्यामुळें पुष्कळ शिपायांना जगदीशपुराहून आरा मुक्कामीं वाहून न्यावें लागलें." एकाच वाक्यांत, लुगार्ड् हा यशस्वी झाला असें लिहून, त्याला शत्रूंचा बंदोबस्त करतां आला नाहीं असें लिहिणाराची हातचलाखी नवलाईची भासते. सुसंघटित जमावांचा पराभव करणाऱ्या सेनापतीला टोळ्याटोळ्यांनीं फिरणाऱ्या शत्रूचा बंदोबस्त करतां आला नाहीं याचा अर्थ असा कीं, इंग्रजांना अमरसिंहाच्या युद्धपद्धतीची कल्पनाच आली नाहीं. चारी बाजूंनीं आक्रमण झाल्यानंतर पुन्हा समोरासमोर लढाई देण्याइतका बावळट अमरसिंह खास नव्हता. एकादी न टळणारी वाईट गोष्ट शक्य तेवढी लांब लोटणें हेंच खरें शहाणपण ठरतें व तोच मार्ग अमरसिंहानें स्वीकारला. सबंध हिंदुस्तानांत मोठें असें बंडाचें केंद्र एकहि उरलेलें नसल्यामुळें व चीन आणि इराण या देशांतून युरोपिअन सैनिकांचा एकसारखा प्रवाह येथें लोटत असल्यामुळें लपंडावी लढाईचा एकच मार्ग अमरसिंहाला राहिला व तोच त्यानें स्वीकारिला. इंग्रजांचीं सर्व सैन्यें एकवटून जगदीशपुरावर हल्ला करण्याचें इंग्रजांनीं ठरविलें होतें. कारण कुँवरसिंहाच्या नांवाची धडकी त्यांचे उरांत अजूनहि बसली होती. तो वीर इहलोकयात्रा संपवून परलोकगमन करता झाला होता ही गोष्ट त्यांना कळली नसावी. त्यांचीं सर्व सैन्यें एकत्र होण्याचे पूर्वींच अमरसिंहानें सैन्याच्या हालचालींस सुरुवात केली.

**इंग्रज जगदीशपूर घेतात:—**

तारीख ९ मे रोजीं लुगार्ड जगदीशपूरचे रोखानें निघाला. ससूराम येथून करफील्ड येऊन मिळेल अशा अपेक्षेनें लुगार्ड् बिहिआ या ठिकाणीं तंबू-डेरे ठोकून बसणार, इतक्यांत अमरसिंह आरावर हल्ला करीत आहे अशी बातमी आली. यत्किंचितहि वेळ

न गमावितां लुगार्डनें अमरसिंहाला आडवलें. शत्रूशीं टिकाव लागणार नाहीं असें पाहून अमरसिंह मागें हटला व ली ग्रँडशीं झालेल्या संग्रामांत मिळालेल्या तोफा घेऊन जंगलांत निघून गेला. जगदीशपुरांत प्रवेश करणें इंग्रजांना मुळींच कठीण गेलें नाहीं. कारण लढाई अशी झालीच नाहीं. तथापि दुर्भागी जगदीशपुरावर इंग्रजांनीं पुन्हा आपला सूड काढलाच. तारीख १० मे रोजीं जगदीशपुराची तटबंदी तोडण्यांत आली व कुँवरसिंहाच्या मालकीच्या इमारती उध्वस्त केल्या गेल्या. लुगार्डनें आपल्या सैन्याचे तीन भाग केले. एक भाग जगदीशपुराचें संरक्षण करण्यास राहिला, दुसरा आरा मुक्कामीं तळ देऊन बसला व तिसऱ्यानें लुगार्डच्या हुकमावरून अमरसिंहाचा पाठलाग सुरू केला. या प्रसंगीं कुँवरसिंहाचें कांहीं आप्त इंग्रजांना शरण गेले. कारण कुँवरसिंहानंतर लढण्यांत कांहीं जयाची आशा असेल असें त्यांच्या मनांतहि आलें नाहीं. कदाचित्, पळत्या लढाईला ते कंटाळलेहि असावे! कांहीं कां असेना, कुँवरसिंह आपल्या व्यक्तित्वाच्या जोरावर जो भरंवसा आपल्या अनुयायांचे मनांत उत्पन्न करूं शकत होता तेवढा भरंवसा अमरसिंहाचे कर्तृत्वाबद्दल सर्वांचेच मनांत उत्पन्न होत नव्हता याचीं निदर्शक चिन्हें मात्र घडून येऊं लागलीं हें खास. अशा तऱ्हेनें जगदीशपूर दुसऱ्यानें इंग्रजांचे ताब्यांत आलें व दुसऱ्यानें त्याची भग्नावस्था झाली. अमरसिंहाविरुद्ध लढाई चालविण्यास बोलावलेला करफील्डहि येऊन दाखल झाला व दोन्ही सेना आपापल्या परीनें अमरसिंहाला पकडण्याची खटपट करूं लागल्या. नवीन जाळें गुंफण्यास सुरुवात झाली व त्या जाळ्यांत न सांपडण्याची खटपट अमरसिंह करूं लागला.

**बंडवाल्यांचे छिपते छापे:—**

लुगार्ड् व कारफील्ड यांच्या दृष्टीला आतां नवीनच चमत्कार दिसूं लागला. ज्या ज्या ठिकाणीं बंडवाल्यांशीं इंग्रज सेनापति भिडत त्या त्या ठिकाणीं बंडवाल्यांचा संपूर्ण पराजय होई. परंतु, जरी चारी बाजूंनीं त्यांचा पराजय झाला तरी ते लहान लहान टोळ्या बनवून इतक्या वेगानें निघून जात कीं, ते कोठें गेले हें ओळखण्याचीच इंग्रजांना पंचाईत पडे व ते निराशेनें चिडून जात. बंडवाल्यांचें मात्र काडीचेंहि नुकसान होईना. एकट्या मे महिन्यांत, आरा, जगदीशपूर, लतवरपूर, हेतमपूर, बिहिआ, पेरू आणि जितौरा इतक्या ठिकाणीं बंडवाल्यांच्या व इंग्रजांच्या चकमकी उडाल्या; परंतु समरांगणांतील पोकळ विजयाशिवाय दुसरें कोणतेंहि यश लुगार्डच्या पदरीं आलें नाहीं. प्रत्येक खेपेला तीच तऱ्हा. शत्रु दिसावेत, त्यांजवर इंग्रजी सैन्यानें चालून जावें, त्यांचा मोड करावा व आनंदांत असावें. तथापि त्या आनंदाची पहिली ऊर्मि मावळत नाहीं तोंच तेच शत्रु पुन्हा दुसऱ्या भागांत दृग्गोचर व्हावेत व पुन्हा तोच प्रकार घडून यावा. अशा ह्या युद्धांत यश मिळण्यापेक्षां हाल मात्र फार होत व फिरून बंडवाल्यांची सेना मोडून काढण्याचें कामहि होत नसे. लुगार्ड त्यांचा पूर्ण बंदोबस्त करूं शकला नाहीं याचें निदर्शक म्हणजे बंडवाल्यांनीं इतक्या ठिकाणीं अपयश घेऊन सुद्धां डुमरांव येथील निळीची कोठी जाळून टाकली, बक्सार शहरानजीक राजपूर या ठिकाणीं धामधूम केली व कर्मनाशा नदीवरील रेल्वे-पुलाचें कामहि बंद पाडलें. येवढेंच नव्हे तर रेल्वे बांधणाऱ्या इंजिनिअरांचे बंगले जाळून टाकून तेथील कामगारांच्या झोंपड्या व विटा भाजण्यासाठीं लागणाऱ्या भट्ट्यांकरितां जमविलेला कोळसा व लांकूडफांटा हें पण

अग्निमुखांत समर्पण केलें. लुगार्ड ह्या सर्व चमत्कारांनीं कंटाळला व आणखी कांहीं सैन्य मदतीस बोलावून त्याची वाट बघत बसला. अगदीं थोडक्यांत मे महिन्यांतील हकीगतीचें वर्णन करावयाचें म्हटल्यास येवढेंच म्हणावें लागेल कीं, अमरसिंहाच्या कौशल्यामुळें लुगार्डला रणभूमीवर शस्त्रास्त्रांच्या सामुग्रीमुळें मिळालेल्या विजयां-पेक्षां दुसरें कांहींहि प्राप्त झालें नाहीं; व बंडवाल्यांचा जोम मात्र कायमच राहिला.

## लुगार्डची निराशा व अधिकारसूत्रन्यास:—

समोरासमोरच्या लढाईत कुशल असलेल्या इंग्रजी सेनेला जंग-लांतील लढाई जमेना. तथापि प्रयत्न केल्याशिवाय इंग्रज माणूस कधींहि राहत नाहीं या त्याच्या स्वभावसिद्ध गुणास अनुसरून लुगार्डनें आपल्या सैन्याचे दोन भाग केले व जगदीशपुराजवळ असलेल्या जंगलाच्या उत्तर-दाक्षिण भागांत त्यानें त्यांचे तळ ठोकून बंडवाल्यांची नाकेबंदी करण्याचें काम सुरू केलें. ह्या दोन्ही तळांना जोडणारा एक रस्ताहि बनविण्यांत आला; व बंडवाल्यांच्या मुख्य सैन्याशिवाय अयोध्येच्या बाजूला अस्वस्थता उत्पन्न करण्यासाठीं त्याच्याकडून पाठविल्या जाणाऱ्या तुकड्यांचे तोंडांवर राहण्याकरितां म्हणून ब्रिगेडिअर डग्लसची योजना कर-ण्यांत आली. परंतु, हत्तीच्या एकेका अवयवांना चांपचून हत्तीला सूप, साप, केळीचा खुंट वगैरे पदव्या देणाऱ्या आंधळ्यांप्रमाणें बिहारी बंडवाल्यांच्या मागें लागणाऱ्या इंग्रजी सेनानींची स्थिति झाली. बंडवाल्यांचा खरा ठावठिकाण त्यांना कधींहि लागत नसल्यामुळें मृगजलामागें पळून पुन्हा तहान न भागणाऱ्या हरिणा-प्रमाणें डग्लसची फजिती झाली. एका क्षणीं एकाद्या आंबराईत

शत्रु दिसावेत म्हणून ब्रिटिश सैन्य तिकडे चालून जाई तोंच ते तेथून अदृश्य होत व नदीच्या परतीरावर दिसूं लागत. नदी ओलांडावी तोंच ते जवळपासच्या गांवांतून दडून बसले आहेत अशी बातमी लागावी. अशा नाना तऱ्हेच्या हुलकावण्या बसून डग्लसचें सैन्य काम करण्यासहि असमर्थ झालें. डग्लस् म्हणतो, "उन्हानें व शत्रूच्या पाठलागानें माझ्या सैन्याची भूक, तहान व झोंप हीं सर्व नष्ट झालीं आहेत. त्याच्यानें ही असली लढाई करवेल असें मला मुळींच वाटत नाहीं." खुद्द लुगार्डचीहि स्थिति तीच होती. एका बाजूस लुगार्ड् व दुसऱ्या बाजूस कॅप्टन् रॅट्रे असे अधिकारी जागरूक असतांना देखील त्यांच्या तळापासून २।३ मैलांवरच्या बंडवाल्यांच्या हालचाली त्याला कळत नसत. ह्या अपयशाची कारणमीमांसा करतांना असें सांगण्यांत येतें कीं, कुँवरसिंहाच्या अनुयायांपैकीं बहुतेक सर्व शिपाई 'भोजपुरी' होते, ते शीखहि नव्हते व पुरभय्येहि नव्हते. खरोखर पाहतां हेंच कारण अगदीं बरोबर आहे. त्याचा खरा अर्थ येवढाच आहे कीं, जशी पुरभय्ये व शीख या लोकांत इंग्रजांना फितुरी करतां आली तशी भोजपुरी लोकांत करतां आली नाहीं व म्हणूनच त्यांना बिहारी बंड लवकर मोडतां आलें नाहीं. ह्या दगदगीनें कंटाळून जाऊन लुगार्डनें केवळ बिहारमधीलच सेनापतित्वाचा राजीनामा दिला येवढेंच नाहीं तर त्यानें हिंदुस्तानासच रामराम ठोकला व डग्लसच्या हातीं आपलें काम सोंपवून तो हिंदुस्तानांतून निघून गेला.

**अमरसिंहाची धडाडी—गया येथील बंड :—**

सन १८५८ च्या जून महिन्याचे अखेरीस लुगार्डनें अधिकारसूत्रें खालीं ठेविलीं व तीं डग्लसनें उचललीं. डग्लस् आतां ब्रिगे-

डिअरचा कर्नल झाला. कर्नल डग्लसनें जगदीशपुराच्या बंडवाल्यांवर ताज्या दमानें मोर्चा फिरविला. परंतु, आतांपर्यंतच्या अनुभवानें अमरसिंह केवळ शहाणपणच शिकला नव्हता तर धीटपणाहि शिकला. त्यानें आतां लपून मागें बसण्याचें धोरण थोडें थोडें सोडून देण्याचें ठरविलें व जमल्यास कांहीं नवीन उत्पात करण्यास तो सिद्ध झाला. डग्लस् आपली नवीन जागा घेत आहे तोंच बातमी येऊन पोंचली कीं, " गया येथें बंड झालें." गया येथील या बंडांत एक वैशिष्ट्य होतें तें असें कीं, गया शहराच्या संरक्षणार्थ ठेवलेले पोलीस शिपाई या बंडांत सामील झाले होते. त्यांनीं शहर आपल्या ताब्यांत घेतलें व तुरुंगाचे दरवाजे उघडून देऊन कैदी मोकळे सोडले. ही घटना घडून येतांच सर्व युरोपियन लोकांनीं खंदकांमागें आश्रय घेतला व आपलें संरक्षण करण्यास आरंभ केला. बंडवाल्यांची टवाळी करण्याच्या हेतूनें गयेच्या ह्या घटनेचें वर्णन करतांना इंग्रज इतिहासकार लिहितात, " गयेला बंड झालें व तेथील पोलीस, कैदी व इतर गुन्हेगार हे सर्व एकदम देशभक्त बनले." टवाळखोर इतिहासकारानें लिहिलेला इतिहास इ. स. १८५९ सालीं लिहिला आहे. त्याला भविष्यकाळाकडे बघण्याची शक्ति नव्हती. नाहीं तर त्यानें असें मूर्खासारखे प्रलाप काढलेच नसते. आपणांपुढें अगदीं ताजी घडलेली रशियांतील क्रांति प्रत्येकाला अवगत असेलच. त्या क्रान्तींत गयेला घडलेली घटनाच फार मोठ्या स्वरूपांत घडून आली. एकट्या रशियन राजधानींत एका दिवसांत हजारों पोलीस क्रांतीच्या नायकांनीं ठार केले तेव्हां कोठें त्यांचा पुढील मार्ग यशस्वी झाला. लाकूड म्हणून जो पदार्थ आहे त्याच्या सर्व उपांगांनीं कट करून जर कुऱ्हाडींना दांडेच मिळूं दिले नाहींत तर जगांतील सर्व अरण्यें

सुरक्षित राहतील. परंतु तें तसें घडत नाहीं म्हणूनच कुऱ्हाडीचे दांडे गोताला काळ होऊन बसतात. कोठल्याहि परकीय राज्य-संस्थेचा सगळ्यांत मोठा भर पोलीसदलावर असतो. कारण तें दल आपल्याच जातिबांधवांना कह्यांत ठेवण्यास उपयोगी पडतें. क्रांतीचें कोणतेंहि अंग पोलीसच्या मदतीशिवाय यशस्वी होणें कठीण असतें व ही गोष्ट लक्षांत घेतां गयेचे बंडखोर पोलीस खरोखरीचे देश-भक्त ठरतात. टवाळखोरांच्या जिव्हेला मात्र उगाच शीण पडतो !

**औट घटकेची अमरसिंहशाही:—**

गयेला गडबड झाली पण ती लवकरच थांबवण्यांत आली. कारण अमरसिंहाचा त्या गडबडींत प्रत्यक्ष हात नव्हता. आतां अमरसिंहाची हिंमत खचली, त्याच्यानें कांहीं कार्य होणें शक्य नाहीं, अशा कल्पनेनें सर्व जमा झालेले रथी-महारथी आपापल्या मुख्य ठिकाणीं गमन करते झाले. दहावी पायदळ पलटण व मद्रासी तोफखाना दानापुरास गेले, डग्लस् आपल्या तुकडीसह काशीला गेला, मोठा अवजड तोफखाना अलाहाबादेस पोंचवि-ण्यांत आला, शीख घोडेस्वार व मद्रासी बंदूकवाले ससरामकडे गेले व रॅट्रे मात्र बंदोबस्ताकरतां जगदीशपुरास राहिला. जुलैची ८ तारीख उजाडली व आरा शहरावर छापा आला. बंडवाल्यांनीं व्हिक्टर साहेबाचा बंगला जाळला व इंग्रजांची सत्ता आरा शहरां-तून उखडली. बाहेरची मदत येईपर्यंत बंडवाल्यांनीं शहराचा ताबा सोडला नाहीं. परंतु, त्यांचें खरें लक्ष जगदीशपुरावर होतें. आपल्या पुण्यस्मृति सेनानायकाची राजधानी इंग्रजांचे हातीं असलेली त्यांच्या डोळ्यांत खुपत होती. तें शल्य ऑगस्ट महिन्यांत निघालें. रॅट्रेला व डग्लसला पराभूत होऊन जगदीशपुराहून पाय काढावा लागला व जगदीशपुरावर पुन्हा एकदां बंडाचें निशाण

फडकूं लागलें. इतकेंच नव्हे तर अमरसिंहानें आपल्या बंधूच्या पावन-स्मरणार्थ रुपयाचें नाणेंहि पाडलें अशी माहिती तारीख-इ-उज्जैन या ग्रंथांत वाचावयास मिळते. राम वनवासास गेल्यावर भरतानें सिंहासनावर रामाच्या पादुका ठेवूनच राज्य केलें. खरें अनुज आपल्या वडील बंधूचा योग्य तो मानमरातब राखण्यांतच भूषण मानतात व तेंच युक्त आहे! रामाला जसा भरत तसाच कुँवरसिंहाला अमरसिंह ठरला व इ. स. १८५८ च्या पाऊस-काळांत इंग्रजांच्या असहायतेचा फायदा घेऊन ऑगस्टपासूनच्या पुढील पावसाळ्यांत आपल्या इमानी भोजपुरी अनुयायांसह अमर-सिंहानें जगदीशपूर राजधानी व आसमंतांतील प्रदेश या टापूंत स्वायत्त स्वराज्याचा अनुभव घेतला. इंग्रज हें सर्व डोळे मिटून बघत होते; कारण त्यांना त्या दलदली प्रदेशाचा पुरा अनुभव येऊन चुकला होता. म्हणून कार्याचा अनारंभ हें प्रथम बुद्धिलक्षण मनांत घेऊन त्यांनीं अमरसिंहाला आपल्या औट घटकेच्या स्वराज्याचा खुशाल अनुभव घेऊं दिला.

**बिहारी बंडाचीं शेवटचीं दृश्यें:—**

इ. स. १८५८ चा पावसाळा संपला, तुडुंब वाहून चाललेले नद्यानाले आटून गेले, दलदली वाळूं लागल्या, शेतांतून वाढणारीं धान्यें कापलीं गेलीं, मळ्यांतील ऊंस कोठें कोठें दिसत होते. अशा समयाला इंग्रजांनीं बिहारी प्रदेशावर पुन्हा स्वामित्व मिळविण्याचा प्रयत्न करण्यास सुरुवात केली. ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यांत अमरसिंह हा शोण नदीच्या पश्चिमेकडील व गंगा नदीच्या दक्षिणे-कडील प्रदेशाचा अगदीं स्वतंत्र स्वामी होता. परंतु ऑक्टोबरांत ब्रिटिश सेनासागरांत नव्या दमाच्या नवीन सैनिकांचे ओघ येऊन मिळूं लागले व अमरसिंहाला जाळ्यांत अडकवण्याच्या नवीन युक्त्याहि

निघूं लागल्या. लखनौच्या वेढ्यांत ज्यानें आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवलें आहे त्या जनरल हॅवलॉकचा मुलगा सर हेन्री हॅवलॉक आतां युद्धक्षेत्रावर अवतीर्ण झाला व कर्नल टर्नर नांवाच्या सहायकाच्या मदतीनें त्यानें दोन नवीन कल्पना अमलांत आणिल्या. अमरसिंहाचे सैनिक जंगलाच्या आश्रयानें लढत असल्याकारणानें आपणास त्या युद्धक्षेत्रांत यश मिळत नाहीं हें जाणून त्यानें नवंबर महिन्यांत मेसर्स बर्न आणि कंपनीला जगदीशपुराचे आजूबाजूस असलेलें सबंध जंगलच कापून टाकण्याचा हुकूम दिला. २३×४ म्हणजे ९२ चौरस मैलांचा प्रदेश एक महिन्याचे आंत कापून साफ करण्यांत आला व बंडवाल्यांचें आश्रयस्थानच नाहींसें झालें. तथापि कोणींहि शरणागतीची दीन भाषा बोलला नाहीं. अमरसिंह आणि त्याचे जिवाभावाचे सैनिक कैमूरच्या टेकड्यांवर पळून गेले व तेथून त्यांनीं इंग्रजांशीं मुकाबला करण्यास प्रारंभ केला. परंतु, त्यांच्यानें फार वेळ तग निघेना. कारण, आतां त्यांच्यामागें घोडदळ लावण्याची युक्ति अमलांत आणण्यांत आली. माणूस कितीहि चपल झाला तरी घोड्यापुढें किती पळेल ? आजहि आपण बघत आहोंच कीं, देशप्रेमानें झगडणारे हबशी लोक इटलीच्या विमानांच्या बॉंबगोळ्यांनीं हजारांनीं मरत आहेत. एकूण असें झालें कीं, इंग्रजांच्या सैन्यसाहित्यापुढें बिहारी बंडखोरांना टिकाव धरवेना. अखेरीस जिवावर उदार होऊन समोरासमोर झटापटीस सुरुवात झाली. प्रत्येक झटापटींत शेंकडों क्रान्तिकारी स्वातंत्र्यसंग्रामांत स्वर्गस्थ झाले व अमरसिंहाचें अवतार कार्य संपण्याचा काल प्राप्त झाला.

**नाटकाचा शेवट व भरतवाक्यः—**

ता. २४ नवंबर सन १८५८ रोजीं अमरसिंहाची इंग्रजांशीं

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.

शेवटची झटापट झाली. त्याच्या तुकडींतील केवळ तीनच सैनिक शिल्लक राहिले होते. पण अमरसिंहावर दोन गोरे शिपाई पूर्ण लक्ष देत होते. त्यांनीं आपले घोडे अमरसिंहावर घातले. अमरसिंह एका उसाच्या मळ्यांत शिरला. काळाचे ते दोघे दूत पाठीवर होतेच; पण वेळ आलेली नव्हती. प्रसंगावधान कायम ठेवून अमरसिंहानें आपलें पिस्तूल सांवरलें व क्षणार्धांत ते पाठलाग करणारे यमदूत यमलोकाचा आश्रय करते झाले. त्यांच्याच घोड्याचा उपयोग करून अमरसिंह कूच-दरकूच करीत नेपाळांत पोंचला. कुँवरसिंहाच्या हिंदी चरित्रांत अशी माहिती मिळते कीं, त्याला जंगबहादुरानें एक चिठी देऊन ब्रिटिश सरकारकडे पाठविलें. त्याचें काय करावें याचा विचार चालला असतांच गोरखपूरच्या जेल-खान्यांत त्याला ताप आला व त्या तापानेंच त्याला ग्रासलें.

शेवटीं या बंडाचा मूळ उत्पादक, कुँवरसिंहाचा स्वामिभक्त सेवक हरेकृष्णसिंह याचें काय झालें तें पाहूं. कैमूर टेंकडीवरून हुसकून लावण्यांत आल्यानंतर तो बनारसच्या मार्गानें पळाला. परंतु, काशीक्षेत्रीं त्याचें दुर्दैव आडवें आलें. कुँवरसिंहाच्या उच्छिष्ट पिष्टपिंडांनीं पोसलेला दरबारी राम कवि बनारस येथें ब्रिटिश पोलीसविभागांत नोकरी धरून राहिलेला होता. त्यानें त्याला ओळखलें व हरेकृष्णसिंहाला गिरफदार करण्यांत आलें. त्याच्या गुन्ह्याचें कारण ज्या ठिकाणीं घडलें त्याच जगदीशपुरांत त्याला फांशीं देण्यांत आलें. कुँवरसिंहाला खोट्या थापा देऊन बंडाला उद्युक्त करण्याच्या पापाचें प्रायश्चित्त त्याला कुँवरसिंहाच्या राज-वाड्याच्या लाल दरवाजासमोरील एका वधस्तंभावर मिळालें. अखेरपर्यंत हरेकृष्णाचें धैर्य कायम होतें. फांसावर चढतांना तो काकाला हंसत म्हणाला, “ काका, आपण कां रडतां ? आपणहि

माझ्यासारखें हंसा. आपण लक्षांत असूं द्या कीं, आपला हरेकृष्ण आपल्या कुलाला पवित्र करून चिरकालीन यशाची जोड करीत आहे. आपण मान खालीं घालूं नका. वास्तविक रीतीनें मीं आपल्या कुळांतील प्रत्येकाचें मस्तक उंच रहावें अशी कृति केली आहे." हरेकृष्ण मेला. अमरसिंहहि मेला. परंतु ह्या बिहारी वीरांनीं आपल्या वीरत्वाचे योगानें आपली कीर्तिकहाणी सदासर्वदा अमर करून ठेविली आहे. त्यांचे स्वातंत्र्य मिळण्याचे प्रयत्न विफल झाले, तथापि भरतभूमींतून स्वातंत्र्याची कल्पना मात्र अद्याप मेली नाहीं. त्या बिहारी वीरांच्या पुण्यस्मृतींवर पुष्पमालेंतील एक प्रार्थनापुष्प समर्पण करूं या व हें लांबलेलें कथानक संपवूं या.

परमपुरुषकारो वेदशास्त्रोक्त सारो।
वसति सफलयत्ने कान्तिवद्दिव्यरत्ने॥
अत उदयमहीध्रं यान्तु तं प्राप्य शीघ्रं।
शिवचरणसरोजे मेऽर्थना सद्धृदोऽजे॥

अर्थः—दिव्य रत्नामध्यें कांति ज्याप्रमाणें वास करिते त्याप्रमाणें सफल वेदशास्त्रांचा सारभूत जो पुरुषार्थ तो सफल यत्नामध्यें वास करीत असतो. ह्यास्तव अनादि अशा परमेश्वराच्या चरणकमलापाशीं माझी इतकीच प्रार्थना आहे कीं, हे लोक पुरुषार्थ संपादन करून उदयरूप पर्वताप्रत प्राप्त होवोत.

REFBK-0005451